**( अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष )**

**पृ.शी. / मु.शी. :** तोंडी उत्तरे

**जळगांव जिल्ह्यातील खाजगी इंग्रजी माध्यमाच्या शाळांनी**

**शिक्षण हक्क कायद्याचे उल्लंघन केल्याबाबत**

**(1) * 50728 श्री.उन्मेष पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) शिक्षण हक्क कायद्यानुसार वंचित व दुर्बल घटकांतील बालकांना प्राथमिक शिक्षणासाठी प्रवेश देणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, वरीलप्रमाणे शासन आदेशाचे पालन न करता फी आकारुन प्रवेश दिल्याने जळगांव जिल्ह्यातील खाजगी इंग्रजी माध्यमाच्या 150 शाळांना कारणे दाखवा नोटीसा दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, त्यानुसार सदरच्या खाजगी इंग्रजी माध्यमाच्या शाळांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (1) होय.

(2), (3) व (4) प्राथमिक तपासणीत विविध त्रुटया आढळून आलेल्या शाळांना नोटीसा देण्यात आल्या असून सदर शाळांकडून त्रुटींची पूर्तता करुन घेण्यात येत आहे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, शिक्षण हक्क कायद्यानुसार वंचित आणि दुर्बल बालकांना प्राथमिक शिक्षण देण्यासंदर्भात केंद्र सरकारने कायदा केलेला आहे. याबाबत सातत्याने तक्रारी केल्या जातात की, शासनाच्या आदेशाचे पालन न करता अनेक शाळा प्रवेश करतात. याबाबत काही शाळांना नोटिसाही देण्यात आलेल्या आहेत. मंत्री महोदय मला एका गोष्टीबाबत आपल्याकडून स्पष्टता हवी आहे. शिक्षण हक्क कायदा झाल्यानंतर राज्यघटनेतील तरतुदी प्रमाणे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षण देण्याची जबाबदारी आपल्या देशाने किंवा आपल्या घटनेने स्वीकारलेली आहे. आता एकदा ही जबाबदारी स्वीकारल्यानंतर त्याबाबतची व्यवस्था एक तर केंद्र सरकारने

...2/-



ता.प्र.क्र. 50728 ...

श्री. दिलीप वळसे-पाटील ....

केली पाहिजे होती किंवा राज्य सरकारने केली पाहिजे होती. आज हा सर्व भार खाजगी शिक्षण संस्थांवर टाकून देण्यात आलेला आहे. एका बाजूला प्रवेश द्या असा आग्रह होत आहे आणि प्रवेश दिला पाहिजे याबाबत काही प्रश्न नाही. परंतु, एंट्री पॉईंटबाबतचा एक मुद्दा तयार झालेला आहे. एंट्री पॉईट नर्सरी धरायचा, के.जी. धरायचा की, पहिली धरायचा हा मुद्दा आहे. शाळांची फी कितीही असली तरी राज्य सरकारने या संदर्भात आम्ही एक विशिष्ट रक्कम या वंचित विद्यार्थ्यांच्या फी पोटी देऊ अशी कमिटमेंट केलेली आहे. ते पैसेही 3-3, 4-4 वर्षे दिले जात नाहीत. हा प्रश्न एका जिल्ह्यातील काही शाळांपुरता मर्यादित असला तरी, मला असे वाटते की, या सर्वच विषयासंदर्भात अधिक स्पष्टता होण्याची आवश्यकता आहे. ती स्पष्टता आपण करणार आहात काय, याबाबतीत शासनाचे नक्की काय धोरण आहे ?

श्री. विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी सांगितलेले खरे आहे. हा प्रश्न जरी जळगाव पुरता असला तरी, राज्यातील बऱ्याच शाळांमध्ये याच पध्दतीने पुढे-मागे होत असते आणि यातून काही बेसिक इशुज कधी संस्थाचालक, कधी पालक यांच्यामध्ये निर्माण होतात. मागे एकदा पुण्यामध्ये हा प्रश्न मोठ्या प्रमाणात निर्माण झाला होता, त्यावेळेस सर्व संस्थाचालक, पालक यांच्याशी एकत्र चर्चा करून मी त्यातील एक चांगला मार्ग काढला. मी असे म्हटले की, एंट्री पॉईंट ज्युनिअर के.जी. ठरवायचा की, पहिली ठरवायचा हे, शाळांनी ठरवावे. तुम्ही ज्युनिअर के.जी. एंट्री पॉईंट ठरविला तर, आम्ही ज्युनिअर के.जी., सिनिअर के.जी.ची फी देऊ शकत नाही. कारण शिक्षण हक्क कायदा पहिलीपासून पुढे आहे आणि पूर्व प्राथमिक हा विषय आमचा नाही. परंतु, तुम्हाला घ्यायचे नसेल तर तुम्ही ज्युनिअर के.जी. ला 25 टक्के जागा रिकाम्या ठेवा. तुम्ही तेथून विद्यार्थी घेतले तर पहिलीत नवीन मुले दाखल करणे शक्य होत नाही. आम्ही एक चांगला निर्णय घेऊन 30 एप्रिलला एक जी.आर. काढला. त्यावर काही संस्थाचालक कोर्टात गेले. आम्ही असे म्हटले होते की, प्रोसिजर डिसेंबरला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सुरु करु आणि मार्चला संपवू मग काही जागा रिकाम्या राहिल्या तर त्या लॅप्स होतील. हे संस्थाचालकांना अडचणीचे होत होते. त्यामुळे ते कोर्टात गेले. कोर्टाने असे म्हटले की, तुम्ही 10 वी पर्यंत जागा रिकाम्या राहिल्या तर रिकाम्या ठेवा. ज्या वर्षी विद्यार्थी येतील त्या वर्षी घ्या. हे खूप

...3/-



ता.प्र.क्र. 50728 ...

श्री. विनोद तावडे ....

इम्प्रॅक्टिकल होते. परंतु, दुर्दैवाने तो निकाल देण्यात आल्याने, त्या निकालाची अंमलबजावणी करण्याशिवाय काही पर्याय नाही.

सन्माननीय सदस्यांच्या दुसऱ्या प्रश्नाच्या अनुषंगाने मी हे सांगू इच्छितो शिक्षणशुल्क किंवा मोफत शिक्षण दिले पाहिजे, त्यामुळे आपल्या विद्यार्थ्यांच्या फीवर वर्षभराची साडेनऊ हजार कोटी रुपये इतकी रक्कम आपण खर्च करतो, ती आपण त्या शाळांना देतो. माझ्याकडे या विभागाचा कार्यभार आल्यानंतर 3-4 वर्षांचे पैसे पेंडिग होते, ते आता वर्ष-दोन वर्षावर आणलेले आहे. मधल्या काळात मी दिल्लीला स्वत: जाऊन, भेटून ते पैसे आणून ते शाळांपर्यंत पोहाचविलेले आहेत. आपण यावर्षी त्यामध्ये अजून स्ट्रिमलाईन नक्की करू. आपण शाळांना जे पैसे देतो ते पुरेसे देत आहोत असे नाही हे खरे आहे. परंतु, जे पैसे देत आहोत ते त्यांना वेळेत दिले पाहिजेत हा प्रयत्न या विभागाचा आहे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी या विषयाबाबतची आपली भूमिका मांडलेली आहे. पहिली गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, एंट्री पॉईंट कोणता ठरवायचा हे आपण शाळांवर टाकत आहात. असे करून आपण त्यांची सोय करीत आहात, हे बरोबर आहे. आपण आता ही प्रचलित पद्धत केलेली आहे. समजा ज्युनिअर के.जी. हा एंट्री पॉईंट असेल मात्र ज्युनिअर के.जी.च्या फीची शासन प्रतिपूर्ती करीत नाही. राज्यघटनेत केलेल्या सुधारणानुसार जी जबाबदारी शासन किंवा राज्यघटनेने स्वीकारलेली आहे ती 6 ते 14 या वयोगटातील विद्यार्थ्यांची स्वीकारलेली आहे. आज ज्या शाळा चांगले दर्जेदार किंवा कसेही शिक्षण देत आहेत त्या राज्य शासनाची परवानगी घेऊन किंवा केंद्राची, सीबीएसई, आयसीएसईची परवानगी घेऊन शिक्षण देत आहेत. त्यांनी जर ज्युनिअर किंवा सिनिअर के.जी. चे वर्ग चालविले तर, त्यांच्यावर ही सर्व बंधने आहेत. परंतु, आज आपण पाहिले तर तालुक्या-तालुक्यात, गावा-गावांमध्ये, छोट्या-छोट्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

खोल्यांमध्ये ज्युनिअर आणि सिनिअर के.जी.च्या शाळा सुरु झालेल्या आहेत. त्यावर शासनाचे नियंत्रण नाही, त्यांना शासनाच्या परवानगीची गरज नाही. त्यांनी आपल्या पद्धतीने प्री-प्रायमरीचे वर्ग सुरु करायचे, मात्र त्यांच्यावर काही नियंत्रण नाही. त्यामुळे ज्युनिअर आणि सिनिअर के.जी.

...4/-



ता.प्र.क्र. 50728 ...

श्री. दिलीप वळसे-पाटील ...

यांच्याशी आमचा काही संबंध नाही, याबाबत शासनाने निर्णय करावा. राईट टू एज्युकेशनच्या अंडर पहिली पासूनची मुले येतात. कारण पाहिलीतील विद्यार्थी साधारणतः 6 वर्षांचा असतो. घटनेतही 6 ते 14 याच वयोगटाकरिता तरतूद आहे. त्यामुळे याबाबत शासनाने एंट्री पॉईट पहिलीच असेल, असा स्पष्ट निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. ज्यावेळेस शासन निर्णय घेत नाही, त्यावेळेस ज्युडिशिअरी ॲक्टिव्ह होते आणि आपल्याला डायरेक्शन द्यायला सुरुवात करते. आपल्या इन्कॉम्पिटन्समुळे किंवा विलंबामुळे ज्युडिशिअरीला ही संधी मिळते. त्यामुळे लोकांना वारंवार कोर्टात जाऊ द्यायचे नसेल तर, आपले याबाबतीत धोरण सुस्पष्ट असले पाहिजे, ते धोरण तुम्ही घ्या. माझी विनंती आहे, आवश्यकता वाटल्यास एखादी बैठक घ्या, त्यातील कायदेशीर गोष्टी समजून घ्या त्या शासनाला, अधिकाऱ्यांना समजावून सांगा. हा मुद्दा त्यामध्ये घेतला पाहिजे. ज्युनिअर के.जी. पासून सीटस रिकाम्या ठेवा हे सांगायला सोपे आहे. एका बाजूला सांगितले जाते की, सहावा, सातवा वेतन दिला पाहिजे. दुसऱ्या बाजूला एवढीच फी घ्या असे सांगितले जाते. त्यामुळे इकॉनॉमिक्स बिघडून जाते व अशावेळेस माल प्रॅक्टिसेसला संधी मिळते. एका बाजूला माल प्रॅक्टिसेस होऊ नयेत ही आपली अपेक्षा आहे आणि दुसऱ्या बाजूला अनावश्यक नियंत्रण आणण्याचा आपण प्रयत्न करतो, त्यातून गोष्टी अधिक बिघडत जातात. यामध्ये सुधारणा करण्याच्या संदर्भात शासनाने स्पष्ट भूमिका घेतली पाहिजे, ती आपण घेणार आहात काय ?

श्री. विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, या विषयाबाबत स्पष्ट भूमिकाच घेतलेली आहे. आम्ही असे म्हटले की, आमच्या दृष्टीने एंट्री पॉईंट पहिली आहे. परंतु, पुण्यातील लोकांचे कधी एकमत करता येईल काय ? काही संस्था म्हणाल्या की, तुमचा एंट्री पॉईंट पहिली आहे, परंतु, आमच्या शाळेचा दर्जा इतका वरचा आहे की, तुम्ही जर विद्यार्थ्याला ज्युनिअर के.जी. मध्ये पाठविले नाही तर, तो पहिलीत मागे पडतो. त्याने पहिलीमध्ये आमचा अभ्यासक्रम कोपअप करावयाचा असेल तर,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तो ज्युनिअर के.जी. पासून आला पाहिजे. आम्ही असे म्हटले की, आमची काही अडचण नाही. आम्ही त्याची फी देणार नाही. विद्यार्थ्यांच्या हितासाठी शिक्षण हक्क कायद्यानुसार 25 टक्के आरक्षण दिले आहे.

B-1/...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विनोद तावडे.....

असे असताना आमचे पहिली असे म्हणून त्याचे अहित करायचे, आमच्याकडे ज्युनिअर केजीमध्ये पाठवा असे संबंधित शाळा म्हणाली तर आपण त्याची जाहिरात देऊ, ते ऑनलाईन करु अशी आमची बेसिक कल्पना होती. परंतु दुर्दैवाने त्यातीलच काही संस्थाचालकांनी कोर्टामध्ये धाव घेतल्यानंतर न्यायालयाने दिलेला निर्णय त्यांच्याच अंगलट आला. आपण आपली भूमिका स्पष्ट केली. आपण म्हणालात ती बाब अर्धसत्य आहे की, आपण ॲक्टीव्ह न झाल्यावर कोर्ट ॲक्टीव्ह होते. परंतु येथे बहुधा आम्ही ओव्हर ॲक्टीव्ह झाल्यामुळे कोर्ट ॲक्टीव्ह झाले. आपण प्रोक्टीव्ह सोल्युशन काढायला लागलो...(अडथळा)...तुम्ही दुन्ही बाजूने बोलता. तुम्ही लॉ केले, तुम्ही कोर्टात उभे रहा. म्हणजे आपल्याही खरी बाब लक्षात येईल. खऱ्या अर्थाने विद्यार्थी, पालक आणि संस्था चालकांची अडचण सोडवायची असेल, तर आम्ही सर्वांच्या सहमतीने ॲक्टीव्ह होऊन जीआर काढला. परंतु त्यात जे दोन जण नव्हते, ते मुद्यावर गेले की, आम्हाला का बोलविले नव्हते, हे माहीत नाही. आणि त्यातून कोर्टाकडून असा निर्णय आला. संस्था चालकांना नको असेल तर कोर्ट म्हणते ते करण्यात येईल. जे अडचणीचे असेल ते करावे लागणार.

अध्यक्ष महोदय, यामध्ये सुसुत्रीकरण आणण्याची आवश्यकता असल्याचे सन्माननीय सदस्य श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी सांगितले. यामध्ये ऑनलाईन प्रवेश पद्धत सुरु करणार आहोत. त्या पद्धतीने कार्यवाही करीत आणलेली आहे. यासंदर्भात यावर्षी नाशिक जिल्ह्याची कार्यवाही पूर्ण झालेली आहे. पुढील दोन महिन्यात शक्य झाले तर सर्वच जिल्ह्यामध्ये होऊ शकेल. कुठल्या शाळेमध्ये याचा आग्रह असतो, आता याचा आम्हाला अंदाज आलेला आहे. या पद्धतीची संबंधित संस्था चालकांची बैठक घेण्यात येईल. याकरिता सन्माननीय सदस्यांची बैठक बोलविण्यात येईल.

श्री. प्रशांत ठाकूर : अध्यक्ष महोदय, माझे तीन प्रश्न आहेत. आता पूर्व प्राथमिक शिक्षणासंदर्भात मंत्री महोदयांनी उल्लेख केला. पूर्व प्राथमिक शिक्षण आणि अशा शाळा शासनाच्या नियंत्रणाखाली आणण्यात येणार आहे काय, असल्यास कधी आणि पीटीएचे पालक प्रतिनिधी शाळा गैरमार्गाने स्वतःच निवडते. त्यानंतर त्यांच्याकडून फी ठरविली जाते. अशा पद्धतीने वाढविलेल्या परिक्षा शुल्काला 15 टक्क्याच्या कक्षेमध्ये चॅलेंज करणे कठीण होते. यामुळे फी वाढ नियंत्रण कायद्यामध्ये आवश्यक ते बदल करणार आहात काय?

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, पूर्व प्राथमिक शिक्षणासंदर्भात गेल्या मंगळवारी याच सभागृहामध्ये चर्चा झालेली आहे. त्यासंदर्भात माजी राज्यमंत्र्यांनी दिलेल्या अहवालावर कार्यवाही करण्याचा विचार करणार आहोत. तसा विचार केल्यास त्यामधील ॲकॅडमीक आणि ॲडमिनीस्ट्रेटीव्ह भागाचा विचार नक्कीच करीत आहोत. पीटीएच्या माध्यमातून होणाऱ्या फी संदर्भात सांगू इच्छितो की, आपण फी रेग्युलेशन ॲक्ट आणलेला आहे. याबाबत समिती स्थापन झालेली आहे. शुल्क नियंत्रण समितीकडे ही बाब गेली तर या प्रकारचा कुठलाही अन्याय झाल्यास कार्यवाही करता येईल.

श्री. गणपतराव देशमुख : अध्यक्ष महोदय, सभागृहाने कायदा करीत असताना 25 टक्के गरीब विद्यार्थ्यांना खाजगी शाळेने प्रवेश द्यावा आणि त्यांची शासनाने फी भरावी, अशा तऱ्हेची तरतूद करण्यात आली होती. शासनाने एंट्री पॉईंटवरुन या कायद्याची अंमलबजावणी जवळजवळ तहकूब केल्यासारखीच परिस्थिती आहे. हा कायदा पुणे येथील शिक्षण संस्थांसाठी केलेला नसून संपूर्ण राज्यासाठी केला होता. पुण्यातील काही खाजगी संस्थाचालकांना बोलावून त्यांची मते घेण्यात यावीत, त्यांना बाजूला सोडता येणार नाही. परंतु त्यांच्याच मतावर अवलंबून राहून शासनाने नियम करायचे किंवा सवलती द्यायच्या ही बाब योग्य नाही.

अध्यक्ष महोदय, गुणवत्तेच्या शाळांना पूर्व प्राथमिक सुरु करावयाचे असल्यास त्यांना शासनाच्या अटीनुसारच पूर्व प्राथमिक सुरु करावे लागेल, त्यांच्या मर्जीप्रमाणे सुरु करुन चालणार नाही. पुणे शहरातील खाजगी संस्थांना आणि ग्रामीण भागातील सर्व संस्थांना देखील हे करायचे असून येथे अशी विसंगती निर्माण झालेली आहे. ग्रामीण भागातील पूर्व प्राथमिक, के.जी. सुरु आहेत. त्यांच्याकडून भरमसाठ फी घेतली जात असून त्यांच्यावर नियंत्रण नाही. अशा परिस्थितीमध्ये शासन पूर्व प्राथमिक साठी कोणती भूमिका घेणार आहे. तसेच ते आमच्या कक्षेत येत नाही, असे सांगून चालणार नाही. मंगळवारी चर्चा होत असताना मी हाच प्रश्न उपस्थित केला होता. माननीय शिक्षण मंत्र्यांनी यासंदर्भात सांगितले. परंतु तसे करुन चालणार नाही. शिक्षणाची सर्व जबाबदारी शिक्षण खात्यावर व शिक्षण मंत्र्यांवर आहे. घटनेमध्ये दुरुस्ती करुन चौथ्या वर्षापासून ते थेट, सहा ते अकरा वयोगटापर्यंत ठेवलेली असली तरी त्यावेळेलाही मी सांगितले होते की, बालकाची खरी वाढ पहिल्या वर्षापासून सुरु होते आणि चौथ्यावर्षापर्यंत होत असते.

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गणपतराव देशमुख.....

ही जबाबदारी स्वीकारून शासन निर्णय घेणार आहे काय, ही जबाबदारी झटकून चालणार नाही. यासंदर्भात शासन कोणती कार्यवाही करणार आहे, असा माझा प्रश्न आहे.

श्री. विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. गणपतराव देशमुख यांनी विचारलेल्या प्रश्नासंदर्भात मी सांगू इच्छितो की, यासंदर्भातील कायदा आपण केला नसून पार्लमेंटने केलेला आहे. तसेच याकरिता पुण्यातीलच नव्हेतर नागपूर, औरंगाबाद इतर अनेक ठिकाणच्या संस्था आलेल्या आहेत. त्यामुळे केवळ पुण्यातील संस्थांच्या आधारावर हा निर्णय केलेला नाही. तसेच पूर्व प्राथमिकच्या विषयाबाबत कायद्याच्या बाहेर जावून काहीच करता येत नाही. माझ्याकडे असलेले काम कायद्यानुसारच करावे लागणार आहे, कारण तशीच शपथ घेऊन मी मंत्री झालेलो आहे. परंतु आपल्या भावना योग्य आहेत. पूर्व प्राथमिकमध्ये अनागोंदी कारभार चाललेला असून त्यामध्ये सुसूत्रीकरण आणले पाहिजे म्हणून या विषयावर शासन म्हणून विचार करण्याची गरज आहे. माजी राज्यमंत्र्याच्या अहवालावर काही निर्णय करण्याबाबत आम्ही सकारात्मक आहोत, हे मी गेल्यावेळी सांगितले आहे. त्यामुळे पुणे ग्रामीण, शहरी, मराठवाडा, विदर्भ इत्यादी सर्व बॅकलॉग भरुन शिक्षणाच्या विषयाबाबत ठोस पावले उचलली जातील.

श्री. हरिभाऊ जावळे : अध्यक्ष महोदय, मी जळगाव जिल्ह्यासंदर्भात विचारु इच्छितो. मंत्री महोदयांना दोन नंबरचा प्रश्न विचारण्यात आला होता की, असल्यास, वरील प्रमाणे शासन आदेशाचे पालन न करता फी आकारुन प्रवेश दिल्याने जळगाव जिल्ह्यातील खाजगी इंग्रजी माध्यमांच्या 150 शाळांना कारणे दाखवा नोटीसा दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय? आपण उत्तरामध्ये असे दिले आहे की, प्राथमिक तपासणीत विविध त्रुट्या आढळून आलेल्या शाळांना नोटीसा देण्यात आलेल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, माझा आपल्या मार्फत मंत्री महोदयांना प्रश्न आहे की, यातील त्रुट्यांमधील प्रमुख त्रुट्या कोणत्या आणि ह्या जाणूनबुजून ठेवलेल्या आहेत की, नजर चुकीने राहिलेल्या आहेत?

श्री. विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, एकूण 21 बाबींची पुर्तता झाली आहे किंवा कसे हे पहावे लागते. यामध्ये काही शाळांच्या 12 काही शाळांच्या 18, काही शाळांच्या 14 काही शाळांच्या 4 अशा त्रुट्या राहिलेल्या आहेत. आरटीई कायद्याप्रमाणे कुंपनापासून ते इतर सर्व बाबींची पुर्तता

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विनोद तावडे.....

झाली किंवा कसे याबाबत पाठविलेले आहे. सन्माननीय सदस्य जळगावचे असल्यामुळे त्यांना शाळानिहाय माहिती हवी असेल तर त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रा. मेधा कुलकर्णी : अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रामध्ये आरटीईच्या अंतर्गत आलेल्या अर्जापैकी किती जणांना प्रवेश देऊ शकलो आणि आरटीईची प्रभावीपणे अंमलबजावणी आपण का करु शकलो नाही, याच्या अपयशाची कारणे शोधली आहेत काय, तसेच अंमलबजावणी चांगली होण्यासाठी आपण कोणती उपाययोजना करणार आहात? पुणे शहरामध्ये बॅकलॉग नसलेल्या शाळांमध्येही स्वॉफ्टवेअरच्या चुकीमुळे मुले पाठविली हे खरे आहे काय?

श्री. विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, यासंदर्भात राज्यभरातील आकडेवारी काढावी लागणार आहे. ती आकडेवारी काढून देण्यात येईल. हा प्रश्न मूळ जळगाव पुरता मर्यादीत होता. यामध्ये एकूण 25 टक्के आरक्षण त्या, त्या शाळेमधून किती दिले पाहिजे, याची आकडेवारी प्रत्यक्षात मोठी असते. परंतु सीबीएसई, आयसीएसई सारख्या काही ठरावीक शाळेत प्रवेशासाठी स्पर्धा असते. इतर सर्व ठिकाणी जागा रिक्त रहात असतात.

...B/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.50728

श्री.विनोद तावडे...

राज्यात 6,279 खाजगी कायम विना अनुदानित शाळा असून त्यांची एकूण विद्यार्थी प्रवेश क्षमता 3,54,918 आहे. त्यामध्ये 25 टक्क्यानुसार 80 हजारांच्या दरम्यान प्रवेश झाले पाहिजेत. 80 हजार प्रवेशापैकी 40 ते 45 हजार पर्यंत प्रवेश होतात. शिक्षण हक्क कायद्यानुसार प्राथमिक शिक्षणासाठी वय वर्षे 6 गृहीत धरण्यात येते व त्यानुसार 25 टक्के प्रवेशाची आकडेवारी ग्राह्य धरण्यात आली आहे. पुणे येथे शिक्षण हक्क कायद्यानुसार प्रवेशासंदर्भात प्रश्न निर्माण झाला होता. तो सोडवण्याचा आम्ही प्रयत्न केला. काही शाळांमध्ये 25 टक्क्यापैकी 15 टक्के प्रवेशाच्या जागा भरल्या व 10 टक्के जागा भरण्यात आल्या नाही. उर्वरित जागा 1 ली ते 10 वी पर्यंत भरण्याची व्यवस्था निर्माण केली होती व त्याप्रकारचा नियम होता. यासंदर्भात सॉफ्टवेअर मध्ये झालेली चूक दुरुस्त करुन शासन निर्णय निर्गमीत केला होता. त्याविरुध्द माननीय उच्च न्यायालयामध्ये अपिल दाखल करण्यात आले होते व त्यावर दिलेल्या निर्णयानुसार शिक्षण विभागाकडून काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे.

श्री.ग.आ.देशमुख : अध्यक्ष महोदय, पहिली पासून 10 वी पर्यंत संदर्भातील निर्णय सभागृहाला मान्य नाही. हा निर्णय विद्यार्थ्यांवर अन्याय करणारा असून त्यासंदर्भात शासन अपिल करणार आहे काय ?

श्री.विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांचे म्हणणे व्यवस्थित समजून घेण्यात येईल व ते योग्य वाटले तर सदरहू प्रकरणी अपिल दाखल करण्याचा निर्णय घेण्यात येईल.

------------

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**राज्यातील निवासी डॉक्टरांच्या कामाचा ताण कमी करण्याबाबत**

**(2) * ४९७२१ डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील मागील तीन वर्षाच्या कालावधीत आठवड्याला किमान १०० तासांपेक्षा जास्त काम व ताणामुळे, वेळी-अवेळी झोप तसेच कामाच्या ठिकाणी मिळणाऱ्या निकृष्ट आहारामुळे ९० निवासी डॉक्टरांना क्षयरोग व २०० पेक्षा जास्त निवासी डॉक्टरांना हृदय विकार, मधुमेह झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, निवासी डॉक्टरांच्या कामाचा ताण कमी करुन त्यांच्या कामाचे सुनियोजन करण्यासंबंधी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास, त्यामागील कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही, हे खरे नाही.

(2) निवासी डॉक्टरांच्या कामाचा ताण कमी करण्याच्या अनुषंगाने संस्थास्तरावर कॉलेज कौन्सिलची बैठक आयोजित करुन त्या त्या विभागाच्या विभाग प्रमुखांमार्फत निवासी डॉक्टरांच्या दैनंदिन कामाचे नियोजन ठरविण्यात येते.

(3) वैद्यकीय रुग्ण सेवेकरीता निवासी डॉक्टरांना सर्व प्रकारच्या रोग्यांच्या सान्निध्यात राहावे लागते. ज्यांची रोगप्रतिकारक शक्ती कमी असते, त्यांना क्षयरोग होऊ शकतो. तसेच, कमी शारिरीक श्रम, एकंदरीत जीवनशैली आणि काही प्रकरणी अनुवांशिक कारणाने मधुमेहसुध्दा होऊ शकतो.

डॉ.तुषार राठोड : अध्यक्ष महोदय, राज्यातील विविध वैद्यकीय महाविद्यालयातील वेगवेगळ्या शाखेमध्ये 4,500 पेक्षा अधिक निवासी डॉक्टर्स काम करतात. रुग्णांच्या तुलनेत ही संख्या फार कमी आहे. त्यामुळे निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांना दररोज जवळपास 18 ते 20 तास काम करावे लागते. इमर्जन्सी डेज् व पोस्ट इमर्जन्सी डेज्ला 40 ते 42 तास डॉक्टरांना काम करावे लागते. या कामाच्या तणावामुळे, अत्यल्प झोपेमुळे व हॉस्टेलमधील असुविधेमुळे निवासी वैद्यकीय डॉक्टरांची रोग प्रतिकार शक्ती कमी होऊन त्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. सन 1987 साली माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सेंट्रल रेसिडेन्सी स्कीमप्रमाणे दिवसाला 8 तास व आठवड्याला 48 तास कामाची कमाल मर्यादा करण्याबाबत शासन उपाययोजना करणार

.....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.तुषार राठोड.....

आहे काय, निवासी डॉक्टरांचे काम कमी करण्यासाठी शासन नवीन अन्रजिस्टर्ड पोस्टची निर्मिती करणार आहे काय ?

श्री.विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, राज्यातील निवासी डॉक्टरांवरील कामाच्या तणावासंदर्भात नॉन डॉक्टर्सचा समज आहे की, त्यांना सलग 24 तास ड्यूटी करावी लागते. ऑन कॉल असणे व इमर्जन्सी असणे, यामधील स्पष्टता सन्माननीय सदस्य डॉ.राठोड यांना आहे. यासंदर्भात अनेकांना वाटते की, सदरहू डॉक्टर्स ओ.टी., ओ.पी.डी. किंवा वॉर्डमध्ये असतात. परंतु निवासी डॉक्टर्स काही ठराविक दिवस 24 तास उपलब्ध असतात व ठराविक दिवस ऑन कॉल उपलब्ध असतात. डॉक्टर्स ऑन कॉलसाठी काही ठराविक दिवस कॅम्पसमध्ये 24 तास उपलब्ध असावेत कारण त्यावेळी त्यांना कॉल आल्यानंतर कॉलवर जावे लागते. त्यामुळे त्यांच्यावर ताण पडून ते आजारी पडतात हे खरे नाही. रेसिडन्स डॉक्टर्सना काम अधिक आहे, हे खरे आहे. परंतु त्यांनी या वयामध्ये अधिक काम करुन अधिक ज्ञान मिळवले तर पुढे त्यांनी स्वतःची प्रॅक्टीस सुरु केल्यानंतर त्यांना त्याचा फायदा होतो. यासंदर्भातील अनुभव सन्माननीय सदस्यांनाही आला असेल व तेही ही बाब मान्य करतील. के.ई.एम. व जे.जे. सारख्या हॉस्पिटलमध्ये काम करण्याची अधिकाधिक संधी असल्याने तेथे नियुक्ती मिळण्यासाठी अनेक डॉक्टर्स प्रयत्न करतात कारण तेथे "त्यांचा हात साफ होतो" हा शब्द प्रयोग योग्य नाही परंतु त्यांची प्रॅक्टीस अधिक होते, "हात साफ होतो"असा शब्द प्रयोग ते वापरतात. वैद्यकीय शिक्षण विभागामध्ये पहिले प्राधान्य देताना तेथे येणारे रुग्ण, औषधे व डॉक्टर्स असा क्रम आहे. सेंट्रल ॲक्टच्या सूचनेचा विचार करण्यात येत असून त्यासंदर्भात मार्ड सोबत बैठक घेऊन केंद्र शासनाशी या विषयावर चर्चा करण्यात येईल.

डॉ.जयप्रकाश मुंदडा : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी डॉक्टर्स कामाचा ताण वाढल्याने आजारी पडतात हे खरे नाही, असे सांगितले आहे. परंतु 3 ऱ्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये त्यांनी माहिती दिली आहे की, रोग प्रतिकारक शक्ती कमी असते, त्यामुळे क्षय रोग होऊ शकतो. तसेच, शारिरीक श्रमामुळे मधुमेह होऊ शकतो. यासंदर्भात त्यांनी स्पष्टीकरण द्यावे. रेसिडेन्सिअल डॉक्टरांची संख्या कमी असते. एखाद्या ठिकाणी दोनच डॉक्टरांची संख्या असते व तेथे त्यांना



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.जयप्रकाश मुंदडा.....

अल्टरनेट काम करावे लागते व दररोज काम करावे लागते, त्यामुळे त्यांना कधी कॉल येईल याचे टेंशन असते, कॉल येईल म्हणून त्यांना रात्री झोप येत नाही. ही परिस्थिती मी अनुभवली आहे. त्यामुळे रेसिडेन्सिअल डॉक्टरांची संख्या वाढविण्याकरिता शासन प्रयत्न करणार काय, त्यांना मिळणारा भत्ता वा मानधन हे काही संस्थेत 4 हजार तर काही संस्थेत 20 हजार मिळते त्यामुळे डॉक्टरांना एक सारखे व जास्तीत जास्त मानधन देण्यासाठी शासन प्रयत्न करणार काय ?

श्री.विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.मुंदडा ज्यावेळी डॉक्टर झाले त्यावेळच्या स्थितीत व आजच्या स्थितीमध्ये खूप पॉझिटिव्ह फरक पडला आहे. तिसऱ्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये सांगितले आहे की, ज्यांची रोग प्रतिकारक शक्ती कमी असते ते आजारी पडतात. ही माहिती आम्हाला डॉक्टरांनीच दिली आहे.

डॉ.जयप्रकाश मुंदडा : अध्यक्ष महोदय, निवासी डॉक्टरांवर कामाचा ताण अधिक पडल्याने त्यांची रोगप्रतिकारक शक्ती कमी होते.

श्री.विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, मेडिकल सायन्समध्ये कामाचा ताण अधिक वाढल्याने रोग प्रतिकारक शक्ती कमी होते याला काही जण चॅलेंज करतात, याच्या खोलात मी जाणार नाही कारण मला त्यामधील फार ज्ञान नाही. एक्सपर्ट डॉक्टरांचे सेमिनार मधील म्हणणे मी सन्माननीय सदस्यांना केव्हा तरी पाठवून देईन. 18 मेडिकल कॉलेजबाबत सांगावयाचे झाले तर तेथील सर्व डॉक्टरांना 45 हजार इतके समान स्टायपेंड देण्यात येते. डॉक्टरांची संख्या कमी आहे त्याकरिता मेडिकल काऊन्सिलच्या नॉर्मस्नुसार ग्रॅज्युएट व पोस्ट ग्रॅज्युएट डॉक्टरांची संख्या वाढविण्याकरिता कॉलेजांची संख्या व सीटस् वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.

डॉ.राहूल आहेर : अध्यक्ष महोदय, मागील अनेक वर्षापासून निवासी डॉक्टर दयनीय अवस्थेत राहत आहेत, याप्रकरणी लक्ष घालण्याची माझी कळकळीची विनंती आहे. डॉक्टरांना त्यांच्या कामाच्या अनुषंगाने कमी वेळ विश्रामासाठी मिळतो त्यावेळेत त्यांना राहण्यासाठी चांगली सोय उपलब्ध नसेल तर त्याचाही त्यांच्यावर ताण येतो, यासंदर्भात उपाययोजना करण्यात येईल काय, निवासी डॉक्टरांचे शासकीय निवास स्थान सुधारण्यासाठी समिती गठीत करुन प्रयत्न

...5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.राहूल आहेर.....

करण्यात येतील काय ? कामाच्या ताणा संदर्भात एक उदाहरण देतो की, जे.जे.हॉस्पिटलमध्ये अर्थोपेडीकचे दोन युनिट आहेत त्यामुळे तेथील डॉक्टरांना 8 तासांची ड्यूटी असली तरी ते 24 तास इमर्जन्सी ड्यूटीवर असतात व दुसऱ्या दिवशी ओ.पी.डी. किंवा ओ.टी. च्या ड्यूटीवर असतात, त्यामुळे जे.जे.हॉस्पिटलमधील अर्थोपेडीक युनिटमध्ये वाढ करण्यात येईल काय ?

यानंतर D-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 49721.....

श्री.विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, निवासी डॉक्टरांची राहण्याची व्यवस्था ज्या स्तरावर असायला पाहिजे तशी होत नाही. या निवासी डॉक्टरांच्या संघटनेबरोबर चर्चा झाली त्यावेळेस हे करण्यात आले. त्यामुळे टप्प्या-टप्प्याने कशी सुधारणा करता येईल याचा विचार करण्यात येईल. कारण निधीतून आधी रुग्णांची औषधे, उपकरणे यावर जास्त खर्च होतो आणि मग या सर्व गोष्टींवर खर्च कमी होतो. निवासी डॉक्टरांसाठी स्थानिक लोकप्रतिनिधींच्या निधीतून काही करण्याची परवानगी नियोजन विभागाकडून घेता आली तर, आमदार, खासदार निधीतून काही सुविधा देता आल्या तर तसा विचार येत्या काळात करण्यात येईल. जे.जे. हॉस्पीटलच्या संदर्भात जे सांगितलेले आहे त्याबाबतही विचार करण्यात येईल.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, राज्यातील निवासी डॉक्टरांच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. डॉक्टरांवरील असलेला ताण कमी करण्याच्या दृष्टीकोनातून ज्या दोन गोष्टींची आवश्यकता आहे. त्यामध्ये त्यांना चांगल्या सुविधा उपलब्ध करुन देणे आणि त्या सुविधांसाठी निधी कुठून उपलब्ध करायचा तर तो निधी बजेटमधून झाला तर ठीक, नाही झाला तर सन्माननीय सदस्य ज्याचा संदर्भ देत आहेत त्या सन्माननीय सदस्यांनी आपल्या आमदार निधीतून निदान आपल्या मतदारसंघातील हॉस्पीटलपुरता जरी निधी उपलब्ध करुन दिला तरी योग्य सुविधा निर्माण करुन देता येतील. माझा मुख्य प्रश्न असा आहे की, काल मी टीव्हीवर बघत होतो. राज्यातील काही निवासी डॉक्टर प्रतिक्रिया देत होते आणि गेल्या अनेक दिवसांपासून त्यांना स्टायपेंड मिळाले नाही. अशाप्रकारची भावना ते व्यक्त करीत होते. मला मंत्री महोदयांना एवढेच विचारायचे आहे की, राज्यातील डॉक्टरांना गेल्या दोन वर्षापासून स्टायपेंड मिळाले नाही. मराठवाड्यातील डॉक्टरांना तुम्ही तुमच्या स्टायपेंडमधूनच फी भरा अशाप्रकारच्या काही सूचना सरकारने दिल्या आहेत काय? आणि जर दिल्या असतील तर मराठवाड्यातील निवासी डॉक्टरांना त्यामध्ये रिलीफ देणार काय हा एक प्रश्न आहे. निवासी डॉक्टरांना जे स्टायपेंड देण्यात येत आहे ते दिले नसेल तर या महिनाअखेर स्टायपेंडचे पूर्ण पैसे देण्याचे काम शासन करणार काय?

श्री.विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे-पाटील म्हणाले की, स्टायपेंड देत नाही. नंतर म्हणाले की स्टायपेंडमधूनच फी द्या असे म्हणत आहात.

..........2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 49721.....

श्री.विनोद तावडे......

टीव्हीवरील विषयामुळे असा गोंधळझाला असेल. स्टायपेंड सगळ्यांना वेळच्या वेळी मिळतो. विशिष्ट आरक्षित कोट्यातील विद्यार्थ्यांना समाजकल्याण विभागामार्फत जे शुल्क देण्यात येते. त्याचा नियम असा आहे की, ज्याला असे वेतन मिळते त्याला स्कॉलरशीप मिळणार नाही. स्कॉलरशीप मिळायची असेल तर हा स्टायपेंड मानायचा, पगार मानायचा हा निर्णय समाजकल्याण विभागाने करायचा आहे. विद्यार्थी परीक्षेला बसत असताना अजून त्यांनी फी भरली नाही म्हणून परीक्षेला बसायला मिळेल की नाही. याआधी परीक्षेला बसायला दिल्यानंतर वित्त विभागाने त्या-त्या डीनवर हे पैसे लावलेले आहेत. त्यामुळे कुठलाही डीन त्यावर सही करायला तयार नाही. याबाबत समाजकल्याण विभागाकडून आठवडाभरात स्पष्ट निर्णय घेऊन ते जर देणार असतील तर स्टायपेंडमधून घेण्याची गरज नाही. पण देणार नसतील तर विद्यार्थ्यांना त्यांची फी द्यावी लागेल याची स्पष्टता आठवडाभरात करण्यात येईल.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना स्टायपेंड मिळतो आणि विद्यार्थ्यांना स्कॉलरशीप मिळते. स्टायपेंड हा सरसरकट विद्यार्थ्यांना मिळतो. परंतु स्कॉलरशीप जी आहे ती एकतर बुध्दीवान विद्यार्थ्यांना मिळते किंवा सोशली किंवा इकोनॉमिकली सेक्शनमधील लोकांना मिळते. त्यामुळे तुम्हाला स्कॉलरशीप मिळाली म्हणून स्टायपेंड देणार नाही किंवा स्टायपेंड दिला म्हणून स्कॉलरशीप देणार नाही ही भूमिका आहे. ही भूमिका विद्यार्थ्यांवर अन्याय करणारी आहे. डीनकडून पैसे वसूल करा असा जर कोणी जीआर काढला असेल तर त्या अधिकाऱ्यांना घरी पाठवायला पाहिजे. अशाप्रकारची भूमिका राज्यामध्ये घेता येणार नाही. कारण स्टायपेंड मिळण्याचा विद्यार्थ्यांचा अधिकार आहे आणि स्कॉलरशीप मिळण्याचा अधिकारही त्या विद्यार्थ्यांचा आहे. याबाबतचा निर्णय शासनाने घ्यायला पाहिजे तो घेणार काय?

श्री.विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, स्टायपेंड हा सगळ्यांना मिळतो. कुणालाच मिळत नाही असे नाही. ज्या बातम्या आपण टीव्हीवर बघितल्या त्या स्कॉलरशीपबाबत आहेत. माझे म्हणणे असे आहे की, एक विषयाचा धोरणात्मक निर्णय समाजकल्याण विभाग आणि वैद्यकीय शिक्षण विभागाने घ्यायला पाहिजे. ज्यांना स्टायपेंड मिळतो तो पगार धरायचा का नाही याबाबत लॉ आणि ज्युडिशिअलचे मत घेत आहोत. याबाबतचा निर्णय 8 दिवसांमध्ये देण्यात येईल.

........3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 49721.....

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सभागृहामध्ये ज्यावेळी माननीय मंत्री महोदय उत्तर देतात त्यावेळी ते शासनाचे प्रतिनिधी म्हणून उत्तर देत असतात. मग समाजकल्याण विभागाने काय भूमिका घेतली, आदिवासी विभागाने काय भूमिका घेतली, वित्त विभागाने काय भूमिका घेतली असे डिफरेंशिएट सभागृहामध्ये करता येणार नाही. मी हेच सांगितले की, स्टायपेंड सगळ्यांना मिळतो. स्टायपेंड मिळतो स्कॉलरशीप देता येणार की नाही अशी शंका जर कोणी उपस्थित करीत असेल तर ते ओव्हर रूल करायला पाहिजे. तुमचा निर्णय त्यामध्ये द्यायला पाहिजे आणि विद्यार्थ्यांना न्याय द्यायला पाहिजे. माझा हाच हरकतीचा मुद्दा आहे यावर रुलिंग द्या की, यासंदर्भामध्ये मंत्री महोदयांनी उत्तर देताना वित्तशी बोलू, समाजकल्याणशी बोलू असे सभागृहात बोलून चालणार नाही. सभागृहात उत्तर द्यायच्या आधी कुणाशी बोलायचे असेल त्यांच्याशी बोलून या.

**अध्यक्ष :** त्यांच्या खात्यापुरत्या प्रश्नाचे उत्तर त्यांनी दिलेले आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, त्यांच्या खात्यापुरता प्रश्न नाही शेवटी स्कॉलरशीप जी द्यायची आहे ती समाजकल्याण विभागाने द्यायची आहे.

श्री.गणपतराव देशमुख : अध्यक्ष महोदय, शासनाच्या वतीने उत्तर द्यायलाच पाहिजे.

श्री.विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, शासनाच्या वतीने उत्तर देतो. थोडी आधी स्पष्टता दिली तर चुकले. या विषयाबाबत योग्य तो निर्णय शासन थोड्याच दिवसात घेईल.

श्री.राजेंद्र नगरधाने : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी निवासी डॉक्टरांचा ताण कमी करण्यासाठी याठिकाणी प्रश्न विचारला. त्यावर मंत्री महोदयांनी उत्तर दिले की, आम्ही डॉक्टरांच्या कामाचे नियोजन करू. ग्रामीण भागामध्ये दोन डॉक्टरांच्या जागा असतात त्याठिकाणी एक डॉक्टर पोष्ट ग्रॅज्युएशनसाठी कायमस्वरूपी निघून जातो. ते पद रिक्तही दाखविले जात नाही. ज्याठिकाणी एकच डॉक्टर आहे अशा डॉक्टरांच्या कामाचे नियोजन काय करणार. 24 तास सेवा द्यायची आहे. महाराष्ट्रासाठी धोरणात्मक निर्णय शासन घेणार काय हा माझा प्रश्न आहे.

श्री.विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, सजेशन फॉर ॲक्शन. याबाबत कारवाई करण्यात येईल.

------------

.....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**जळगाव जिल्हा तसेच पाचोरा तालुक्यात केशरी कार्डधारकांना**

**नियमित धान्य पुरवठा करण्यासंदर्भात**

**(3) *45959 श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर)** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) जळगाव जिल्ह्यात केशरी कार्डधारकांपैकी सुमारे 55 टक्के कार्डधारकांना धान्य मिळत नसल्याचे माहे फेब्रुवारी, 2016 मध्ये वा त्या दरम्यान निदशर्नास आले, हे खरे आहे काय,

(2) तसेच पाचोरा (जि.जळगाव) तालुक्यात माहे नोव्हेंबर, 2014 पासून केशरी कार्डधारकांना धान्य पुरवठा होत नाही तसेच या तालुक्यात वितरण व्यवस्थेकडून केशरी कार्डच उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, या संदर्भात मा.अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांना एक निवेदन दिले होते व त्यानुसार मा.मंत्री महोदयांनी केशरी कार्डधारकांना तातडीने धान्य वितरीत करण्यात येईल असे आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, उक्त केशरी कार्डधारकांना नियमित धान्य पुरवठा करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (1) होय.

(2) होय. परंतु, तद्नंतर माहे फेब्रुवारी, 2016 मध्ये कोऱ्या शिधापत्रिका उपलब्ध झाल्यानंतर, केशरी शिधापत्रिकांचे वितरण सुरळीत सुरु आहे.

(3) व (4) अशा आशयाचे निवेदन मा.मुख्यमंत्री यांच्याकडे प्राप्त झाले होते. सध्या राज्यामध्ये सुरु असलेल्या शिधापत्रिकांच्या आधार सिडींगचे काम पूर्ण झाल्यावर राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, 2013 अंतर्गत समाविष्ट न झालेल्या लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ देण्याबाबतचा निर्णय घेण्याबाबत, दिनांक 15 जानेवारी, 2016 च्या शासन निर्णयान्वये निर्णय घेण्यात आला आहे.

(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.किशोर पाटील : अध्यक्ष महोदय, जळगाव जिल्ह्यामध्ये सन 2011 पासून साडेचार लाख शिधापत्रिकांची मागणी केलेली आहे. परंतु सन 2001 ते 2016 पर्यंत फक्त दोन लाख केसरी

.....6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.45959.........

श्री.किशोर पाटील........

कार्ड प्राप्त झालेले आहेत. पूर्ण जिल्ह्यामध्ये अजूनही अडीच लाख केसरी कार्डधारक कार्ड मिळविण्यासाठी फिरत आहेत हे खरे आहे काय? आणि दुसरा प्रश्न असा आहे की, 50 पैशांपेक्षा कमी आणेवारी असलेल्या जिल्ह्यांमध्ये अन्न सुरक्षा योजना लागू करण्यात आलेली आहे. जळगाव जिल्ह्यातही 50 पैशापेक्षा कमी आणेवारी असलेला जिल्हा आहे. दुष्काळही जाहीर झालेला आहे. परंतु एकमेव जळगाव जिल्हा अन्न सुरक्षा योजनेमध्ये घेतला गेलेला नाही तो चालू होईल काय?

E-1.........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.45959......

श्री. गिरीश बापट : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. किशारे पाटील यांनी जो प्रश्न विचारला, त्यामध्ये सन 2011 पासून आतापर्यंत एपीएलच्या संदर्भातील कार्डांची माहिती विचारली. यामध्ये अंत्योदय योजना, एपीएल, बीपीएल आणि आदिवासी आश्रमशाळांना सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून अन्नधान्य देत असतो. त्यामुळे अडीच लाख किंवा तीन लाख शिधापत्रिका देण्याच्या राहिल्या आहेत, ही माहिती काही बरोबर नाही.

अध्यक्ष महोदय, मधल्या काळामध्ये वर्ष दीड वर्षापूर्वी अन्न सुरक्षा योजनेचा कायदा झाल्यानंतर बोगस कार्डे शोधण्याची ज्यावेळी मोहीम सुरू केले तेव्हा त्यामध्ये कार्डे तपासण्याची मागणी आली त्या ठिकाणची कार्डे आपण तपासून देत होतो. साधारणपणे हजार ते दीड हजार केसरी कार्डे आपल्या जिल्ह्यामध्ये कमी पडली होती. आता आपण तालुका पातळीवर, शहर पातळीवर....

**अध्यक्ष :** सन्माननीय मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे व त्यानंतर आपण बोलावे. आपला प्रश्न आहे की, पॉईन्ट ऑफ ऑर्डर आहे. सन्माननीय सदस्य श्री. किशोर पाटील उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपल्याला पुन्हा प्रश्न विचारण्याची मी संधी देतो.

श्री. गिरीश बापट : अध्यक्ष महोदय, जी कार्डे कमी पडली होती त्या बाबतीत सांगू इच्छितो की, ही कार्डे आपण राज्य स्तरावर छापतो, कारण त्यांचा काळाबाजार होतो. त्यामुळे सन्माननीय सदस्यांना उपप्रश्न विचारता येत असल्यामुळे मी माझे उत्तर पूर्ण करतो. कारण मी या ठिकाणी पुराव्यनिशी माहिती देत आहे.

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री. गुलाबराव पाटील साहेब आपण मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण झाल्यानंतर उपप्रश्न विचारावा.

श्री. गिरीश बापट : अध्यक्ष महोदय, आधार कार्डाच्या संदर्भात आपण जेव्हा आधार लिंकिंग सुरू केले तेव्हा आपले कार्ड दुकानात घेऊन या त्यावर आधार कार्ड लिंकअप करा आणि त्यानंतर आपल्याला रेशन मिळेल अशा प्रकारचा निर्णय आपण घेतला. आज महाराष्ट्रात आधार लिंकिंगमध्ये माननीय न्यायालयाने निर्णय दिले की, आधार हे वैध आहे वगैरे. पण आता पार्लमेंटमध्ये त्याचा ॲक्टच झाला आहे. आज जवळ जवळ 78 टक्के आधार कार्डाचे लिंक अप हे महाराष्ट्रात झालेले आहे की, ज्याचा उपयोग भविष्यात बोगस कार्डे शोधण्यासाठी होणार आहे. ज्याच्याकडे अशा

2.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.45959......

श्री. गिरीश बापट......

प्रकारचे कार्ड असेल त्यालाच रेशन मिळणार आहे. त्यामुळे मधल्या काही काळामध्ये ही कार्डे रेशन दुकानात घेऊनच जायची नाहीत, कारण त्यावर आधार लिंकअप होईल किंवा बोगसा आहेत, त्यामुळे याची मोहीम विभागाने आखली होती आणि म्हणून मला सभागृहाला सांगण्यास आनंद होतो की, आपण या आधार लिंकिंगच्या माध्यमातून 18 ते 22 टक्के बोगस कार्डे शोधलेली आहेत. यानंतर वर्षभरामध्ये 14 हजार कोटी रुपयांचे अन्नधान्य आपण रेशन दुकानांमार्फत राज्याला देत असतो. सांगली आणि पुणे येथे प्रयोग केला. त्यामुळे दुकानांमध्ये आता बोगस कार्डे कमी येण्यास सुरूवात झाल्यामुळे 1-1 हजार मेट्रिक टनचे धान्य उचलच कमी झाली. कारण रेशनकार्डे कमी झाल्यामुळे ती येत नाहीत. त्यामुळे कार्डाची कमतरता नाही. आधार लिंकअपसाठी काही जण येत नाहीत, कारण ते बोगस आहेत. पण जळगांव जिल्ह्याचे आपण सांगितले, या संदर्भात मी 8 दिवसात तपास मोहीम लावतो. पण इतका आकडा तेथे नक्की नाही. म्हणून पांढरे रेशनकार्ड असो, भगवे रेशनकार्ड असो, अशी सर्व रेशनकार्डे आता मागेल त्याला आपण देतो. फक्त त्यावर रेशनकार्डाचे शिक्के मारणे किंवा आधार लिंकअप करणे हे काम शिल्लक आहे. त्यामुळे आता आपल्या जिल्ह्यामध्ये एवढी मोठी संख्या नाही. माझ्या माहितीप्रमाणे काही 2,4,5 हजार संख्या होती आणि त्यांनाही कार्डे देण्याचे काम आपण केलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. किशोर पाटील हे मघापासून आग्रह करीत होते की, पाचोरा तालुक्यातून एकूण एक हजार केसरी शिधापत्रिका दिल्या आहेत. गत चार वर्षामध्ये 11500 शिधापत्रिकांचे वितरण करण्यात आले आहे.

श्री. किशोर पाटील : अध्यक्ष महोदय, पाचोरा तालुक्यामध्ये 50 हजार शिधापत्रिकांची आवश्यकता असताना मी गेल्या वर्षभरापासून आरोळ्या मारत होतो. पालकमंत्री महोदयांकडे हा प्रश्न मांडल्यानंतर आम्हाला अधिकाऱ्यांकडून उत्तर दिले जाते की, जळगांव जिल्ह्याची 2011 मध्ये साडेचार लाख केसरी कार्डांची आम्ही मागणी केलेली आहे. वरच्या स्तरावरुन आम्हाला अशा कार्डांची अजून छपाई झालेली नाही म्हणून केसरी कार्ड मिळालेली नाहीत असे उत्तर मिळाते. वर्षभर बोंबा मारत असताना आणि माझा एलएक्यू लागल्यानंतर फक्त एक हजार कार्डे दिली गेली. दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही, तो म्हणजे जळगांव जिल्हा दुष्काही जिल्हा असताना दिनांक 24 जुलै 2015 रोजीच्या जी.आर.नुसार 14 जिल्हे घेतले गेले, त्यामधून जळगांव जिल्हा वगळलेला आहे तर या जळगांव जिल्ह्याचा समावेश करण्यात येणार आहे काय ?



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.45959......

श्री. गिरीश बापट : अध्यक्ष महोदय, यामध्ये जळगाव जिल्हा घ्यायचा किंवा नाही याबद्दल शासन निर्णय घेणार आहे. पण आता मराठवाड्यातील 8 जिल्हे, अमरावती विभागातील 5 आणि नागपूर विभागातील वर्धा जिल्हा असे जिल्हे आपण घेतले आहेत. या जिल्ह्यांमधील अल्पभूधारक शेतकऱ्यांनी सातबारा दाखविला की, त्यांना माणसी 5 किलो याप्रमाणे धान्य देण्याचा निर्णय घेतला असून त्यामध्ये जळगाव जिल्हा नाही. हा कॅबिनेटचा निर्णय आहे. कारण प्रथम दुष्काळी परिस्थितीला सामोरे जावे म्हणून अंदाज घेतला आहे. त्यानुसार मागच्या वर्षी त्याचा लाभ 25 ते 28 लाख शेतकऱ्यांना द्यावा लागेल असा अंदाज होता. पण आता ती संख्या 68 लाखावर गेली आहे. ही संख्या कितीही वाढली तरी अल्पभूधारक शेतकऱ्यांना माणसी 5 किलो धान्य दिले जाईल असा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यासाठी लागणाऱ्या निधीची व्यवस्था केलेली आहे. त्यामुळे जळगाव जिल्हा दुष्काळग्रस्त घोषित करण्याच्या निर्णय राज्य शासनाला घ्यावा लागेल. पण सध्या जे जिल्हे घेतले आहेत ते वरीलप्रमाणे आहेत. आता आपण जो प्रश्न विचारला की, जिल्ह्यामध्ये आतापर्यंत 1 लाख 57 हजार केसरी शिधापत्रिका दिल्या आहेत. 3 लाख 25 हजार पिवळ्या शिधापत्रिका दिल्या आहेत. त्यामुळे शिधापत्रिकेची जो रितसर मागणी करतो त्याचे व्हेरिफिकेशन करुन त्यावर आधार लिंकअप करण्यात येते. जळगाव जिल्ह्यामध्ये अजूनही ज्या शिधापत्रिका द्यावयाच्या आहेत त्याचे एक महिन्याच्या आत वाटप करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येईल.

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री. गुलाबराव पाटील आपणास यानंतर बोलण्याची संधी देतो.

डॉ. पतंगराव कदम : अध्यक्ष महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी अशी घोषणा केली आहे की, मागेल त्याला कार्ड, पण ही वस्तुस्थिती नाही. सांगली जिल्ह्यामध्ये दोन तीन तालुक्यामध्ये मी मेळावे घेतले होते, त्यावेळी 50 टक्क्याहून अधिक गरीब लोकांनी आम्हाला कार्डे मिळाली नाहीत असे सांगत होते.

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्य डॉ. पतंगराव कदम साहेब हा जळगाव जिल्ह्याचा प्रश्न आहे.

डॉ. पतंगराव कदम : अध्यक्ष महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे मागेल त्याला कार्ड आणि हा धोरणात्मक निर्णय आहे. त्यामुळे आपण हे धोरण काटेकोरपणाने राबवाल काय ?

श्री. गिरीश बापट : अध्यक्ष महोदय, काटेकोरपणाने राबवू.

4.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.45959......

श्री. गुलाबराव पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी उत्तर दिले आहे की, मागेल त्याला कार्ड आम्ही देणार आहोत. अधिवेशन सुरू होण्यापूर्वी 5 दिवस अगोदर प्रांत, तहसिलदार आणि मी अशी आमची धरणगाव तालुक्याची बैठक झाली. माझे म्हणणे पूर्णपणे ऐकून घ्यावे आणि जर हे खोटे असल्यास मी सभागृहाच्या बाहेर निघून जाईल. या बैठकीमध्ये त्यांनी सांगितले की, छपाई न झाल्यामुळे आम्ही कार्डे देऊ शकत नाही. शासनाचे तसे जोपर्यंत आदेश येऊ शकत नाहीत तोपर्यंत आम्ही कार्डे देऊ शकत नाही. आपण अनुमती देत असाल तर आपला विभाग कसा आहे ते मी आपल्या निदर्शनास आणून देतो. आपण एका गावातील रेशन दुकान सुरू करण्याचा आदेश दिला आहे. त्याला आदेश देऊन आता 7 महिने झाले आहेत तरी देखील आपले पुरवठा अधिकारी त्या गावाचे रेशन दुकान सुरू करीत नाहीत असे आपले खाते आहे.

F-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.45959.....

श्री.गुलाबराव पाटील .......

तम्ही शिधापत्रिका मागितली तर देता. डयुब्लीकेट शिधापत्रिकेचे पैसे भरले तर तुम्ही लगेच शिधापत्रिका देण्याचा प्रयत्न करता. आता ते सुध्दा बंद केले आहे. तुम्ही आमची वस्तुस्थिती समजून घ्या. तुमच्या खात्याचा टारगेट करुन आम्हाला काही बक्षिस मिळणार नाही. मूळात त्या गोष्टीशी गरीब लोकांचा संबंध येतो. जिल्हयातील स्थानिक आमदाराचे जर तुम्ही समजून घेत नसाल तर तुम्हाला हात जोडून विनंती आहे की, तुम्ही स्पेसिपिकली जळगांव जिल्हयामध्ये यावे. नुसते आदेश देतो, महिन्याभराने करतो जर आम्ही तेथे फोन केल्यानंतर एखाद्याला रेशन कार्ड मिळत नसेल तर कसली आमदारकी राहिली. याबाबत तुम्ही प्रांत यांना विचारावे. तालुक्याच्या पाणी टंचाईच्या आढाव्याची बैठक घेतली त्या मिटींगमध्ये उत्तर दिले. त्याच्या मिनिस्टस्‌मध्ये म्हटले आहे की, छपाई न झाल्यामुळे आम्ही रेशन कार्ड देऊ शकत नाही. अशा पध्दतीची उत्तरे दिली जात आहे. आमची विनंती आहे की, मागे जे झाले ते सोडून द्या. आता स्पेसिफिक टाईम बॉंड प्रोग्राम द्या. अमूक एक डयुब्लिकेट देतो ? आम्ही डयुब्लिकेट दिली का ? ज्यांनी दिली आहे त्याला पहावे. आम्हाला ओरिजनल कार्ड द्या. डयुब्लीकेट लोकांकरिता जो सच्चाईमध्ये लाईनमध्ये उभा दवाखान्याकरिता रेशन कार्ड मिळाले नाही तर त्याला लाभ मिळत नाही. कोणाचे बायपासचे ऑपरेशन असेल त्याला लाभ मिळत नाही. आम्हाला विनंती करुनही तो लाभ मिळत नाही. रेशन कार्ड करिता एखादा रुग्ण मरुन जात असेल, मंत्रिमहोदय सांगतील असतील कागदोपत्री तर ही गोष्ट चुकीची आहे. माझी विनंती आहे की, तुमच्या पुरवठा अधिका-याला आमच्या बरोबर बोलवा, मग बघा काय होते. यातून सत्य बाहेर आले नाही तर बोला. चुकीची माहिती रेकॉर्डवर येते, अधिकारी चुकीची माहिती देतात, मंत्रीमहोदय आपले काम स्वच्छ आहे. मी आपल्याला विनंती करतो की, आमची रेशन कार्डस्‌ची मागणी आहे तेवढे रेशन कार्डस्‌ द्या. जे डयुब्लिकेटस्‌ कार्डस्‌ असतील ती रद्द करा. त्याबाबत आमचे काही म्हणणे नाही. जळगाव जिल्हा काही मागच्या आईचा आहे का ? तुम्ही असे म्हणता बी.पी.एल. कार्डमध्ये घेणार नाही ? तिन वर्षापासून जळगांव जिल्हयात दुष्काळ आहे. विदर्भातील 8 जिल्हयांना देता त्याला विरोध नाही. आम्ही मागणी करतो विदर्भाला द्या. शासन म्हणते जळगांवला देणार नाही. म्हणजे काय आहे ? आमची विनंती आहे

.....2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.45959.....

श्री.गुलाबराव पाटील .....

की, आपण याबाबत निर्देश दिले पाहिजेत. आपण शेतक-याचे पुत्र आहात. शेतक-याचे पुत्र म्हणून शासनाला निर्देश द्या. एका जिल्हयाचा सरकारवर फार मोठा भार पडणार नाही. सरकार म्हणून आपण सरकारला निर्देश दिले पाहिजेत की, जळगाव जिल्हयाचा सुध्दा अंत्योदयमध्ये समावेश केला जाईल. आपल्याला हात जोडून विनंती आहे. तिन वर्षापासून गारपीठ, दुष्काळ यामुळे आम्ही होरपळून गेलो आहोत. याबाबत माननीय श्री.गिरीष बापट यांनी लवकरात लवकर शिधापत्रिका द्याव्यात अशी प्रार्थना करतो.

श्री.गिरीष बापट : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी पोटतिडकीने विषय मांडला आहे. मी मगाशी सांगितले की, राज्यभर एकत्रित शिधापत्रिका छापत असल्यामुळे जेवढी मागणी होती तेवढया शिधापत्रिका दिल्या आहेत. अजूनही शिधापत्रिका द्यायच्या राहिल्या असतील तर त्या एक महिन्याच्या आत दिल्या जातील. मलाही कल्पना आहे की, तिन, चार वर्षापासून जळगांव जिल्हयामध्ये दुष्काळासारखी परिस्थिती आहे. म्हणून सांगतो आपल्या जिल्हयामध्ये हे अधिवेशन संपण्यापूर्वी तिस-या आठवडयामध्ये जळगांव जिल्हयातील सर्व आमदारांची या खात्याच्या सेक्रेटरीपासून पुरवठा अधिका-यांची बैठक घेऊ. तो पर्यंत जिल्हा व तालुक्यातील आमदारांना पत्र लिहितो. जेवढी कार्ड द्यायची राहिली असतील तेवढी या अधिवेशनानंतर 15 दिवसांमध्ये कार्डस् देण्याचा विचार होईल. यानिमित्ताने मला सभागृहाला सांगावेसे वाटते ही सर्व परिस्थिती पाहिल्यानंतर बी.पी.एल. ला आपण देतो. 14 जिल्हयातील शेतक-यांना देतो. या 14 जिल्हयातील शेतमजूरांना देण्याच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी प्रश्न मांडला. म्हणून जेथे रेशन द्यायचे आहे असे 14 जिल्हे दुष्काळी जाहीर केले. तेथील 68 लाख शेतक-यांना देऊन देखील शेतमजूरांना आता बी.पी.एल.मध्ये नाव नसल्यामुळे धान्य मिळत नाही. सरकारच्या ही बाब विचाराधीन आहे. यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी बैठक बोलाविलेली आहे. महाराष्ट्रातील

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.45959.....

श्री.गिरीष बापट.........

दुष्काळी परिस्थितीत सध्या बी.पी.एल.खाली असलेल्या शेतमजुरांना धान्य मिळत नाही तसेच ए.पी.एल.ची यादी सुध्दा दिली जात नाहीत. अशा शेतक-यांची व शेतमजूरांची संख्या कितीही असो त्यांना रेशन कार्ड देण्याच्या संदर्भात सरकार सकारात्मक विचार करीत आहे.

श्री.गुलाबराव पाटील : अध्यक्ष महोदय, आताच माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, डयुब्लिकेट कार्डस् कमी केल्यामुळे 1000 मेट्रीक टन धान्य वाचले. डयुब्लिकेटवाले खाऊन गेले. गरीब शेतक-यांना धान्य द्या. तुम्हाला आर्शिवाद देतील. डयुब्लिकेट होते ते खाऊन गेले. जो शेतकरी तिन वर्षापासून दुष्काळाच्या लाईनमध्ये उभा आहे त्याला कार्ड देत नाही. याबाबत निर्देश द्यावेत. हे बरोबर नाही. विदर्भाला देता याबाबत आम्ही काही बोललो नाही. विदर्भाच्या मागे आम्ही उभे आहोत. चार जिल्हयांचा उत्तर महाराष्ट्र आहे म्हणून त्याकडे लक्ष द्यायच नाही का ? अध्यक्ष महोदय, तुम्ही मराठवाडयाचे आहात आपण याबाबत बोलले पाहिजे. जळगांव जिल्हयातची अशी परिस्थिती आहे की, तेथील लोक गुजरातमध्ये जातील. अध्यक्ष महोदय, आपल्याला हात जोडून विनंती आहे की, याबाबत आपण निर्णय घ्यावा. एका जिल्हयाला कार्डस दिले तर काही फरक पडत नाही. डयुब्लिकेट खाता आहेत ते मंत्री महोदय कबुल करीत आहेत. ओरिजनल लोकांना कार्डस देत नाहीत. ब्राम्हण देवता जरा दया करा.

**अध्यक्ष** : मंत्री महोदय आपण अधिवेशन संपण्याच्या आधी जळगांव जिल्हयासंबंधी निर्णय घ्यावा.

श्री.गिरीष बापट : जळगांव जिल्हयासंबंधी निर्णय घेण्यात येईल.

श्री.बबनराव शिंदे : अध्यक्ष महोदय, मराठवाडा आणि विदर्भामध्ये 14 जिल्हयांमध्ये अन्न सुरक्षा योजना लागू केलेली आहे. जळगाव, सोलापूर, अहमनगर असेल सोलापूर नगरमध्ये 1000 गावे दुष्काळगस्त जाहीर झालेली आहेत.

**अध्यक्ष** : प्रश्न सोलापूरचा नाही. आपण प्रश्नाच्या बाहेर जाऊन प्रश्न विचारत आहात.

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.45959.....

श्री.सुरेश भोळे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, जळगाव शहर आणि ग्रामीणचे एकच तहसिल कार्यालय असल्यामुळे माझे रेशन कार्डस् संदर्भात प्रश्न होते. त्यावर मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. याबाबत त्यांनी मिटीग सुध्दा लावून दिली होती. त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. माझी आपल्या माध्यमातून विनंती आहे की, जळगाव शहर आणि ग्रामीणचे एकच तहसिल कार्यालय असल्यामुळे जळगाव शहराचे वेगळे तहसिल कार्यालय करावे. जळगांव ग्रामीण हे एकच कार्यालय असल्यामुळ तेथे कामाचा ताण पडतो व लोकांना रेशन कार्डस् मिळत नाही. एकच अधिकारी असल्यामुळे लोकांना वारंवार फे-या माराव्या लागतात. म्हणून जळगाव शहरासाठी वेगळा तहसिलदार द्यावा.

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी याबाबत माननीय महसूल मंत्र्यांकडे मागणी करावी.

श्री.गिरीष बापट : अध्यक्ष महोदय, ऑफिसच्या संदर्भात शासकीय जागा उपलब्ध करुन तेथे दोन कार्यालये करुन देण्यात येतील व एक महिन्याच्या आत नवीन तहसिलदार उपलब्ध करन देण्यात येईल.

.............

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**राज्यातील अनेक ठिकाणी पॅकबंद वस्तुंची विक्री छापील किंमतीपेक्षा जास्त दराने होत असल्याबाबत**

(4) *47709 **श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर):** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील अनेक ठिकाणी शीतपेये, पाण्याची बाटली, प्लॅस्टिक पिशवीतील दूध यांच्यासह अन्य पॅकबंद वस्तुंची विक्री करताना त्या छापील किंमतीपेक्षा जास्त दराने विक्री होत असल्याचे वारंवार निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी व लोकजागृती व्हावी आणि समाजातील विविध घटकांकडून अशा घटनांबाबत प्रतिसाद मिळावा जेणेकरुन प्रशासनाला त्यावर तात्काळ कारवाई करता येईल या हेतूने अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत वैधमापन शास्त्र यंत्रणेने दक्षता समिती गठीत केल्याचे माहे जानेवारी, 2016 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, राज्यात किती ठिकाणी अशा दक्षता समित्यांची स्थापना करण्यात येणार आहे तसेच सदरहू दक्षता समितीचे कार्य काय आहे व त्याचा ग्राहकांना कशा प्रकारे फायदा होणार आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश बापट :** (1) व (2) हे खरे आहे.
(3) सदर दक्षता समित्या राज्यस्तरीय व महानगरपालिका स्तरावर गठित करण्यात येणार आहेत.

आवेष्टित स्वरुपात वस्तुंच्या छापील किंमतीपेक्षा अधिक दराने विक्री होत असलेल्या गैरप्रकारास आळा घालण्याच्या दृष्टीकोनातून स्थानिक पातळीवर लोकसहभागातून स्थानिक ग्राहकांचे प्रबोधन करणे, आवेष्टित स्वरुपातील वस्तूची छापील किंमतीपेक्षा अधिक होत असल्यास त्याबाबत संबंधित निरीक्षक, वैध मापन शास्त्र यांना अवगत करणे, ग्राहकांची फसवणूक होऊ नये म्हणून आवेष्टीत वस्तुंच्या वितरण व्यवस्थेमध्ये करावयाच्या सुचना व वितरण व्यवस्थेतील आढळलेल्या त्रुटीबाबत संबंधित संस्था, अधिकारी यांना शिफारशी करणे इ.कार्य सदर समिती करेल.

सदर समिती लोकसहभागातून स्थानिक पातळीवर ग्राहकांचे प्रबोधन करणार असून गैरप्रकार करणाऱ्या दुकानदारांची माहिती कारवाईसाठी सक्षम प्राधिकाऱ्याकडे पाठविणे तसेच वितरण व्यवस्थेतील सुधारणा वा त्यातील त्रुटी याबाबत संबंधीत अधिकाऱ्यांना शिफारशी करणार असुन सदर सदस्यांची नावे दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक सर्व सभासदांना जाहीर करण्यात येणार असल्याने ग्राहक अशा समिती सदस्यांशी संपर्कात राहून त्यांची संभाव्य फसवणूक टळू शकेल तसेच गैरप्रकार करणाऱ्या दुकानदाराची माहिती ही समिती सक्षम प्राधिकाऱ्याकडे पाठविणार असल्याने संबंधीत सक्षम प्राधिकारी अशा दुकानदारा विरुध्द वेळीच कायदेशीर कार्यवाही करतील त्यामुळे अशा गैरप्रकारास आळा बसेल. परिणामी ग्राहकांचे आर्थिक शोषण थांबेल.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

----------------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.47709.....

श्री.योगेश सागर : अध्यक्ष महोदय, हा प्रश्न पूर्ण होणार नाही. दोन मिनिटात आम्ही प्रश्न काय विचारणार, त्यावर मंत्री उत्तर देणार काय ? हे कसे शक्य होणार ? कमीत कमी या प्रश्नाला न्याय द्यावा, एवढीच माझी विनंती आहे.

श्री.जयकुमार रावल : अध्यक्ष महोदय, कुठल्याही दुकानामध्ये जातो तेव्हा ज्या खुल्या वस्तु आहेत. पिण्याची बॉटल असेल, छोटे चिप्स असतील ग्राकांना संरक्षण नसल्यामुळे कुठल्याही परिस्थितीमध्ये दुकानदार मागेल ती किंमत द्यावी लागते. कुठे 15 रुपये, कुठे 25 रुपये. वेळ कमी असल्यामुळे माझे मंत्री महोदयांनी तिन स्पेसिफिक प्रश्न आहेत. दरवर्षी एप्रिलच्या महिन्यामध्ये बेंचमार्क तयार करुन या सर्व खुल्या वस्तुस्थिती किंमत ही ठरवून जाहीर करणार का ? जर कोणी या किंमतीपेक्षा जास्त किंमत मागत असेल ग्राहकांच्या संरक्षणासाठी हेल्पलाईन तयार करणार का ? असा कोणी चुकत असेल तिन महिन्यांच्या आत कन्झ्युमर कोर्ट असणार आहे का ?

श्री.गिरीष बापट : अध्यक्ष महोदय, शासनाची ऑलरेडी राज्य ग्राहक हेल्प लाईन आहे. त्याच्यावर राज्यातून अनेक सूचना आणि तक्रारी येत असतात याच वर्षात तिन महिन्यामध्ये 550 लोकांनी हेल्प लाईनचा फायदा घेतला. त्यावर माहिती आल्यावर त्वरित अधिकारी पाठविले जातात. त्या हेल्प लाईनचा नंबर लिहून घ्या. त्या हेल्प लाईनचा नंबर लिहून घेण्यात यावा 1800222262

**अध्यक्ष** : प्रश्नोत्तराचा तास संपला.

G-1.........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. / मु.शी. :** कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

डॉ.रणजीत पाटील : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, 2011 मधील नियम 8 अन्वये कौशल्य विकास व उद्योजकता विभागाची सन 2010-2011, सन 2011-2012 व सन 2014-2015 या वित्तीय वर्षातील योजनेत्तर व योजनांतर्गत योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय तरतुद व प्रत्यक्ष खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**अध्यक्ष** : खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली.

-----

श्री.संजय राठोड (महसूल राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन 2014-2015 या वर्षाचा बावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**अध्यक्ष** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला.

-----

श्री.संजय राठोड (महसूल राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, 2011 मधील नियम 8 अन्वये महसूल व वन विभागाची सन 2010-2011 व सन 2014-2015 या वित्तीय वर्षाची योजनेत्तर आणि सन 2010-2011, सन 2011-2012 व सन 2014-2015 या वित्तीय वर्षाची योजनांतर्गत योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय तरतुद व प्रत्यक्ष खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**अध्यक्ष** : खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली.

-----

श्री.संजय राठोड (महसूल राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, 2011 मधील नियम 8 अन्वये अल्पसंख्याक विकास विभागाची सन 2014-2015 या वित्तीय वर्षाची योजनेत्तर आणि सन 2010-2011, सन 2011-2012 व सन 2014-2015 या वित्तीय वर्षाची योजनांतर्गत (अविभाज्य भागासह) योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय तरतुद व प्रत्यक्ष खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**अध्यक्ष** : खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय राठोड (महसूल राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, 2011 मधील नियम 8 अन्वये कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभागाची सन 2010-2011 व सन 2014-2015 या वित्तीय वर्षाची योजनेत्तर आणि सन 2010-2011, सन 2011-2012 व सन 2014-2015 या वित्तीय वर्षाची योजनांतर्गत (अविभाज्य भागासह) योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय तरतुद व प्रत्यक्ष खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**अध्यक्ष** : खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली.

-----

श्री.विनोद तावडे (वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, 2011 मधील नियम 8 अन्वये वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाची सन 2014-2015 या वित्तीय वर्षाची योजनेत्तर व योजनांतर्गत (अविभाज्य भागासह) योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय तरतुद व प्रत्यक्ष खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**अध्यक्ष** : खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली.

-----

श्री.विनोद तावडे (वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, 2011 मधील नियम 8 अन्वये पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाची सन 2010-2011 व सन 2014-2015 या वित्तीय वर्षाची योजनेत्तर आणि सन 2010-2011, सन 2011-2012 व सन 2014-2015 या वित्तीय वर्षाची योजनांतर्गत योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय तरतुद व प्रत्यक्ष खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**अध्यक्ष** : खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली.

-----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विजय देशमुख (वस्त्रोद्योग राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, 2011 मधील नियम 8 अन्वये सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाची सन 2010-2011, सन 2011-2012 व सन 2014-2015 या वित्तीय वर्षाची योजनेत्तर व योजनांतर्गत योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय तरतुद व प्रत्यक्ष खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**अध्यक्ष** : खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली.

-----

श्री.दिपक केसरकर (ग्रामविकास राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, 2011 मधील नियम 8 अन्वये ग्रामविकास व जलसंधारण विभागाची सन 2010-2011 व सन 2014-2015 या वित्तीय वर्षाची योजनेत्तर आणि सन 2010-2011, सन 2011-2012 व सन 2014-2015 या वित्तीय वर्षाची योजनांतर्गत (अविभाज्य भागासह) योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय तरतुद व प्रत्यक्ष खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**अध्यक्ष** : खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली.

-----

श्री.गिरीष बापट (संसदीय कार्य मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, 2011 मधील नियम 8 अन्वये **संसदीय कार्य विभागाची** सन 2010-2011 व सन 2014-2015 या वित्तीय वर्षाची योजनेत्तर (अविभाज्य भागासह) योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय तरतुद व प्रत्यक्ष खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**अध्यक्ष** : खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली.

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

.....4

श्री.गिरीष महाजन (जलसंपदा मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, 2011 मधील नियम 8 अन्वये जलसंपदा विभागाची सन 2010-2011 व सन 2014-2015 या वित्तीय वर्षाची योजनेत्तर आणि सन 2010-2011, सन 2011-2012 व सन 2014-2015 या वित्तीय वर्षाची योजनांतर्गत योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय तरतुद व प्रत्यक्ष खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**अध्यक्ष** : खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली.

-----

श्री.बबनराव लोणीकर (पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, 2011 मधील नियम 8 अन्वये पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाची सन 2014-2015 या वित्तीय वर्षाची योजनेत्तर आणि सन 2010-2011, सन 2011-2012 व सन 2014-2015 या वित्तीय वर्षाची योजनांतर्गत योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय तरतुद व प्रत्यक्ष खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**अध्यक्ष** : खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली.

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, आज दुपारी 2016-2017 चा अर्थसंकल्प सादर होणार आहे. माननीय अर्थमंत्री त्याची जय्यत तयारी करीत आहेत. आतापर्यंतच्या अनेक वर्षाची आपली परंपरा अशी होती की, ज्या दिवशी आपण अर्थसंकल्प सादर करतो, तत्पूर्वी माननीय राज्यपालांचे निदेश आपण पिजनहोलद्वारे सन्माननीय सदस्यांना उपलब्ध करुन देतो. नियोजन विभागाने हे निदेश आम्हाला कालच उपलब्ध करुन दिलेले आहेत.

**अध्यक्ष** : मी कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना बोलण्याची संधी देतो.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, मी हरकतीचा मुद्दा मांडत आहे. आपण माझे म्हणणे ऐकूण त्यावर रुलींग द्यावे. सन 2016-2017 चा अर्थसंकल्प आज मांडला जाणार आहे. महाराष्ट्रातील विधिमंडळ सदस्यांच्या मतदारसंघात जे प्रकल्प आहेत, त्यासाठी फक्त 5360 कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. यामुळे यावर्षी अध्यक्ष महोदयांच्या जिल्हयातील प्रकल्प सुध्दा ठप्प राहणार आहेत. अजून वेळ गेलेला नाही. माननीय अर्थमंत्री दुपारी अर्थसंकल्प मांडणार आहेत. ही 5360 कोटीची तरतूद खूप तोकडी आहे. यामुळे महाराष्ट्रातील कोणतेही प्रकल्प गतिमान होणार नाही. यासाठी 10 हजार कोटीची तरतूद करावी अशी मी मागील वर्षीच्या भाषणात मागणी केली होती. पण त्याचा काही परिणाम सरकारवर झालेला दिसत नाही. 5360 कोटीचा आकडा येथे सरकारने जाहीर केलेला आहे.

**अध्यक्ष** : मी सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना सांगू इच्छितो की, अर्थसंकल्पात माहिती आल्यानंतर तुम्ही मांडावी किंवा सध्या चालू असलेले कामकाज संपल्यानंतर तुम्ही मांडा. आता हा हरकतीचा मुद्दा होऊ शकत नाही. अर्थसंकल्प मांडल्यानंतर त्यामध्ये तरतूद नसेल तर ते ठीक आहे. पण अजून अर्थसंकल्प मांडलेला नाही.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, आपण लक्षात घ्यावे की, अर्थमंत्री महोदय माननीय राज्यपालांच्या निदेशाच्या बाहेर जाऊन कोणतीही तरतूद करु शकत नाहीत.

यानंतर एच-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील......

आणि अर्थ व नियोजन मंत्री यांनी माननीय राज्यपाल यांना कळविलेले असणार की, आम्ही एवढा निधी देऊ शकतो. त्यानंतर मग माननीय राज्यपाल महोदयांनी त्या निधीची विगतवारी कशी करावयाची यासंबंधी माननीय राज्यपाल महोदयांचे निदेश आलेले आहेत. आज रोजी दुपारी 2.00 वाजता माननीय अर्थमंत्री अर्थसंकल्प जाहीर करतील. त्यानंतर त्या रकमेच्या बाहेर जाऊन तरतूद शकणार नाहीत. 5360 कोटी रुपये एवढया तुटपुंज्या तरतुदीमुळे येथे बसलेल्या कोणत्याच सन्माननीय सदस्यांच्या मतदारसंघामध्ये कोणतीही कामे होऊ शकणार नाहीत. यासंबंधीची रक्कम आताच वाढवून जाहीर करावी.

**अध्यक्ष :** हा हरकतीचा मुद्दा होऊ शकत नाही. कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे थोडेसे बाकी आहे. ते पूर्ण झाल्यानंतर याबाबत सविस्तर मुद्दा मांडण्याकरिता मी संधी देतो.

-------

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री.दिलीप कांबळे ( सामाजिक न्याय व विशेष सहाय्य राज्यमंत्री ) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश,2011 मधील नियम 8 अन्वये सार्वजनिक आरोग्य विभागाची सन 2014-2015 या वित्तीय वर्षाची योजनेतर व योजनांतर्गत ( अविभाज्य भागासह ) योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय तरतूद व प्रत्यक्ष खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**अध्यक्ष :** खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली.

------

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अर्थसंकल्पातील आकडेवारी एक दिवस अगोदर पिजन होलमध्ये पुस्तिकेच्या माध्यमातून प्रसिध्द केल्याबाबत हरकतीच्या मुद्दयासंबंधी**

श्री.ग.आ.देशमुख : अध्यक्ष महोदय, या राज्याचे बजेट दुपारी दोन वाजता माननीय अर्थमंत्री मांडणार आहेत. परंतु ते बजेट मांडण्याअगोदरच त्यातील आकडे बाहेर आलेले आहेत. हा एक गंभीर बजेटसंदर्भातील गुन्हा आहे. पाटबंधारे विभागाकरिता आताच सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे पाटबंधारे विभागाकरिता केवळ 5360 कोटी रूपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. घटनेतील तरतुदीप्रमाणे माननीय राज्यपालांनी या संदर्भात दिलेले निदेश पाळणे बंधनकारक आहे. दरवर्षी ते पाळले जातात. अंदाजपत्रक मांडल्यानंतर ते आकडे जाहीर केलेले असतात. याच वर्षी पाटबंधारे विभागाचे आकडे बजेट मांडण्याअगोदर बाहेर आलेले आहेत. गोसीखूर्द 1000 कोटी रूपयांच्या अनुशेषातून वगळलेले आहे. सदरचे बजेटमधील आकडे....(अडथळा )

**अध्यक्ष :** हे आकडे कशामध्ये आलेले आहेत ?

श्री.भास्कर जाधव ( खाली बसून ) : हे माननीय राज्यपाल महोदयांच्या निदेशामध्ये आकडे दाखविण्यात आलेले आहेत.

श्री.ग.आ.देशमुख : अध्यक्ष महोदय, सदरहू आकडे शासनाच्या नवीन बजेटमधील असून ते अगोदरच पुस्तिकेच्या माध्यमातून बाहेर आलेले आहेत.

**अध्यक्ष :** मी याबाबत जरूर तपासणी करतो.

श्री.ग.आ.देशमुख : अशा प्रकारे बजेटमधील आकडे बजेट मांडण्यापूर्वीच बाहेर येऊ लागले तर हा हक्क भंग होऊ शकतो.

**अध्यक्ष :** हा हक्कभंगाचा विषय होऊ शकत नाही. हे आकडे बाहेर कसे गेले याबाबत मी तपासणी करतो.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, काल दुपारी व संध्याकाळी सभागृहातील आमच्या पिजन होलमध्ये या पुस्तिका वितरित करण्यात आल्या होत्या. या पुस्तिकेवर पुढीलप्रमाणे लिहिलेले आहे.

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप वळसे-पाटील.....

माननीय राज्यपाल महाराष्ट्र राज्य यांचे दिनांक 11 मार्च,2016 रोजीचे निदेश विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे अध्यादेश सन 2011 च्या कलम 7 अन्वये वार्षिक योजना सन 2016-2017. असे लिहिलेले पुस्तक आम्हाला काल पिजन होलच्या माध्यमातून वितरित करण्यात आलेले आहे. आज दुपारी 2.00 वाजता माननीय वित्तमंत्री बजेट सभागृहामध्ये मांडणार आहेत. बजेटमध्ये सिंचन विभागाकरिता किती तरतूद करण्यात आलेली आहे, याबाबतची आकडेवारी माननीय राज्यपाल महोदयांच्या निदेशाच्या पुस्तिकेच्या माध्यमातून अगोदरच प्रसिध्द करण्यात आलेली आहे. जलसंपदा विभागाकरिता केलेल्या तरतुदीचे विभाज्य नियत वाटप व अविभाज्य नियत वाटप सर्वसाधारण योजनेकरिता 5360 कोटी रुपये उपलब्ध आहेत. अशा प्रकारची सविस्तर माहिती या पुस्तिकेमध्ये दिलेली आहे. आतापर्यंतची यासंदर्भातील प्रथा अशी होती की, ज्यावेळी माननीय अर्थमंत्री अर्थसंकल्प मांडतात, त्यावेळी सदर प्रकाशने उपलब्ध करुन द्यावयाची असतात. प्रोप्रायटीचा वेगळा प्रश्न आहे. त्यामध्ये किती लॅप्स झाले, किती काय झाले कुठ लॅप्स झाले. ही माहिती कालच कशी काय उपलब्ध केली ? हा एक प्रश्न आहे. या राज्यातील एवढया मोठया प्रमाणातील प्रकल्पांना निधी उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात अनेक गोष्टींचे आश्वासन दिलेले असतानाही तुटपुंजी तरतूद शासनाने पाटबंधारे विभागाकरिता उपलब्ध करुन दिलेली आहे. आमचा हरकतीचा मुद्दा उपस्थित करण्याचे कारणच हे आहे की, अजूनही मंत्री महोदयांना यासंदर्भातील निधीच्या आकडयांमध्ये वाढ करण्याची संधी आहे. या तुटपुंज्या निधीमध्ये कोणाच्याही मतदारसंघातील कोणताही प्रकल्प पूर्ण होऊ शकत नाही. म्हणून यामध्ये जर तरतूद वाढवायची असेल तर ती तरतूद वाढविली पाहिजे. या संकेताचा भंग झालेला आहे, याची गंभीर दखल घेणे आवश्यक आहे. याबाबत माननीय अर्थमंत्री यांना बोलावून त्यांच्याकडून खुलासा तातडीने मागितला पाहिजे. आणि त्याबाबत सभागृहाला अवगत केले पाहिजे. ज्यावेळी माननीय अर्थमंत्री बजेट मांडतात, त्यावेळी हा मुद्‍दा उपस्थित करायला पाहिजे होता. परंतु त्यावेळी बोलू दिले जाणार नाही. म्हणून आता हा मुद्दा उपस्थित करण्याची संधी आम्ही घेतलेली आहे. किंवा माननीय अध्यक्ष यांनी जाहीर करावे की, माननीय राज्यपाल यांचे आदेश खरे नाहीत.

...5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**अध्यक्ष :** मी याबाबत तपासून सांगतो. बोलू देणार नाही म्हणून आधीच संधी घेणे. म्हणजे त्यावेळी जे घ्यायला पाहिजे होते ते आताच घेणे. याचा अर्थ होतो की, वेळेत आपण संधी घेतली नाही.

डॉ.सुनील देशमुख : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी या सभागृहामध्ये अर्थमंत्री या नात्याने दहा वेळा अर्थसंकल्प मांडलेला आहे. मी देखील राज्याचा अर्थ राज्यमंत्री म्हणून पाच वेळा अर्थसंकल्प मांडलेला आहे. घटनेच्या कलम 371 (2) प्रमाणे माननीय राष्ट्रपती महोदयांनी राज्यपाल महोदयांना हा वैधानिक अधिकार दिलेला आहे. असे वैधानिक अधिकार कोणत्याही देशातील कोणत्याही राज्यामध्ये दिले जात नाहीत. ज्या पश्चिम महाराष्ट्रातील लोकांनी सातत्याने विदर्भावर अन्याय केलेला आहे, त्यामुळे विदर्भामध्ये जो सिंचनाचा अनुशेष निर्माण झालेला आहे,(अडथळा )...ऐकून घ्यावे. आम्ही आपले ऐकले आता आपण आमचे ऐकून घ्यावे. तो महामहीम राष्ट्रपती महोदयांच्याही लक्षात आलेला आहे. (अडथळा )

**अध्यक्ष :** तुमचे तिघांचे म्हणणे ऐकलेले आहे. आता आपण त्यांचेही म्हणणे ऐकून घेतले पाहिजे.

डॉ.सुनील देशमुख : महामहीम राष्ट्रपती महोदयांनी राज्यपाल महोदयांना घटनेतील तरतुदीप्रमाणे जे संविधानिक अधिकार दिलेले आहेत, ते राज्य शासनाला पाळणे बंधनकारक आहेत. या विरोधात हे कोर्टात गेले होते. कोर्टाने मान्य केले की, राज्यपाल महोदयांचे पाटबंधारे विभागासंदर्भात दिलेले निदेश पाळणे राज्य शासनास बंधनकारक आहे. ज्यावेळी अर्थसंकल्प मांडला जाईल, त्यावेळी यावर चर्चा होईल. त्या चर्चेच्या निमित्ताने हा मुद्दांमांडण्यात यावा. या निमित्ताने मला सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना सांगावयाचे आहे की, यामध्ये कोणत्याही प्रकारची अनियिमतता नाही.

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री.दिलीप कांबळे ( सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य राज्यमंत्री ) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश,2011 मधील नियम 8 अन्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाची सन 2010-2011व सन 2014-2015 या वित्तीय वर्षाची योजनेतर आणि सन 2010-2011, सन 2011-2012 व सन 2014-2015 या वित्तीय वर्षाची योजनांतर्गत ( अविभाज्य भागासह ) योजनांवरील वैधानिक विकास महामंडळनिहाय तरतूद व प्रत्यक्ष खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**अध्यक्ष :** खर्चाची माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

आय-1/--

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, सभागृहातील सन्माननीय सदस्य आणि माजी राज्यमंत्री माननीय डॉ. सुनील देशमुख यांनी अनुशेष आणि राज्यपालांच्या निदेशासंदर्भात काही वक्तव्ये केलेली आहेत. विधिमंडळाने एक मताने ठराव करुन वैधानिक विकास महामंडळांची निर्मिती केलेली आहे. या माध्यमातून राज्य घटनेतील तरतुदीनुसार राज्यपाल महोदयांना अधिकार प्राप्त झालेले आहेत. राज्यपाल महोदयांना डायरेक्टिव्हज देण्याचा अधिकार आहे आणि त्याबद्दल कोणाचीही तक्रार नाही. प्रोसिजरप्रमाणे बजेट सर्क्युलेशन हे अर्थसंकल्पाबरोबर सर्क्युलेट करण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्य डॉ. सुनील देशमुख यांनी हे सर्व वाचण्याची आवश्यकता आहे. गेल्या वर्षापेक्षा या वर्षी विदर्भाला सिंचनासाठी 150 कोटी रुपये कमी मिळालेले आहेत. ही गोष्ट सन्माननीय सदस्य डॉ. सुनील देशमुख यांनी समजून घेण्याची गरज आहे, एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

.....2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : (पुरवणी) विनियोजन विधेयक.

L.A. BILL NO. IX OF 2016.

(A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN FURTHER SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY-FIRST DAY OF MARCH, 2016.)

श्री. दीपक केसकर ( वित्त राज्यमंत्री ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 9 दिनांक 31 मार्च, 2016 रोजी संपणाऱ्या वर्षाच्या कामांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून आणखी विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यांस अधिकृत मंजुरी देण्यासाठी विधेयक सभागृहासमोर मांडतो.

असे करीत असतांना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक विचारात घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेस शिफारस केली आहे.

श्री. जयंत पाटील (बसून) : अध्यक्ष महोदय, सदर विधेयकबाबत वित्त राज्यमंत्र्यांनी आम्हाला स्पष्टीकरण द्यावे.

**अध्यक्ष :** विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. दीपक केसरकर : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 9 दिनांक 31 मार्च, 2016 रोजी संपणाऱ्या वर्षाच्या कामांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून आणखी विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यांस अधिकृत मंजुरी देण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**अध्यक्ष :** विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3, अनुसूची, विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, वित्तमंत्री महोदयांनी विनियोजन विधेयक मांडलेले आहे. यामध्ये किती रक्कमा आहेत आणि इतर माहिती देण्याची वित्तमंत्री महोदयांची इच्छा असताना आपण त्यांना संधी न दिल्यामुळे त्यांच्यावर अन्याय झालेला आहे.

अध्यक्ष महोदय, वित्तमंत्री महोदयांना सदर विधेयक वाचण्याची आणि माहिती देण्याची संधी देण्यात यावी, अशी माझी विनंती आहे.

**अध्यक्ष** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, पुरवणी मागण्या यापूर्वीच पारित झालेल्या आहेत.

श्री. दीपक केसरकर : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि.स.वि. क्रमांक 9 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**अध्यक्ष** : सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 9 संमत झाले आहे.

----------

.........4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी. :** सदस्यांच्या अटकेसंबंधी घोषणा.

**अध्यक्ष** : मला, माननीय विशेष न्यायाधीश, पी एम एल ए तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश, शहर दिवाणी व सत्र न्यायालय, बृहन्मुंबई यांचेकडून दिनांक 17 मार्च, 2016 रोजी असे कळविण्यात आले आहे की, सन्माननीय विधानसभा सदस्य श्री. छगन भुजबळ यांना दिनांक 15 मार्च, 2016 रोजी अटक करुन त्यांच्या न्यायालयासमोर हजर केले असता श्री. छगन भुजबळ यांना दिनांक 17 मार्च, 2016 पर्यंत अंमलबजावणी संचालनालयाच्या ताब्यात देण्यात आले होते.

दिनांक 17 मार्च, 2016 रोजी त्यांना माननीय विशेष न्यायाधीश, पी एम एल ए तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश, शहर दिवाणी व सत्र न्यायालय, बृहन्मुंबई यांच्या न्यायालयासमोर हजर केले असता आता त्यांना दिनांक 31 मार्च, 2016 पर्यंत न्यायालयीन कोठडीत पाठविण्यात आले आहे.

----

........5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, मी पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून माहिती देणार आहे. मुख्यमंत्री महोदय हे सोमवार, दिनांक 14 मार्च, 2016 रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एका प्रकरणाच्या संदर्भात माहिती देणार होते. आज शुक्रवार दिनांक 18 मार्च, 2016 आहे. अद्यापपर्यंत मुख्यमंत्री महोदयांनी त्या संदर्भातील माहिती सदनाला दिलेली नाही. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जिल्हाधिकारी आणि संबंधित पोलीस अधीक्षक यांच्या विरोधात कोणती कारवाई केली आहे ? या प्रकरणाची माहिती मुख्यमंत्री महोदयांनी सदनाला दिलेली नाही. या प्रकरणाची सद्यःस्थिती काय आहे ते आज तरी सदनाला समजली पाहिजे.

**अध्यक्ष** : माननीय विरोधी पक्षनेत्यांचे म्हणणे बरोबर आहे. मी या प्रकरणाची माहिती द्यायला सांगतो.

आता लक्षवेधी सूचना क्रमांक एक चर्चेला घेण्यात येईल.

........6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

SGS/ MMP/ AKN/ 11:20

**पृ.शी.** : दक्षिण मुंबईच्या शिवडी, वडाळा, येलोगेट परिसरात पेट्रोलियम कंपनीतील तेल चोरी करणाऱ्या तेल माफियांचा कायमस्वरुपी बंदोबस्त करणे

**मु.शी.** : . दक्षिण मुंबईच्या शिवडी, वडाळा, येलोगेट परिसरात पेट्रोलियम कंपनीतील तेल चोरी करणाऱ्या तेल माफियांचा कायमस्वरुपी बंदोबस्त यासंबंधी **सर्वश्री अजय चौधरी, अमिन पटेल, अमित देशमुख, त्र्यंबक भिसे, प्रा. वर्षा गायकवाड, कु. प्रणिती शिंदे, ॲड. आशिष शेलार, वि.स.स.** यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. अजय चौधरी ( शिवडी ) : अध्यक्ष महाराज, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"दक्षिण मुंबईच्या शिवडी, वडाळा, येलोगेट परिसरात पेट्रोलियम कंपन्यांचे मोठे जाळे असणे, कंपन्यातील पेट्रोल वाहून नेण्यासाठी अनेक पाईपलाईन निर्मनुष्य वस्तीतून जात असणे व अशा पाईपलाईनवर लक्ष ठेवणे कंपन्यांना शक्य नसल्याने तेल माफियांकडून पेट्रोल तसेच कच्च्या तेलाची होत असलेली चोरी, तेल माफियांनी पेट्रोल कंपन्यांच्या पाईपलाईन फोडून त्याला वेगळी पाईपलाईन जोडून जमिनीखालून विशिष्ट परिसरापर्यंत नेऊन बेकायदेशीर खोलीमध्ये आधीच बनवून ठेवलेल्या टाक्यांना पाईपलाईन जोडून पेट्रोल व कच्चे तेल चोरण्याचा सुरु असलेला प्रकार, हे कच्चे तेल व पेट्रोल नंतर चढत्या किंमतीत विकणे, गेल्या वर्षभरात पोर्टझोनमध्ये तेल व पेट्रोल चोरीच्या घडलेल्या २१ गुन्ह्यात ९८ लाख ८० हजार किंमतीचे तेल व पेट्रोल यांची झालेली चोरी, या गुन्ह्यांतील गुन्हेगारांचा कायमस्वरुपी बंदोबस्त करण्यास पोलिसांना आलेले अपयश, तेल चोरी करणारे माफिया हे परप्रांतीय असून त्यांची त्या परिसरातील स्थानिक रहिवाशांवर असलेली दहशत, कोणी पोलिसात तक्रार केल्यास तेल माफियांकडून तक्रारदारकास ठार केले जाणे, परिणामी या परिसरात असणाऱ्या इमारती व झोपडपट्ट्यांमधील रहिवाशी व कामगारांच्या तसेच त्यांच्या कुटुंबियांच्या जीवितास निर्माण झालेला धोका, शासनाने तातडीने याप्रकरणी लक्ष घालून तेल माफियांचा पूर्ण बिमोड करण्यासाठी करावयाची सक्षम उपाययोजना व प्रतिक्रिया."

डॉ. रणजित पाटील ( गृह राज्यमंत्री (शहर) ) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**अध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( **प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------

........7....



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अजय चौधरी : अध्यक्ष महोदय, दक्षिण मुंबईच्या शिवडी, वडाळा, येलोगेट परिसरात पेट्रोलियम कंपन्यांचे असलेले मोठे जाळे, कंपन्यातील पेट्रोल वाहून नेण्याकरिता अनेक पाईपलाईन निर्मनुष्य वस्तीतून जात असल्याने व अशा पाईललाईनवर लक्ष ठेवणे कंपन्यांना शक्य नसल्याने तेल माफियांकडून पेट्रोल तसेच कच्च्या तेलाची होत असलेली चोरी, तेल माफियांनी कंपन्यांच्या पाईपलाईन फोडून त्याला वेगळी पाईप लाईन जोडून सदर पाईपलाईन जमिनीखालून विशिष्ट परिसरापर्यंत नेऊन बेकायदेशीर खोल्यांमध्ये आधीच बनवून ठेवलेल्या टाक्यांच्या पाईपलाईनला जोडून पेट्रोल व कच्चे तेल चोरण्याचा सुरु असलेला गोरखधंदा, कच्चे तेल व पेट्रोल चोरुन चढत्या किंमतीस विक्री होत असलेला धंदा काळा सुरु आहे.

अध्यक्ष महोदय, गेल्या वर्षभरात पोर्टझोनमध्ये तेल व पेट्रोल चोरीचे अनेक गुन्हे घडलेले आहेत. तेल चोरीमुळे देशाचे प्रचंड नुकसान होत आहे. याचबरोबर प्रचंड भ्रष्टाचार देखील होत आहे. तेल चोरीच्या संदर्भात शिवडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. त्रिवेदी यांनी धडक कारवाई सुरु केली असता 8 महिन्यांमध्ये संबंधित गुन्हेगांरांवर 10 केसेस टाकून कारवाई केलेली आहे. तेल चोरांनी 3 कि.मी. लांब तेलाची लाईन पी डिमेलो रोड येथील बामल लॉरेस कंपनीपर्यंत अनधिकृतपणे नेलेली आहे. शिवडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. त्रिवेदी यांनी अनधिकृतपण नेण्यात आलेली तेलाची लाईन पकडलेली आहे. या प्रकरणी पोलीस निरीक्षक यांनी आयओसी, बीपीसीएल आणि ओनएनजीसी कंपनीसमवेत पत्रव्यवहाराच्या माध्यमातून तेलाची चोरी कशी होत आहे, याची माहिती दिलेली आहे. परंतु, यामधील एकाही कंपनीने त्यांना प्रतिसाद दिलेला नाही. ऊलट या कंपन्यांनी या प्रकरणी जे आरोपी पकडले होते, ते सोडण्याबाबत पोलीस निरीक्षक श्री. त्रिवेदी यांच्यावर दबाव टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे.

अध्यक्ष महोदय, तेल माफियांवर जरब बसविण्याकरिता मोक्का कायद्यानुसार कारवाई करणार काय ? तेली चोरी होऊ नये याकरिता गस्ती पथके नेमली जाणार काय ? तेल चोरीकडे दुर्लक्ष करणाऱ्या तेल कंपन्यांच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कर्तव्यात दुर्लक्ष केले म्हणून चौकशी करुन कारवाई करणार काय ?

डॉ. रणजित पाटील : अध्यक्ष महोदय, ही गोष्ट सत्य आहे. पोर्टझोनमध्ये शिवडी, वडाळा, येलोगेट परिसरातून 12 कि.मी. तेलाची पाईपलाईन जात आहे. अशी पाईपलाईन निर्मनुष्य वस्तीतून, मार्शी किंवा मुनष्याची कोणतीही फुटप्रिंट नाही अशा जागेमधून जात आहे.

J-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील....

सन 2015 मध्ये अनेक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. सदरहू तीन मोठ्या कंपन्यांचे क्रुड ऑईल तेल, पेट्रोल, डिझेल हे पोर्ट पासून ते रिफायनरीपर्यंत जाते. बीपीसीएल, एचपीसीएल आणि आयोसीएल यांची संयुक्त जबाबदारी म्हणून त्यांचे सुरक्षा पथकात 282 कर्मचारी तेथे काम करतात. या सर्व पाईपलाईनवर गस्त ठेवण्याची पोलिसांची जबाबदारी आहे. सन्माननीय सदस्यांनी पोलीस इन्स्पेक्टर श्री.त्रिवेदी बद्दल सांगितले की, पोलीस स्टेशन शिवडी येथून त्यांनी वारंवार पत्रव्यवहार केला, ही गोष्ट सत्य आहे. अनेकवेळा सदर कंपन्यांशी पत्रव्यवहार करुन सुध्दा त्या कंपन्यांकडून पाहिजे तशी दखल घेतली जात नाही. तेल कंपन्यांची होणारी चोरी पाहण्यासाठी अनेक तंत्रज्ञान उपलब्ध झालेले आहे. लीक लोकेटर, साऊंड रॉड, यासाठी रेडिओ आयासोटेप असतील, या प्रकारच्या बऱ्याच गोष्टी पुढारलेल्या असताना सुध्दा गेल्या वर्षभरात असे आठ, दहा प्रकार घडले आणि यातून लाखो रुपयांचे पेट्रोल चोरीला जाणे यासंदर्भात संबंधित कंपनीचे अधिकारी आणि पोलीस अधिकारी यांची एक एक संयुक्त बैठक घेतली जाईल. तेथे गस्त वाढविण्यासाठी आणि चोरांवर जरब बसविण्यासाठी मोक्का कायदा सुध्दा प्रस्तावित केलेला आहे.

**अध्यक्ष** : मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देतो की, एका लक्षवेधी सूचनेवर दोन, तीन प्रश्न विचारता येतील...(अडथळा)... ही सभागृहाची प्रॉपर्टी असली तरी त्यावर सर्व सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारता येणार नाहीत, याची कृपया सन्माननीय सदस्यांनी नोंद घ्यावी.

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महाराज, मंत्री महोदयांनी सांगितले की, मोक्का कायदा लावला जाईल, याबद्दल मी मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. सन्माननीय सदस्य श्री.अजय चौधरी म्हणाले ती गोष्ट खरी आहे. श्री.त्रिवेदी, पी.आय. यांनी मेहनत करुन तीन किलो मीटरची पाईप लाईन शोधून काढली. पण ज्यावेळेला चॉर्जशिटस दाखल होते त्यावेळेला ती केस विक होते. तेल चोरल्यानंतर ती मोजण्याची यंत्रणा आयोसीएल, बीपीसीएल या कंपन्यांकडे नाही, ही बाब मंत्री महोदयांनी मान्य केलेली आहे. अशा प्रकारचा लॉस आर्फ मेजरमेंट ऑफ ऑईल ही डिटेक्ट करण्याची प्रावधाने बाजारात उपलब्ध आहेत, ती त्या तेल कंपन्यांनी लावली पाहिजे, असे निर्देश राज्य सरकार देणार आहे काय? निमर्नुष्य ठिकाणाहून ही पाईपलाईन जाते, त्या सर्व ठिकाणी

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.आशिष शेलार....

त्या तेल कंपन्याच्या सीएसआर निधीतून सीसीटीव्ही कॅमरो बसविण्यासाठी राज्य सरकार बंधनकार करणार आहे काय? केवळ पाईपलाईन मधून तेलाची चोरी होते असे नाही. समुद्रामार्गे येणारे तेल चोरीला गेल्याची घटना घडली आहे. इंडोनेशियाचा एक कॅप्टन सॅम्युअल बकरी यांना तेल चोरी प्रकरणात सीआर नंबर 26/15 मध्ये अटक झाली होती. अशा विदेशी कंपनीच्या कॅप्टनचा चोरीच्या प्रकरणात असललेला संबंध पाहता, राज्य सरकार आपल्या कायद्यात बदल करण्यासाठी केंद्र सरकारला विनंती करणार आहे काय, याबाबत मंत्री महोदय कृपया खुलासा करतील काय?

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महाराज, या सर्व चोरीमध्ये इतके शास्त्र पुढे गेल्यानंतर अशा लॉसेसचे मोजमाप होत नाही असे नाही. आपण पाण्याचे मोजमाप करतो त्याप्रमाणे टॅपींग व्हायला पाहिजे. यामध्ये जे काही अद्यावत तंत्रज्ञान उपलब्ध असेल त्या तंत्रज्ञानाचा वापर या सर्व कंपन्यांनी केला पाहिजे, अशा प्रकारचे निर्देश संबंधित कंपनीला दिले जातील. जेथे जेथे निमर्नुष्य भाग असेल, जेथे अंधार असेल, जेथे ॲक्सेस नसेल अशा जागेवर केवळ सीसीटीव्ही कॅमेरेच नव्हेतर, लाईटची व्यवस्था करण्याच्या सूचना देण्यात येतील. समुद्रामार्गे येणारे तेल टॅपिंग होत नाही तर ही दुसऱ्या प्रकारची चोरी असते. सन्माननीय सदस्यांनी विदेशी कॅप्टनने चोरी केली असल्याचे सांगितले. माझ्याकडे त्या प्रकरणाची माहिती असून त्यांच्यावर कारवाई झालेली आहे. याबाबतीत केंद्र सरकारला माहिती घ्यावयाची असेल किंवा आपल्याकडून काही पत्रव्यवहार करायचा असेल तर तो केला जाईल.

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महाराज, समुद्रामार्गे तेल चोरी होते, त्यात कोच गार्डची मदत आपण घेणार का?

डॉ.रणजित पाटील : होय.

श्री.शशिकांत शिंदे : अध्यक्ष महाराज, केवळ तेल चोरीच्या संदर्भातील आपण ही केस समजू नका. या भागावर दहशतवाद्यांचा हल्ला होऊ शकतो, अशा प्रकारच्या सूचना अतिरेक्यांच्या माध्यमातून आलेल्या आहेत. आतापर्यंत येथे बरेच खून झालेले आहेत. एखाद्या प्रकरणात चोरी झाली तर शासन कारवाई करते, त्यानंतर ते चोर सुटून येतात. अशा प्रकारची हे एक मोठे षडयंत्र आहे. केवळ ड्रॉयव्हर, क्लिनर या लोकांवर कारवाई केली जाते, परंतु या पाठीमागे एक मोठी टोळी असल्यामुळे कंपनीच्या अधिकाऱ्यापासून ते बरेच जण यामध्ये गुंतलेले आहेत. या

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शशिकांत शिंदे....

प्रकरणाची सर्व पाळेमुळे उखडून काढण्यासाठी या प्रकरणाची सीआयडी चौकशी करुन त्याची पाळेमुळे शासन शोधून काढणार आहे काय?

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे. हा ज्वलनशील पदार्थ आहे. अशा पदार्थाची तीन तीन किलो मीटरची अनधिकृत पाईपलाईन ड्रील करुन मुख्य लाईनपर्यंत टाकणे यावर जे काही प्रावधान आहे, या सर्व प्रावधानानुसार Petroleum and Minerals Pipeline Act आणि Prevention of Damage Act, हे सर्व ॲक्ट आपण त्यांचेवर लावतो. याहून पुढे जाऊन मुंबईला सॉफ्ट टारगेट केले जाते. भविष्यकाळामध्ये काही घातपात होऊ नये म्हणून सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे सध्या ज्या काही घटना झालेल्श्स आहेत, त्या लक्षात घेता गरज पडली तर या तपासामध्ये पुढे असे वाटले की, या चौकशीमध्ये आपल्याला दुसऱ्या एजेन्सीची गरज आहे. सीआयडी किंवा आणखी काही असेल तर त्यांची मदत घेतली जाईल.

श्री.अर्जून खोतकर : अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार आणि सन्माननीय सदस्य श्री.अजय चौधरी यांनी ज्या प्रश्नाकडे लक्ष वेधले आहे त्या प्रश्नाला उत्तरच मिळाले नाही. त्या भागातील सिनिअर पी.आय. श्री.त्रिवेदी यांनी आयओसीएल, बीपीसीएल आणि ओएनजीसी या कंपन्यांना कळविले की, अशा प्रकारची चोरी होते. परंतु त्या कंपनीने दखल न घेता पी.आय. श्री.त्रिवेदीच्या विरोधात तक्रार दाखल केली. गेल्या आठ महिन्यात कंपनीने त्यांचा आपसातील घोळ मिटला पाहिजे म्हणून जाणीवपूर्वक पी.आय. ची बदली करुन त्यांना बक्षिस दिले आहे काय? श्री.त्रिवेदी, पी.आय. यांच्या संदर्भात त्या भागातील जनतेमध्ये चांगली भावना आहे. त्यांनी खूप मोठा घोटाळा बाहेर काढलेला आहे. सन्माननीय सदस्य त्या भागातले असल्यामुळे संबधित अधिकाऱ्याला त्या भागात पुन्हा नेमले तर हा मोठा घोटाळा बाहेर येऊ शकतो. म्हणून शासन त्या अधिकाऱ्याला त्या ठिकाणी नेमणार आहे काय? या कंपनीची चौकशी उच्चस्तरीय पातळीवरुन करणार आहात काय?

डॉ.रणजित पाटील : अध्यक्ष महाराज, चौकशीच्या दरम्यान अशी गरज निर्माण झाली तर उच्चस्तरीय चौकशीची आपण मदत घेऊच किंवा दुसऱ्या एजेन्सीची मदत घेऊ. सन्माननीय सदस्य

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील..

म्हणाले की, जाणीवपूर्वक बदली झाली असेल, अशी अनेक कारणे असू शकतात. प्रशासकीय कारणातून बदली झाली असेल याबद्दल मी निश्चित लक्ष घालेन. परंतु त्यामुळे त्यांची बदली झाली ही बाब मान्य करण्यासारखी नाही.

**लक्षवेधी सूचना क्रमांक -2 पुढे ढकलण्याबाबत**

**अध्यक्ष** : आजच्या कामकाजपत्रिकेवरील लक्षवेधी क्रमांक 2 पुढे ढकलण्यात आली आहे. आजच्या कमाकाजपत्रिकेवर विरोधी पक्षाचा नियम 293 अन्वये प्रस्ताव आहे. आता विरोधी पक्षाने चर्चेस सुरुवात करावी. दुपारी 1.30 पर्यंत मंत्री महोदयांच्या उत्तरासह या प्रस्तावावरील चर्चा संपवायची आहे. सन्माननीय सदस्यांनी कृपया सहकार्य करण्याची तयारी ठेवावी.

यानंतर K-1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. :** राज्यातील बंद असलेले विद्युत प्रकल्प सुरु करुन आवश्यक वीज निर्मिती करणे, वीज कंपन्यांतील सुरु असलेला गैरव्यवहार, भ्रष्टाचार रोखणे, तसेच केंद्राने बंद केलेला निधी परत मिळवून व राज्य शासनाने स्वत:चा निधी देऊन राज्यातील बंद योजना पूर्ण करणे

**मु.शी. :** : राज्यातील बंद असलेले विद्युत प्रकल्प सुरु करुन आवश्यक वीज निर्मिती करणे, वीज कंपन्यांतील सुरु असलेला गैरव्यवहार, भ्रष्टाचार रोखणे, तसेच केंद्राने बंद केलेला निधी परत मिळवून व राज्य शासनाने स्वत:चा निधी देऊन राज्यातील बंद योजना पूर्ण करणे या विषयाबाबत सर्वश्री अजित पवार, राधाकृष्ण विखे पाटील, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, दिलीप वळसे-पाटील, डॉ. पतंगराव कदम, सर्वश्री शशिकांत शिंदे, विजय वडेट्टीवार, गणपतराव देशमुख, जितेंद्र आव्हाड, बाळासाहेब थोरात, जयदत्त क्षीरसागर, अब्दुल सत्तार, भास्कर जाधव, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री मकरंद पाटील, सुनील केदार, संदीप नाईक, गोपालदास अग्रवाल, डॉ. सतिश पाटील, सर्वश्री जयकुमार गोरे, नसीम खान, राणाजगजितसिंह पाटील, अमित देशमुख, दिलीप सोपल, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री बबनराव शिंदे, डी.एस.अहिरे, राहुल मोटे, डी.पी.सावंत, हसन मुश्रीफ, मधुकरराव चव्हाण, शिवेंद्रसिंह भोसले, कालिदास कोळंबकर, दत्तात्रय भरणे, बसवराज पाटील, बाळासाहेब पाटील, वसंतराव चव्हाण, संग्राम जगताप, अमीन पटेल, राजेश टोपे, ॲड. के. सी. पाडवी, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री कुणाल पाटील, हनुमंत डोळस, काशिराम पावरा, अवधूत तटकरे, हर्षवर्धन सपकाळ, विजय भांबळे, राहुल बोंद्रे, वैभव पिचड, अमर काळे, अमित झनक, रणजित कांबळे, श्रीमती अमिता चव्हाण, डॉ. संतोष टारफे, श्री. आसिफ शेख, श्रीमती निर्मला गावित, श्री. अस्लम शेख, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री संग्राम थोपटे, भाऊसाहेब कांबळे, त्र्यंबक भिसे, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री सिध्दाराम म्हेत्रे, भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव **:-**

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप वळसे-पाटील ( आंबेगाव ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.स. नियम 293 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"राज्यात विजेचा प्रश्न गंभीर झालेला असणे, शाश्वत वीज न मिळणे, विद्युत कंपनीत वाढत चालत असलेली महसुली तूट, राज्यातील 80 टक्के जनतेला दररोज सुमारे 4 तासांहून अधिक भारनियमन सोसावे लागणे, भारनियमनामुळे शेती उद्योग व गावांतील बरेचसे छोटे उद्योजक अडचणीत आले असणे, वीज वितरण कंपनीच्या प्रशासनाने गांभीर्याने लक्ष न दिल्याने विद्युत प्रकल्पांना अव्यावसायिक पद्धतीने नुकसानीत चालविले जात असणे, वीज निर्मिती केंद्रांना अनियमित कोळशांचा पुरवठा, पाण्याची टंचाई, वीज निर्मितीचे बरेचसे संच जुने झाले असून जुन्या संचांना चालविण्यासाठी बराच खर्च करावा लागत असणे, त्याऐवजी आधुनिक तंत्राने संचाचे नूतनीकरण करणे किंवा नवीन संच बसविण्याची आवश्यकता, रत्नागिरी जिल्ह्यातील दाभोळ वीज निर्मिती प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरु करण्यास शासनास आलेले अपयश, शासनाने या प्रकल्पातून अंग काढून घेतल्यामुळे शासनाला झालेले आर्थिक नुकसान, राज्यात 5 लाख सौर पंप बसविण्याची शासनाने घोषणा करुनसुध्दा अजूनही सौर पंप बसविण्यात येत असलेल्या अडचणी, मुंबई शहरास विद्युत पुरवठा करणाऱ्या बेस्ट, टाटा पॉवर कंपनी व रिलायन्स एनर्जी या तिन्हीही कंपन्यांनी विजेचे दर समान ठेवण्याबाबत अभ्यास करुन प्रस्ताव सादर करावा असे मा.मुख्यमंत्र्यांनी माहे फेब्रुवारी, 2016 मध्ये निदेश देऊन सुद्धा त्यावर अद्याप कोणतीही कार्यवाही न होणे, राज्यातील पॉवरलूम उद्योग अडचणीत आला असून या उद्योगाकरिता वेगळी वर्गवारी निर्माण करण्याची गरज असून या उद्योगाला अनुदान देण्याची आवश्यकता, राज्यात विजेची गळती व चोरी होण्याचे प्रमाण अधिक असणे, वीज वितरणातील गळती सरासरी 16 टक्के असणे, इंधन पुरवठा करारानुसार कोळशाची संयुक्त नमुना तपासणी केवळ कोळसा पुरवठ्याच्या ठिकाणी होत असणे, जो दर्जा घोषित केला जातो त्यानुसार प्रत्यक्षात औष्णिक विद्युत केंद्रांना त्या दर्जाचा कोळसा प्राप्त होत नसणे, कोळसा खरेदीमध्ये होत असलेला भ्रष्टाचार, शासनाने राज्यातील 1,308 उद्योगांकडे असलेला सुमारे 550 कोटी रुपयांचा कर माफ करुन वीज ग्राहकांवर त्यांचा बोजा टाकलेला असणे, ग्राहकांच्या वीज बिलात होणाऱ्या गफलती, कृषी पंपाची 13,500 कोटी रुपयांची असलेली थकबाकी, सौर ऊर्जेचा विकास ही काळाची गरज असून सौर ऊर्जेचा जास्तीत जास्त उपयोग करण्याची आवश्यकता,

...3/-



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( अध्यक्षस्थानी तालिका सभाध्यक्ष श्री. सुभाष साबणे )**

श्री. दिलीप वळसे-पाटील ....

अणुविद्युत ऊर्जेचा शासनाने 3 टक्के इतका अल्प उपयोग करुन घेतलेला असणे, अणुऊर्जा हा एकमेव पर्याय असून त्यामुळे भविष्यात राज्याला ऊर्जा स्वतंत्र मिळवून देऊ शकत असल्याने शासनाने ही बाब गांभीर्याने घेण्याची आवश्यकता, राज्यातील बरेच जलविद्युत प्रकल्प पाण्याअभावी बंद पडलेले असणे, यात सर्वाधिक प्रकल्प बीड जिल्ह्यातील असणे, यापूर्वी केंद्र शासनाकडून राज्यातील जलस्वराज्य योजना, भारत निर्माण योजना व पंतप्रधान ग्रामसडक योजनांकरिता निधी मिळत असणे, परंतु गत दीड वर्षापासून केंद्र शासनाने हा निधी राज्य शासनाला देण्याचे बंद करणे तसेच राज्य शासनाने सुद्धा या योजनांसाठी निधी देण्याचे बंद केल्यामुळे राज्यातील अनेक योजना बंद अवस्थेत असणे, या योजनांचा निधी देऊन या योजना पूर्ण करण्याची नितांत आवश्यकता, बंद असलेले विद्युत प्रकल्प सुरु करुन आवश्यक वीज निर्मिती करण्याबाबत तसेच वीज कंपन्यांमध्ये सुरु असलेला गैरव्यवहार व भ्रष्टाचार रोखण्यासाठी त्याचप्रमाणे राज्यातील केंद्राने बंद केलेला निधी परत मिळवून व राज्य शासनाने स्वत:चा निधी देऊन राज्यात बंद असलेल्या योजना पूर्ण करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

अध्यक्ष महोदय, काल या सभागृहात ऊर्जा विभागाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा सुरु असताना सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्य माननीय ऊर्जा मंत्री महोदयांचे खूप कौतुक करीत होते. मलाही त्यांचे खूप कौतुक आहे की, ते या विजेच्या प्रश्नाकडे लक्ष देऊन खूप काम करीत आहेत, प्रयत्न करीत आहेत. परंतु, त्यात काही अधिक सुधारणा करण्याची आवश्यकता आहे आणि त्या करण्याच्या दृष्टिकोनातून आपण जे बोलत आहात ते प्रत्यक्षात खाली फिल्डवर घडत आहे काय, त्याचा परिणाम दिसत आहे का, तुमच्याकडे काही लॉंग टर्म प्लानिंग आहे काय, याबाबतचा विचारविनिमय करण्याच्या दृष्टिकोनातून हा विषय आज येथे उपस्थित केलेला आहे.

अध्यक्ष महोदय, गेली अनेक वर्षे या राज्यात विजेच्या प्रश्नावरुन सभागृहात किंवा सभागृहाच्या बाहेर मोठे राजकारण झाले. एखाद्या प्रकल्पावरुन, एखाद्या विषयावरुनही राजकारण

..4/-



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप वळसे-पाटील ...

झाले. आज मंत्री महोदयांना मला हे सांगावयाचे आहे की, आपण चांगले काम करता हे गृहित धरुनही आज महाराष्ट्राच्या वीज क्षेत्राची पिछेहाट होत असल्याचे आम्हाला दिसत आहे. मी ज्यावेळेस असे म्हणतो तेव्हा त्याला काही कारणे आहेत. आज तुम्ही या सभागृहात हे सांगावे की, आज तुम्ही ज्या पद्धतीने वीज मंडळ चालवित आहात, त्यानुसार तुमची मंथली रिकव्हरी किंवा मंथली कलेक्शन हे वाढले आहे की कमी झाले आहे, त्याची काय परिस्थिती आहे, तुम्हाला त्यातून तुमचे खर्च पुरे करण्यास पुरेसा पैसा मिळत आहे काय ?

मी ज्यावेळेस वीज मंडळ असे म्हणतो तेव्हा ट्रान्सको, जेनको, डिस्कॉम या तिन्ही कंपन्यांच्या संदर्भात मी बोलतो असे तुम्ही गृहित धरावे. एक तर या राज्यात सभागृहात ज्या ज्या वेळेस चर्चा झाली, त्यावेळेस लोडशेडिंग किंवा वीज निर्मितीवर चर्चा झाली. या व्यतिरिक्त ट्रान्समिशन, डिस्ट्रीब्युशन आणि बाकीच्या क्षेत्रातही लक्ष घातले पाहिजे होते.

केंद्र सरकारने सन 2003 चा कायदा आणल्यानंतर या राज्यातील वीज मंडळाचे विभाजन करुन आपण प्रत्येक विभागाला वेगवेगळे काम करण्याची संधी दिली. त्या मधून एका बाजूला निर्मितीचा कार्यक्रम हाती घेतला, एका बाजूला ट्रान्समिशन लाईन्समध्ये सुधारणा करण्याचा कार्यक्रम हातात घेतला तर, दुसऱ्या बाजूला डिस्ट्रीब्युशन सिस्टममध्ये इम्प्रुव्हमेंट करण्याच्या संदर्भातील कार्यक्रम हातात घेतला. त्यातून पायाभूत सुविधा-1, पायाभूत सुविधा-2, अतिरिक्त पायाभूत सुविधा-2 अशा सर्व योजना पुढे आलेल्या आहेत. या संदर्भात सन्माननीय सदस्य त्यांच्या मतदारसंघातील किंवा भागातील अनुभव सांगतील. परंतु, आज मला राज्यात असे चित्र दिसते की, बऱ्याच वेळेस असे बोलले जाते की, आमचे सबस्टेशन मंजूर झाले परंतु, त्याचे काम पुढे जात नाही, कॉंट्रॅक्टर काम करीत नाही, अमुक होत नाही वगैरे.

L-1/...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप वळसे-पाटील.....

थोडक्यात सांगायचे म्हणजे व्यावसायीक कार्यपद्धतीनुसार वीज मंडळाचा कारभार करण्यात येत असल्यामुळे आज या राज्याच्या वीज डिस्ट्रीब्युशनच्या क्षेत्रामध्ये ज्या सुधारणा होणे आवश्यक होते, त्या सुधारणा होताना दिसत नाही. त्या त्रुटींमुळे त्याचा परिणाम आज होत आहे. वीज भारनियमन नाही, असे सरसकट सर्वजण सांगतात. परंतु ग्रामीण भागातील परिस्थिती वेगळी आहे. त्रिफेज कनेक्शनचा वीज पुरवठा रात्री आणि दिवसा किती तास केला जातो, याचा सभागृहामध्ये खुलासा होण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, केवळ महाराष्ट्राच्या वीज मंडळाने काही चुकीची धोरणे स्वीकारल्यामुळे आज वीज कृषी पंपाची वीज बिलाची थकबाकी जवळपास 13 हजार कोटी रुपये आहे आणि इतर थकबाकी देखील 3 हजार 500 कोटी रुपयांच्या जवळपास पोहोचलेली आहे. आपण थोडा पर्यत्न केला तर 3 हजार 500 कोटी रुपये तातडीने वसूल करणे अवघड नाही. कृषी पंपाच्या संदर्भात तुम्ही पुरवणी मागण्यांमध्ये दरवर्षीप्रमाणे तरतूद केली. कृषी संजिवनी योजना आणली, परंतु त्यामध्ये काही बाबी चुकीच्या केल्या आहेत. राज्य सरकारने 100 टक्के जबाबदारी स्वीकारल्यावर आज राज्यात अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे की, कोणीही कृषी पंपाचे विजेचे बील भरण्यास तयार नाही. याकरिता मदत करावी, पण काही प्रमाणात मदत केली पाहिजे. आपण त्यांना सबसीडीवर वीज देत आहोत. दरवर्षी त्यावर मोठा खर्च केला जातो. ज्यामधून राज्याचे उत्पन्न वाढले पाहिजे. परंतु याचा परिणाम असा झाली की, अन्य बजेट मधून, अन्य ठिकाणावरुन किंवा एआरआरमधून येणारे सर्व पैसे या बाबीवर खर्च करावे लागत असल्यामुळे आज नवीन सुधारणांसाठी, नवीन कार्यक्रम घेण्यासाठी निधी कमी पडत आहे. एका बाजूला आपण काढलेल्या कर्जातून इन्फ्रा-वन किंवा इतर प्रोजेक्ट राबविले त्याचे रिपेमेंट आता सुरु झाले आहे. त्याचे व्याज भरावे लागत आहे. नवीन प्रकल्पाला निधीची आवश्यकता असल्यास हा निधी कुठून उपलब्ध करायचा हा प्रश्न आहे. मंत्री महोदय आपण एवढेच सांगावे की, आज महावितरणचे महाजनकोला किती देणे आहे, हे आपण सभागृहाला कळू द्यावे. महानिर्मिती कंपनीकडून खरेदी केलेल्या वीजेचे पैसे देण्यासारखी महावितरणची परिस्थिती नाही. त्यामुळे एक दिवस भविष्यात निर्मिती कंपनीचे अस्तित्व धोक्यात येईल. निर्मिती कंपनीचे अस्तित्व धोक्यात आल्यावर महावितरणचे देखील अस्तित्व

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप वळसे-पाटील.....
धोक्यात येईल आणि आज दिसत असलेला विजेचा डोलारा, दिसत असलेला गुलाबी फिक्चर बिघडून जाण्यास फारसा वेळ लागणार नाही.

अध्यक्ष महोदय, आज देशामध्ये विजेची टंचाई नाही. महाराष्ट्रामध्ये आपण केलेले काम, देशामध्ये केलेले काम, यामुळे देशातील प्रत्येक राज्यात वीज आहे, केंद्र सरकारकडे वीज आहे. परंतु ती खरेदी करणारे कोणीही नाही. कारण कुठल्याही वीजमंडळाची वीज खरेदी करण्याची क्रयशक्ती राहिलेली नाही आणि आपण हळुहळू आज वीज खरेदीला पैसे देऊ आणि दुसऱ्या बाजूला वीज खरेदीकरिता पैसे देता आले नाही, तर आपल्या समोर असलेल्या समस्या समजून घेण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, मला आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांना एक प्रश्न विचारायचा आहे. मी समजू शकतो की, आज या राज्यामध्ये पाणी नाही म्हणून परळी येथील संच क्र. 3, 4, 5, 6 व 7 हे बंद आहेत. चंद्रपूर येथील 210 मेगावॅटचा व दोन नंबरचा संच बंद आहे. कोराडी येथील सहा नंबरचा संच बंद आहे. कोणी आधुनिकीकरणासाठी तर कोणी पाण्यासाठी असेल पण आज मला हा प्रश्न विचारायचा आहे की, आज केवळ राज्य वीजमंडळाकडे किंवा वीज निर्मिती कंपनीकडे क्षमता आहे, प्रकल्प आहेत, परंतु त्यांनी वीज निर्मिती करण्याचे बंद केलेले आहे. ज्यामध्ये भुसावळ येथील क्रमांक 3, नाशिक येथील क्रमांक 3, 4 कोराडी येथील 5, 7 व भुसावळ येथील 4, 5 हे सर्व वीज निर्मिती केंद्र बंद आहे. विजेची गरज नाही, असे एका बाजूला सांगता आणि वीज निर्मिती केंद्र बंद ठेवता आणि दुसऱ्या बाजूला बाजारामधून मोठ्या प्रमाणात विजेची खरेदी करता, हे आपण समजून घ्यावे.

**अध्यक्ष महोदय,** विजेची मागणी आणि पुरवठा यामध्ये आज फारसे अंतर राहिलेले नाही. पूर्वीच्या काळामध्ये मागणी आणि पुरवठ्यामध्ये तीन, चार हजार मेगावॅटचा फरक होता, तो आज राहिलेला नाही. आज आपण नेक टू नेक आहोत. नेक टू नेक असताना बंद केलेले संच सुरु केले तर आपण सरप्लस जाऊ शकतो. परंतु केवळ आपले आर्थिक गणित बसले पाहिजे, म्हणून आपण हे संच बंद ठेवायला लावून शेतकऱ्यांना रात्री वीज देत आहात. तसेच शेतीला दिवसा दिली जाणारी थ्रिफेजची वीज आठ तासापेक्षा जास्त दिली जात नाही. म्हणून मी सुरुवातीला म्हटले की,

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप वळसे-पाटील.....

अव्यावसायिक पद्धतीने या विभागाचा कारभार चालविल्यामुळे याचा परिणाम चांगला होणार नाही. म्हणजे आपण सदरहू प्रकल्पांवर केलेला खर्च द्यावाच लागणार आहे. आपले त्या प्रकल्पातून येणारे उत्पन्न बुडाले आहे आणि आता इकडच्या, तीकडच्या बाबी कराव्या लागत आहेत. आज रोजी महाराष्ट्रामध्ये विजेची मोठ्या प्रमाणात क्षमता असताना देखील आपण लोडशेडिंग करीत आहात. आपण उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करायला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, एका बाजूला विजेचा पुरवठा करीत असताना दुसऱ्या बाजूला इंडस्ट्रीज्चे ग्राहक दूर जात आहेत. याचे कारण म्हणजे इंडस्ट्रीज्ला खाजगी वितरकांकडून स्वस्तामध्ये वीज मिळत आहे. त्या मानाने आपला विजेचा दर जास्त आहे. आपला एलटी कनेक्शनचा विजेचा दर 8 रुपये 39 पैशापासून 12 रुपये 84 पैशापर्यंत पर युनिट आहे आणि एचटीचा दर 7 रुपये 76 पैशापासून 12 रुपये 22 पैशापर्यंत आहे. त्या तुलनेत आपली वीज महाग आहे. ही महाग वीज स्वस्त करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करायला पाहिजे. आपण इंडस्ट्रीजच्या ग्राहकांना आकर्षित केले पाहिजे की, सोडून दिले पाहिजे, हे आपणच सांगावे.

अध्यक्ष महोदय, आपण एन्रॉनचा प्रकल्प ज्या पद्धतीने आणला आणि ज्या पद्धतीने त्याच्यावर राजकारण होऊन तो युतीच्याच मागच्या काळामध्ये बंद पडला. देशाच्या पंतप्रधानांनी हा प्रकल्प प्रयत्न करुन सुरु केला. परंतु आपण एन्रॉन कंपनी, जीई बेक्टल या सर्वांना पाठवून दिले. दाभोळ पॉवर कॉर्पोरेशन या नावाने नवीन आरजीबीपीएलची रत्नागिरी गॅस ॲण्ड पॉवर कंपनी केली. त्या प्रकल्पामधून आज वीज निर्माण व्हायला लागल्यावर ती वीज महाराष्ट्राने घेण्याऐवजी आपल्याला ही वीज नको अशी भूमिका घेण्यात आली. म्हणजेच आम्ही ती वीज सोडून दिली. या दाभोळ प्रकल्पामधून मिळणाऱ्या विजेचा आम्ही मेन पुरवठा कोणाला करीत होतो? दाभोळ मधून मिळाणाऱ्या विजेचा प्रामुख्याने रेल्वेला पुरवठा केला जात होता. आज रेल्वे सारखा हमखास पैसे देणारा मोठा ग्राहक तुम्ही सोडून दिला. रेल्वेला आज बाजारातून स्वस्तात वीज मिळायला लागली आणि त्यानंतर महाराष्ट्र सरकारने आमचा या प्रकल्पाशी काही संबंध नसल्याची भूमिका घेतली. मी यासंदर्भात मुख्यमंत्री महोदयांसोबत चर्चा केली होती. शेवटी हा प्रकल्प गॅसवर चालणारा आहे.

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप वळसे-पाटील.....

अध्यक्ष महोदय, आज आपण प्रयत्न करुन कोळसा मिळविला, त्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो. तसेच आपल्याला लिकेंज देखील चांगले मिळायला लागले, कोळसा मिळाला व त्यातून आपण 8.81 टक्क्यापर्यंत वीज निर्मिती क्षेत्रामध्ये कामगिरी करुन दाखविली, त्याबद्दलही मी आपले अभिनंदन करतो. परंतु आज इतर मार्गाने देखील वीज निर्मिती करणे आवश्यक होते. परंतु अशी वीज निर्मिती करण्यापासून दूर जाऊ नये. आपल्याला बऱ्याच वेळेला सल्ला दिला जातो की, हे योग्य नाही, ते योग्य नाही. दाभोळ प्रकल्प बंद करताना असाच सल्ला दिला गेला होता की, हा प्रकल्प गरजेचा नाही. आपण एका बाजूला जैतापूर अणूऊर्जा प्रकल्प करण्याचा प्रयत्न करीत आहात. दुसऱ्या बाजूला 2200 मेगावॅटचा प्रकल्प असाच सोडून दिला. दाभोळ येथे या 2200 मेगावॅटच्या प्रकल्पाच्या बाजूला आणखी दुसरा 2200 मेगावॅटचा प्रकल्प उभा करता आला असता. परंतु आम्ही सर्वच सोडून दिले. त्याकरिता आवश्यक पर्यावरणाची मंजूरी आहे, जमीन आहे, तसेच इतर कोणतीही अडचण नव्हती. त्यामध्ये जॉईंट व्हेंचर करुन प्रायव्हेट सेक्टरमधील लोकांना घेतले असते तर आणखी एक प्रकल्प उभा राहिला असता.

अध्यक्ष महोदय, आज जागतीक बाजारपेठेमध्ये क्रुड ऑईलचे, गॅसचे दर मोठ्या प्रमाणात कमी होत असून त्याचा फायदा आपल्याला घेता आला असता. परंतु आपण घाई केली आणि दाभोळचा प्रकल्प सोडून दिला. त्यामध्ये आपले सरासरी उत्पन्न वाढले असते. केवळ आपल्या प्रशासनाच्या निर्णयामुळे ते उत्पन्न घालवायचा प्रयत्न झाला आहे. पर्यायाने याचा फायदा खाजगी क्षेत्राला होत आहे.

...M/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप वळसे-पाटील......

आज वीज उपलब्ध असून सेंट्रलच्या एक्सचेंज मधून पाहिजे तेव्हा वीज मिळते, खाजगी प्रकल्पातून मिळते. मी राज्याचा वीज मंत्री होतो. 5,000 ते 5,500 मे.वॅ.प्रकल्पांचे पावर पर्चेस ॲग्रीमेंट करुन ठेवले आहेत. राज्य सरकारने स्वातंत्र्य मिळाल्यापासून जेवढे प्रकल्प उभारले होते तेवढेच प्रकल्प महानिर्मितीच्या मालकीचे उभारण्यात आले असल्याने परिणामी हे राज्य वीजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाले आहे.

अध्यक्ष महोदय, एका बाजूने वीजेची उपलब्धता वाढलेली असून दुसऱ्या बाजूने डिस्ट्रब्यूशन संदर्भात जाणीवपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक आहे. ट्रान्सफार्मर जळाला तर तो मिळत नाही, नवीन सबस्टेशन करावयाचे असेल तर ते होत नाही. आज ट्रान्समिशन कंपनीच्या संदर्भात असाच प्रयत्न करणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, आजच्या तारखेला महाजेन्कोची 11,897 मे.वॅट स्थापित क्षमता आहे, वेस्टर्न रिजनमधून आपल्याला 4,800 मे.वॅट वीज मिळते, इस्टर्न रिजनमधून 148 मे.वॅट वीज मिळते, दाभोळची वीज आपण घालवून टाकली आहे. खाजगी वीज कराराच्या माध्यमातून 5,465 मे.वॅट, मुंद्रा प्रकल्पाच्या माध्यमातून 760 मे.वॅट व महाजेन्कोच्या प्रकल्पातून वीज उपलब्ध होत असल्याने हे सरकार नशीबवान आहे. या सरकारला वीजेच्या बाबतीत कोणत्याही क्रायसीसचा सामना करावयाचा नाही. वीज उपलब्ध नसती तर हे सरकार काहीच करु शकले नसते. सरकारच्या मालकीचे एवढे प्रकल्प बंद असताना देखील वीजेचे शॉर्टेज जाणवत नाही कारण या देशात वीजेची उपलब्धता आहे.

अध्यक्ष महोदय, एक बाजूला वीज निर्मिती वाढविण्यात आली परंतु दुसऱ्या बाजूला मागील तीन वर्षात झालेली वीजेची हानी आपण पाहिली तर आपण निश्चितपणे बॅकफुटवर गेलो आहोत. महावितरणचा सन 2013-14 मधील डिस्टीब्यूशन लॉस 14 टक्कयावर होता तो सन 2014-15 मध्ये 14.17 टक्क्यावर व सन 2015-16 मध्ये 15.77 टक्क्यावर गेला आहे. महापारेषणमध्ये सन 2013-14 मध्ये 4.8 टक्के, सन 2014-15 मध्ये 3.89 टक्के, सन 2015-16 मध्ये 3.95 टक्के डिस्ट्रीब्यूशन लॉस आहे. ही आकडेवारी सरकारने महाराष्ट्राची आर्थिक पाहणी पुस्तकामध्ये जाहीर

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप वळसे-पाटील......

केलेली आहे. त्या आकड्यांच्या आधारावर मी आपले लक्ष वेधित आहे. महावितरण व महापारेषणचा एकत्रिक डिस्ट्रीब्यूशन लॉस म्हणजे एटीएनसी लॉस पाहिला तर त्यामध्ये सन 2013-14 मध्ये 17.68 टक्के, सन 2014.15 मध्ये 18.71 टक्के व सन 2015-16 मध्ये 21.83 टक्के एटीएनसी लॉस पोहोचू शकतो असा अंदाज सरकारने व्यक्त केला आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात एटीएनसी लॉस वाढत जाणार असेल तर त्याचा परिणाम महसूलावर व वितरणावर होऊन एका दिवशी हे गाडे बिघडत जाईल, ही बाब मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

अध्यक्ष महोदय, कृषी पंपाची मागणी किती आहे, किती कनेक्शन दिले, याचा खुलासा ऊर्जा मंत्री महोदयांनी करावा. केवळ कृषी पंप देऊन चालत नाही तर त्यासाठी कनेक्शन देताना बॅकवर्ड इंटिग्रेशनची सुविधा निर्माण करावी लागते व आज ती सुविधा राज्यात निर्माण होत नाही. त्यामुळे कृषी पंपा संदर्भात अडचण निर्माण झाली आहे.

अध्यक्ष महोदय, मी आपणास विचारु इच्छितो की, सरकारला खरोखर सुधारणा करावयाची आहे काय ? केंद्र शासनाने उदय स्कीम काढली. उदय स्कीम म्हणजे डिस्ट्रीब्यूशन ॲश्यूरन्स योजना. या योजनेच्या ॲग्रीमेंट वर राज्य सरकारने स्वाक्षरी का केली नाही ? इतर राज्यांनी या स्कीमच्या ॲग्रीमेंट वर स्वाक्षरी केली आहे. या योजनेच्या ॲग्रीमेंटवर राज्य सरकारने स्वाक्षरी केली असती तर केंद्र सरकारकडून इन्फ्रास्ट्रक्चरसाठी निधी प्राप्त करुन घेणे शक्य झाले असते. उदय योजनेत राज्य सरकार का सहभागी झाले नाही, याचा खुलासा सभागृहाच्या माध्यमातून करण्यात यावा.

अध्यक्ष महोदय, वीज दरवाढ केली असे सरकारने सांगितले. आता सरकारला पुन्हा वीज दरवाढ करावी लागणार आहे. आता राज्य सरकारने एआरआर सादर केला आहे, त्यामध्ये माझ्या माहितीनुसार सरकारने 20 टक्क्यांच्या वाढीची मागणी केली आहे. माझी माहिती चुकीची असेल तर तुम्हाला त्यामध्ये दुरुस्ती करण्यास वाव आहे. साधनसामुग्रीसाठी, व्यवस्थापनासाठी, कर्जासाठी, व्याजासाठी, घसाऱ्यासाठी व सगळ्यात महत्वाचे म्हणजे वीज खरेदीसाठी एआरआर मध्ये आपल्याला विचार करावा लागतो.

.....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप वळसे-पाटील......

अध्यक्ष महोदय, आता एमएमआर व आर-इन्फ्रारेडचे प्रिपेड मिटर बसविण्यात येणार आहेत, असे सांगण्यात येत आहे. परंतु आपण प्रत्येक गावात जाऊन पहावे. आम्ही सर्व मिटर 100 टक्के रिडींगवर आणण्याचा प्रयत्न करीत आहोत. परंतु अनेक गावामध्ये मिटरचे प्रत्यक्ष रिडींग न घेता ॲव्हरेज बील लावले जात आहे, त्यामुळे स्लॅब चेंज होतो. याप्रकरणी सन्माननीय सदस्य श्री.किसन कथोरे व सदनातील प्रत्येक सदस्य माझ्या मताशी सहमत असतील, याची मला खात्री आहे. विशेषतः आदिवासी भागातील कोणत्याही मिटरचे रिडींग न घेता अंदाजपंचे दर आकारुन बील देऊन शेतकऱ्यांवर मोठ्या प्रमाणार भुर्दंड टाकण्यात येत आहे. ज्या व्यक्तिच्या घरामध्ये दोन बल्ब आहे त्यास 5 ते 10 हाजर रुपये वीज बील देण्यात येते व प्रचलित नियमानुसार ते भरल्या शिवाय त्यामध्ये दुरुस्ती करण्यात येणार नाही, असे सांगण्यात येते. या नियमामुळे लोकांच्या मनामध्ये असुरक्षिततेची व नाराजीची भावना निर्माण झालेली आहे.

अध्यक्ष महोदय, उद्योगातून 49.25 टक्के महसूल मिळत होता त्यामध्ये 2 टक्के घट सन 2015-16 मध्ये झाली आहे. शेतीमधून 2.9 टक्के महसूल मिळत होता तो यावर्षी 0.68 टक्के कमी झालेला दिसणार आहे. वीज मंडळाचा कारभार अव्यवहार्य पध्दतीने चालत असल्याने त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी वाव आहे. त्यामुळे आज ही परिस्थिती निर्माण झाली आहे. विद्युत वितरणमधून मागील वर्षी 96 टक्के उत्पन्न मिळाले होते, ते यावर्षी 96 टक्के आहे परंतु वीज खरेदीमध्ये 10 टक्के खर्चात वाढ झालेली आहे. मागील वर्षी मिळणाऱ्या उत्पन्नाच्या 75 टक्के रक्कम म्हणजे 39,526 कोटी रुपये वीज खरेदीसाठी खर्च केले होते व यावर्षी 49,088 कोटी रुपये वीज खरेदी करण्यासाठी खार्च केले आहेत. अशा प्रकारे जवळपास 10 हजार कोटी रुपये अधिकचे खर्च करुन खाजगी उद्योजकांच्या घशात घालण्यासाठी वीज खरेदी का करण्यात आली, हे मला माहीत नाही व ते मला समजत नाही. दुरुस्तीवरील खर्च देखील फारसा सुधारलेला नसून जवळपास 366 कोटी रुपये महसूली लेखा कमी झालेला आहे, ही बाब लक्षात घेऊन सुधारणा करण्याचा प्रयत्न करणे आवश्यकत आहे.

....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप वळसे-पाटील......

अध्यक्ष महोदय, वीज मंडळाच्या कर्जासंदर्भात विचार करण्याची व नियोजन करण्याची आवश्यकता आहे, हे सरकार त्यासाठी प्रयत्न करीत आहे, ही गोष्ट आम्हाला जमली नव्हती. वीज मंडळाचे विभाजन केल्यानंतर एफआरपीचा प्लॅन करण्याचे ॲग्रीमेंटमध्ये मान्य केले होते. सन 2005 पासून आजपर्यंत फायनान्शिअल रिस्ट्रक्चरींगचा प्लॅन पूर्ण करता आला नव्हता तो सरकारने आता हाती घेतला आहे, असे मला समजले आहे. त्यासंदर्भात मंत्रिमंडळामध्ये निर्णय झाला.

यानंतर N-1......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप वळसे पाटील......

आज या सर्व कंपन्या आहेत. या सर्व कंपन्यांवरील कर्ज एकदाची नील झाली. या पोटी मिळणारी इक्वीटी आपण राज्य सरकारकडून घेतली तर निश्चितपणे आपल्याला अधिक ब्रिदींग स्पेस मिळणार आहे. मध्यंतरी आपण घोषणा केली होती की, आम्ही वीज मंडळाचे फर्दर अनबंडलींग करु आणि फर्दर अनबंडलींग करण्याच्या दृष्टीकोनातून वीज मंडळाच्या आपण ज्या तीन कंपन्या केल्या आहेत त्याऐवजी विभागवार कंपन्या करण्याच्या संदर्भात आपण घोषणा केली होती. त्या घोषणेचे पुढे काय झाले हे एकदा या सभागृहाला कळले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, या सभागृहामध्ये सदनाचे नेते माननीय मुख्यमंत्री यांनी घोषणा केली होती की, बेस्ट, टाटा, रिलायन्स आणि महावितरण यांचे वीजेचे दर एकसमान असतील आणि राज्यात जे दर असतील तेच दर मुंबईत असतील. त्यासंबंधी मी डायरेक्टीव दिलेले आहेत आणि सुधारणा करण्याचे सांगितले आहे. आजच्या तारखेपर्यंत या संदर्भात काहीही निर्णय झाला नाही. अर्थात ही घोषणा त्यांनी सभागृहात केली की सभागृहाच्या बाहेर ते मला निश्चितपणे सांगता येणार नाही. पण ही घोषणा त्यांनी केली होती. आपण हा निर्णय करणार कसा, कारण घोषणा करताना आपल्याला विचार करायला पाहिजे की, आपल्याला जर वीजेच्या दरामध्ये समानता आणावयाची असेल तर एमईआरसीने आपले म्हणणे ऐकले पाहिजे. माझी माहिती अशी आहे की, एमईआरसीने हे प्रकरण नाकारले आहे. एमईआरसीने जर हे प्रकरण नाकारले असेल तरी सुध्दा आपल्याला मुंबईतील रहिवाशांना न्याय द्यावयाचा असेल तर तेवढी तरतूद आपल्या राज्याच्या बजेटमधून करावी लागेल, तरच आपल्याला वीजेच्या दरामध्ये समानता आणता येईल. अन्यथा आपल्याला वीजेच्या दरामध्ये समानता आणता येणार नाही. याकरिता थोडे थिडके म्हणजे 2500 कोटी रुपये आपल्याला राज्याच्या तिजोरीतून द्यावे लागतील आणि त्यानंतरच आपल्याला ही घोषणा पूर्ण करता येईल. आज ही घोषणा नक्की कोठपर्यंत आहे ते आम्हाला सांगण्यात यावे. यावेळी झालेल्या नागपूरच्या अधिवेशनात मला येता आले नाही. पण मागच्या नागपूरच्या अधिवेशनामध्ये ज्यावेळी दुष्काळावरील चर्चा झाली. त्या चर्चेवरील माननीय मुख्यमंत्र्यांचे भाषण आपण आजही काढून वाचले तर या चर्चेला उत्तर देताना आपल्याला टँकर्स कसे उपलब्ध करुन देणार, रोजगार हमी योजनेवरील कामे कशी सुरू करणार, पिण्याचे पाणी कसे देणार, जनावरांसाठी पाणी कसे देणार, यांच्या विषयी मोठमोठ्या घोषणा माननीय मुख्यमंत्र्यांनी केल्या होत्या. त्यामध्ये केलेली एक घोषणा

2........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप वळसे पाटील......

मला मुद्दाम निदर्शनास आणून द्यावयाची आहे, कारण ती आपल्या विभागाशी संबंधित आहे. या राज्यामध्ये गोरगरीब लोकांना आम्ही सोलर्स पंप देणार आहोत. पाच लाख सोलरपंप आम्ही पाच वर्षात देणार आहोत. एका सोलर पंपासाठी साधारणपणे 5 लाख रुपये खर्च आपण धरलेला होता. त्यामुळे 5 लाख सोलर पंप्स द्यावयाचे असतील आणि एका सोल पंपचा खर्च 5 लाख असेल तर 25000 कोटी रुपये आपल्याला 5 वर्षात द्यावे लागतील. दीड वर्षे तर गेले, आज अर्थसंकल्प आहे. आजच्या अर्थसंकल्पात या सोलरसाठी किती तरतूद होते ते मला बघायचे आहे. ज्या योजनेसाठी 25000 कोटी रुपये खर्च येणार आहे ती योजना मागचा पुढचा कोणताही विचार न करता आपण धाडकन जाहीर करुन टाकली आहे. सन्माननीय मंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे साहेब मला आपल्याबद्दल प्रेम आहे. मी आपल्याला हा प्रश्न विचारतो की, ज्या पंपाची किंमत आपण महाराष्ट्रात सुरुवातील 5 लाख रुपये पर पंप ठरविली आहे, तोच पंप गुजरातमध्ये अडीच लाख रुपये पर पंपाप्रमाणे खरेदी झाली किंवा त्याचा निर्णय झाला आहे. त्यामुळे आपली पर पंपामध्ये अडीच लाख रुपये किंमत जास्त होते. आता ते काम थांबले आहे. कशामुळे थांबले ते मला माहिती नाही. पण आपलयाला याची जेवढी किंमत कमी करता येईल तेवढी केली पाहिजे. यासाठी आपण टार्गेट कमी करा. त्यासाठी हरकत नाही. 5 लाख होणार नसेल तर ते कमी करा. सोलर पंप्स दिलेच पाहिजे. कारण शेवटी एका विहिरीवर एक कनेक्शन द्यावयाचे आहे. त्यासाठी 10 पोल्स उभारावे लागतात. ते शक्य होत नाही. लोकं त्यांच्या शेतातून पोल्स जाऊ देत नाहीत. सोलर पंप दिला तर कदाचित त्या शेतकऱ्याचा प्रश्न सुटेल. त्यामुळे पाणी नाही, म्हणून पीक नाही, म्हणून कर्ज भरता आले नाही, म्हणून आत्महत्या केली, या बाबी त्या ठिकाणी होणार नाहीत. म्हणून या योजनाला आमचा पाठिंबा जरी असला तरी या योजनेचे नेमके काय झाले हे कळले पाहिजे. मी माननीय मंत्री महोदयांना एक प्रश्न विचारु इच्छितो की, आपण ज्यावेळी सोलर पंप बसविणार आहात त्यावेळी त्यासाठी आपल्याला नेट मिटरींग सुविधा करावी लागणार आहे. आज आपण ही नेट मिटरींग सुविधा देण्यासाठी कोणती योजना आखली आहे, ते आम्हाला समजले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, आज पॉवरलूम इंडस्ट्रीच्या संदर्भात मला विचारले पाहिजे की, शेतीनंतर सर्वांत जास्त रोजगार उपलब्ध करुन देणारा व्यवसाय कोणता असेल तर तो म्हणजे पॉवरलूम इंडस्ट्री आहे. त्यामुळे या पॉवरलूम इंडस्ट्रीला सपोर्ट करण्याची भूमिका यापूर्वीच्या सर्वच

3......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप वळसे पाटील......

सरकारांनी घेतलेली होती आणि आपणही घेतलेली आहे. काल पुरवणी मागण्यांच्या संदर्भात आपण तरतूद करुन काही प्रमाणात दिलासा दिला आहे. आता मोठे उद्योग इतरत्र गेले आहेत. पण हा लहान उद्योग आहे.

अध्यक्ष महोदय, आपण मेक इन इंडिया आणि मेक इन महाराष्ट्र यांची चर्चा करीत आहोत, परदेशातील गुंतवणूक आली पाहिजे असे म्हणता, फॉरेन डायरेक्ट इन्व्हेस्टमेंट आली पाहिजे अशी भूमिका आहे. त्यासाठी बाहेरच्यांना आमंत्रित केले जाते. आपले मोठे उद्योग दुसरीकडे गेले. दुसऱ्या बाजूला आपण 10 लाख कोटी, 15 लाख कोटी, 20 लाख कोटी रुपयांची इन्व्हेस्टमेंट येणार असे म्हणता, एवढी इन्व्हेस्टमेंट येत असताना, परवा बीकेसीच्या कार्यक्रमामध्ये उद्योजकांनी आपल्याला सर्वात पहिला हाच प्रश्न विचारला होता की, वीजेच्या स्टॅबिलीटीच्या संदर्भात आपण कोणती उपाययोजना करणार आहात, हा मोठा प्रश्न आपल्यासमोर आहे. त्यासाठी इन्फ्रास्टक्चर उभारणे उभे करणे हा सर्वात महत्वाचा विषय आहे. त्या विषयासाठी आपल्याकडे नक्की कोणता कार्यक्रम आहे. हे आपण सांगितले तर बरे होईल. नागपूर शहरातील सांडपाण्याचा वापर आपण करावयाचा ठरविला आहे.

अध्यक्ष महोदय, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना वीजेच्या बिलामध्ये 33 टक्के माफी देण्याच्या संदर्भात आपण भूमिका घेतली आहे. पण एका बाजूला ही 33 टक्के माफी देत असताना दुसऱ्या बाजूला ज्यांची वीज बिले थकलेली आहेत त्यांना थकलेल्या वीजेच्या मूळ बिलामध्ये 50 टक्के माफी देण्याची आपली कृषी संजीवनी योजना आहे, ती कृपया पहावी. यामध्ये सर्व सभागृहाने आता निर्णय घेण्याची वेळ आली आहे. ही सवलत देत असताना आपण पाहिले पाहिजे की, एका बाजूला लोडशेडिंगवर मात करीत आपण आतापर्यंत जेथे पोहोचलो आहोत, तेथे पोहोचलो आहोत. परंतु आर्थिक गर्तेत हे जहाज आणखी अडकविण्याचे ठरविले आणि परिस्थिती बिघडवायची ठरविली तर भविष्यकाळात तुम्हा आम्हाला कोणी माफ करणार नाही, असे मला वाटते. त्यामुळे या बाबतीत निर्णय घेताना फक्त लोकांना चांगले काय वाटेल, शेवटी हे इन्फ्रास्टक्चरचे क्षेत्र आहे. आपला सत्कार करणारे लोक खूप भेटतील, आपला सत्कार करणारे लोक खूप भेटतील, आपल्याला गोडगोड बोलणारे लोक खूप भेटतील. पण शेवटी तिजोरीत पैसा कसा येणार, हे महत्वाचे आहे. आज 78 हजार कर्मचारी वीज मंडळामध्ये आहेत. त्यांचे वेल्फेअर तर आहेच, पण या संपूर्ण

4.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप वळसे पाटील......

महाराष्ट्रातील शेतकरी आहे, उद्योग आहे, लघुउद्योग आहे, पॉवरलूम इंडस्ट्री आहे, घरगुती ग्राहके आहेत, वाणिज्य ग्राहके आहेत या सर्व क्षेत्रामध्ये जेव्हा गुंतवणूक येणार आहे त्यावेळी महाराष्ट्र वीजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण असेल काय, आपण मला सांगावे की, महाराष्ट्राच्या एकाही जिल्ह्यात किंव एकाही तालुक्यात आम्ही लोडशेडिंग करीत नाही. आम्ही सर्वांना 24 तास थ्री फेस कनेक्शनची वीज देतो. आपण नाही देऊ शकत. आपण सिंगल फेसिंग केले. फिडर सेपरेशन केले पण त्यावेळी आपल्यासमोर दुसरा कोणताही पर्याय नव्हता म्हणून आपण ते केले आहे. कारण शेवटी वीज निर्मितीचे प्रकल्प उभे करावयाचे असतील तर एका दिवसात किंवा दोन दिवसात वीज निर्मिती प्रकल्प उभा राहू शकत नाही.

यानंतर O-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप वळसे-पाटील...........

आज सुरुवात केली तर 4-5 वर्षानी वीज निर्मितीच्या प्रकल्पामधून वीज मिळायला लागते. शासनाने रिन्युव्हल एनर्जीच्या संदर्भात धोरण जाहीर केले. एकदा धोरण जाहीर केल्यानंतर आजच्या तारखेपर्यंत कुठे जाऊन पोहचलेले आहात. यामध्ये काय काय प्रयत्न केले, प्रयत्नांना यश येते किंवा नाही. तुमची पॉलिसी सक्सेस होते किंवा नाही. केंद्र सरकारच्या हरित ऊर्जा योजनेतून 367 कोटी रुपये शासनाला मिळायचे आहेत. त्यामध्ये काही क्लियारिटी आहे असे मला दिसत नाही. मला मंत्री महोदयांचे एका गोष्टीकडे लक्ष वेधायचे आहे की, इलेक्ट्रीसिटी ॲक्ट-2003 मधील सेक्शन 55 आपण कृपया वाचावा. सेक्शन 55 मध्ये ज्या तरतूदी आहेत त्या तरतूदींची कम्प्लायन्स करण्याची जबाबदारी प्रत्येक वीज पुरवठा करणाऱ्या कंपनीवर आहे. वीज पुरवठा करणाऱ्या कंपनीवर जी जबाबदारी आहे त्यामधील तरतूदी सांगून मी सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही. या तरतूदींचा वापर करुनच किंवा वाचन करुनच याबाबतचे जे आर्थिक निर्णय भविष्यामध्ये घ्यायला पाहिजेत. हे काम आपण केले नाही तर निश्चित प्रकारे अडचणीत आल्याशिवाय राहणार नाही. मी आणखी एका गोष्टीचा खुलासा करावा की, या 1308 उद्योगांना कराच्या माध्यमातून 550 कोटी रुपयांची माफी कशाकरिता केली हे सभागृहाला कळाले पाहिजे. मोठे उद्योग, कृषी पंप यांना वीज माफी दिल्यानंतर एमएसबी तोट्यात जाईल. शेवटी माणसे येतात आणि जातात, सरकारे येतात आणि जातात. सिस्टीम राहिली पाहिजे, शो चालू राहिला पाहिजे. आज जरी आपल्याला गोड वाटले तरी अल्टीमेटली त्याचा बोजा सर्वसामान्य माणसावर येतो. दीड वर्षापासून आपण काम करीत आहात. आज मला टीकेच्या स्वरुपामध्ये किंवा दोषाच्या स्वरुपामध्ये बोलायचे नाही. मला या विषयावरील थोडेफार कळले ते आपल्यासमोर मांडण्याचा प्रयत्न केला. आजही त्यात सुधारणा करण्यासारखे खूप विषय आहेत. यामध्ये निश्चितपणे सुधारणा करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करा. एवढेच मी याठिकाणी आवाहन करतो. धन्यवाद, जय हिंद जय महाराष्ट्र.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

---------

...........2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) : अध्यक्ष महोदय, नियम 293 अन्वये प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे. या राज्यातील वीजेच्या अत्यंत महत्वाच्या विषयावर याठिकाणी चर्चा चालू आहे. राज्यामध्ये दुष्काळाबरोबर पाण्याचीही अत्यंत टंचाई निर्माण झालेली आहे. दुष्काळाला सामोरे जात असताना पाण्यावर चालणाऱ्या हेटवणे, कोयना यासारख्या प्रकल्पांमधून होणारी वीज निर्मिती भविष्यात थांबणार आहे. आज रिप्लाय कसा होणार आहे. नंतर कोणीही थांबत नाही. याठिकाणी चर्चा सुरु होत असताना महाराष्ट्रामध्ये प्रचंड दुष्काळ आणि पाणी टंचाईने अनेक शेतकऱ्यांच्या संदर्भातील प्रश्न सुटायला पाहिजेत. वीजेच्या माध्यमातून न्याय देण्याचा प्रयत्न याठिकाणी होणार आहे. साडेचार हजार कोटी रुपयांचे व्याज आणि 45 हजार कोटी रुपयांचे कर्ज या विद्युत मंडळावर आहे. यातून सर्वसामान्य माणसाला दिलासा देणे. त्यांना 24 तास वीज पुरविणे हे शासनाचे कर्तव्य आहे. माननीय मंत्री महोदय आपण चांगल्या कामाला सुरुवात केली. काही गोष्टी चांगल्या झाल्यातर त्याचा उल्लेख करणार आणि काही गोष्टी चुकल्यातर त्यावर निश्चितपणे बोट ठेवावे लागणार आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रामध्ये सुरु असलेले जे प्रकल्प आहेत यामध्ये अनेक प्रकल्प आहेत की, जे आघाडी सरकारने सुरु केले होते. सदर प्रकल्प विहित कालावधीमध्ये पूर्ण होण्याची आवश्यकता होती. उदाहरण सांगायचे असेल तर खापरखेडा प्रकल्प, कोराडी प्रकल्प असेल हे प्रकल्प मुदतीमध्ये पूर्ण होऊ शकले नाहीत. या प्रकल्पावर काम करणाऱ्या ज्या एजन्सी आहेत, जी काम करणारी मंडळी आहे त्यांच्याकडून किती कोटी रुपये दंडापोटी वसूल केले आणि दंडापोटी शासनाचे किती कोटी रुपयांचे नुकसान झाले. कारण हे प्रकल्प पूर्ण होऊ शकले नसल्यामुळे महाराष्ट्रातील वीजेची पूर्तता करण्यासाठी खाजगी प्रकल्पातून वीज खरेदी करावी लागली. माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे आणि सूचनाही आहे की, जे प्रकल्प आहेत त्यांची इफिसिअन्सी कमी झालेली आहे, ज्या प्रकल्पांची क्षमता कमी झालेली आहे. कोळसा तेवढाच जातो, कच्चामाल तेवढाच जातो. परंतु विद्युत निर्मिती होत असताना 40 टक्क्यांवरुन 50 टक्के सुध्दा होत नाही. त्यामुळे निर्मितीचे दर हे दुप्पट, तिप्पट झालेले आहेत. 6 ते 7 रुपये दराने प्रकल्पातून वीज

.........3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विजय वडेट्टीवार.........

निर्मिती होते. या तुटीबाबत काही उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत काय? किंवा करणार आहात. अध्यक्ष महोदय, खरे तर हे प्रकल्प बंद करण्यापेक्षा पुनर्जिवित करून इफिसिअन्सी कशी वाढविता येईल याचा विचार केला पाहिजे. सरकार आल्याबरोबर सन 2015 मध्ये वीजेच्या बीलाचे दर वाढविले. जवळपास 1 रुपया 70 पैशांनी वाढ झालेली आहे. हा भार कशासाठी टाकला. लोकांना दिलासा देण्याचे काम शासनाने करायला पाहिजे होते. लोकांची मागणी वाढत चालली हे खरे आहे. वीजेची मागणी दर दहा वर्षांनी दुप्पट पेक्षा जास्त वाढते याची आम्हाला माहिती आहे. परंतु आपण म्हणाल की आम्ही वीजेचे दर वाढविले नाही. पण तुम्ही स्लॅब कमी केला. स्लॅब कमी करून त्यामध्ये दर वाढविण्याचे काम केले. हा सर्व भार सामान्य जनतेवर टाकण्यात आलेला आहे. हे दर कसे कमी करणार याचा विचार याठिकाणी होण्याची गरज आहे. मला सांगितले पाहिजे की, घोषणा चांगल्या केल्या. पण त्याची अंमलबजावणी नीट होताना दिसत नाही. बेरोजगारांना रोजगार देण्याची घोषणा सरकारने केली. या ठिकाणी फिडर मॅनेंजरी योजना करण्याचे जाहीर केले. या योजनेचे काय झाले. या योजनेच्या जाचक अटीमुळे ही योजना पूर्णतः कोलमडून गेली. याला काहीही प्रतिसाद नाही. आपण सांगितले की, या बीडर योजनेमध्ये संबंधित वीज वाहिनीवरील ग्राहकाचे रिडींग घेणे, बील काढणे, वीज बीलाची वसूली करणे, त्याची देखभाल दुरूस्ती करणे. याचे काय झाले, याला काय रिस्पॉन्स मिळाला. केवळ घोषणा कागदावर राहिली.

P-1.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विजय वडेट्टीवार......

काल आम्ही भाषणे ऐकली आहेत. त्यात घोषणांचा पाऊस आणि कामाचा सुळसुळाट अशी परिस्थिती राज्यामध्ये झालेली आहे. तुम्ही चांगले काम करत आहात. मनासारखे अधिकारी तुम्हाला मिळाले आहेत. एन्जॉय मेहता नावाचा अधिकारी आता तुमच्या बरोबर नाही. कारण 10 वेळा शासनाची परवानगी न घेता श्री.अजय मेहता नावाचा अधिकारी परदेशात जातो. याला तुम्ही एन्जॉय मेहताच म्हणा. श्री.अजय मेहता म्हणून नका. विद्युत मंडळाचा याच माणसाने बट्याबोळ केला. किती वर्षे शेषनागा सारखा बसला होता.

**अध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी सभागृहामध्ये शांतता ठेवावी.

श्री.विजय वडेट्टीवार : अध्यक्ष महोदय, या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री नाहीत. या श्री.अजय मेहताने माननीय मुख्यमंत्री हे विरोधी पक्षात असताना त्यांना काय-काय बोलेले ते रेकॉर्ड काढून पहावे.

श्री.अतुल भातखळकर : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मला माहिती पाहिजे आहे की, सन्माननीय सदस्यांनी एका अधिका-याचे नाव घेऊन काही आरोप केलेले आहेत. त्यावेळेला वीज मंत्री कोण होते. सन्माननीय सदस्यांनी त्यावेळेला या संदर्भात काही तत्कालीन वीज मंत्र्यांकडे तक्रार केली होती का ? त्याची माहिती द्यावी. आम्ही नवीन सदस्य असल्यामुळे आम्हाला माहिती मिळेल.

श्री.शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.अतुल भातखळकर आता जे बोलेले त्याबद्दल मला कल्पना आहे. मंत्री महोदय फार चांगले काम करत आहेत. वीजे सारखा ऊर्जा असलेला मंत्री मिळाल्यावर हे फाटक कोण ते मंत्र्यापेक्षा मोठे आहेत का ? याचे स्पष्टीकरण व्हायला पाहिजे. एवढेच आमचे म्हणणे आहे.

श्री.विजय वडेट्टीवार : अध्यक्ष महोदय, आता सन्माननीय श्री.अतुल भातखळकर यांनी त्यांचे नाव घेतले ते आम्हाला माहिती आहे. माननीय मुख्यमंत्री हे विरोधी पक्षात असताना मी श्री.अजय मेहता यांची भाषणे काढली आहेत. मला वाटले सरकार बदलल्यावर माननीय मुख्यमंत्री श्री.अजय मेहताना धडा शिकवतील ? परंतु तसे काही घडले नाही. याउलट त्यांना मुंबईच्या आर्थिक

....2/-

श्री.विजय वडेट्टीवार......

राजधानीत श्री.सुनिल प्रभुंच्या डोक्यावर. नेऊन बसविले. त्यांना तेथे कशासाठी बसविले, त्यांची चौकशी का केली नाही ? ही गोष्ट मी रेकॉर्डवर आणतो. मी पाहिलेले आहे की, माननीय मुख्यमंत्री यापूर्वी विरोधी पक्षात असताना नागपूरच्या अधिवेशनाच्या वेळी श्री.अजय मेहता हे त्यांच्याशी ज्या पध्दतीने बोलले आणि वर्तन केले. यामुळे त्यांनी त्यावेळच्या माननीय मुख्यमंत्र्यांकडे यासंदर्भात चौकशी करावी अशी मागणी केली होती. आता सत्ता बदलल्यानंतर विरोधी पक्षातून ते आता मुख्यमंत्री पदावर बसलेले आहेत. परंतु आपण त्यांची चौकशी का सुरु केली नाही, कोणाच्या दबावामुळे आपण त्यांना तेथे नेऊन बसविले, याकरिता कोणाचा हातभार लागला, तो कशासाठी लागला या प्रश्नाचे माननीय मुख्यमंत्री यांनी उत्तर द्यावे. या प्रकरणाची एस.आय.डी. मार्फत चौकशी करा, आता मला एका माणसाने माहिती आणून दिली की, सिंगापूरमध्ये सुध्दा या माणसाने फार मोठी कंपनी काढली आहे. आता त्याचे पुरावे नाहीत. परंतु माहिती आहे. त्यामुळे सी.आय.डी., सी.बी.आय. च्या मार्फत चौकशी करा. तुमचा राग आम्ही समजू शकतो. त्यावेळी तुम्हाला ते अजिबात सहकार्य करत नव्हते. तुमचे ऐकूनच घेत नव्हते म्हणून तुम्ही हकलायला लावले. मंत्र्यांना काम करण्यासाठी चांगले अधिकारी पाहिजेत. हातर बादशहा सारखा तिकडे बसून असतो. विंड मिलच्या संदर्भात त्यावेळी काय धोरण होते. सरकारी धोरण नसताना सरकारी जागेवर विंड मिल उभ्या झाल्या. आता तुम्ही त्या रेग्युलराईज केल्या. कशामुळे केल्या हे मला माहित नाही. परंतु केले ते चांगले केले. त्यावेळेस कशासाठी उभ्या केल्या. याची माहिती सभागृहास मिळाली पाहिजे. त्यावेळी मी सुध्दा काही काळासाठी राज्यमंत्री होतो. तुम्हाला खरे सांगतो याबाबतची आम्ही माहीती मागितली होती. ती आम्हाला मिळाली नाही. जी आहे ती वस्तुस्थिती सांगितली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, आजही ग्रामीण भागातील शेतक-यांना आठ तासांच्या पलिकडे पूर्ण वेळ वीज मिळत नाही. दुष्काळ आहे, परंतु ज्या भागामध्ये पाणी आहे, ज्या भागामध्ये पाणी उचल करण्याची व्यवस्था आहे, तो शेतीकरु शकतो. अशा ठिकाणी तुम्ही वीज का देत नाही ? तुम्ही त्यावेळेस म्हणालात शेतक-याला 24 तास वीज देऊ, आता तुमच्यावर जबाबदारी आली आहे. या

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विजय वडेट्टीवार.......

राज्यामध्ये अतिरिक्त वीज आहे, खाजगी प्रकल्प उभे झाले आहेत. ते सगळे खाजगी प्रकल्प बंद आहेत. वर्धा पॉवर 540 मेगावॅट, जी.एम.आर. 270 मेगावॅटचा बंद आहे. अदानीचा 800 मेगावॅटचा प्रकल्प असू सुरु झालेला नाही. गुप्ता पॉवरचा 270 मेगावॅट, धारीवालचा, मौद्याचा एन.टी.पी.सी. आहे. या प्रकल्पातील वीज तुम्ही पी.पी.ए. करा. ज्या प्रकल्पाबरोबर 25 ते 30 वर्षापूर्वी जे करार झालेले आहेत. त्याच प्रकल्पांबरोबर करार करा आणि इंडस्ट्रीला आणि शेतक-यांना 24 तस वीज देण्याची घोषणा करा. तर तुमच्या सरकारने काही केल्याचा आम्हाला आनंद होईल. 8 तास शेतकरी वीजेसाठी मरतो आहे. त्याच्या कृषि पंपाला पाणी मिळत नाही. शेतीला पाणी मिळत नाही. काल मुख्यमंत्री महोदयांनी काय सांगितले. माननीय श्री.एकनाथराव खडसे यांच्याशी चर्चा करताना मला आनंद वाटला. ज्यांचे पंप सुरु झाले नाहीत. त्यांना मात्र 100 टक्के वीज माफी. आमचे ज्यावेळी आघाडीचे सरकार होते. जनरेटरच्या वीज शुल्काबाबत प्रस्ताव आम्ही आणला होता. त्यावेळस तुमच्याकडून त्याला फार विरोध झाला होता. तुम्ही आल्या आल्या वीज शुल्कामध्ये चौपट वाढ करुन टाकली. ज्या ठिकाणी जनरेटद्वारे वीज निर्मिती होते. त्यावेळेस आमचे आघाडीचे सरकार होते. त्यावेळस विरोध केला. आता तोच प्रस्ताव निश्चितपणे पुन्हा आणण्याचे व मंजूरी देण्याचे काम झाले.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे-पाटील यांनी खूप उपयुक्त सूचना केल्या आहेत. तुम्ही तुमचे धोरण करताना किमान ग्रामीण भागातील आणि शहरी भागातील काही आमदारांना विचारा वीजे प्रश्न काय आहेत. वीजेच्या समस्या काय आहेत ? लाईनमन पासून ते अधिका-या पर्यंत काय स्थिती आहे ? याची माहिती तुम्ही ग्रामीण भागातील असल्यामुळे त्यांना विचारा. एक समिती तयार करावा त्यामध्ये आम्हाला घेऊ नका परंतु ग्रामीण भागातील लोकांना त्यामध्ये घ्या. आमच्याकडून तुम्हाला योग्य माहिती मिळत नसेल तर तुम्ही त्यांच्याकडून माहिती घ्या. एकही लाईनमन गावामध्ये राहत नाही. सर्व लाईनमन तालुक्याच्या ठिकाणी राहतात. त्यांनी कंत्राटी माणसे नेमली आहेत. कंत्राटी माणसे पोलवर चढतात. आतापर्यंत 400 लोकांचा बळी गेला

.....4/-

श्री.विजय वडेट्टीवार.......

आहे. कारण ते प्रशिक्षित नाहीत. त्यांना माहिती नाही. जे खरे लाईनमन आहेत ते अशा माणसाला पोलवर चढवितो व गावातील वीज गेली तर त्याला कामाला लावतो. तुम्ही सांगितलेली माहीती अशी आहे की, वीजेचा धक्का लागून दरवर्षी 7500 लोकांचा बळी जातो. हे तुमच्या भाषणातून मी ऐकले आहे. अशा लोकांना मदत करण्याचे कोणते धोरण जाहीर केले आहे. त्यांना किती रुपये मदत देण्याचे ठरविले आहे.

अध्यक्ष महोदय, काल एस.टी.च्या संदर्भात माननीय श्री.दिवाकर रावते यांनी खूप छान भाषण केले. खूप छान योजना केल्या. एस.टी.च्या वाहकापासून चालकापर्यंत सर्वांना काही तरी मिळेल, त्यांना काही तरी दिल्याचे समाधान मिळेल अशा प्रकारची घोषणा केली गेली. 7500 लोक वीजेच्या धक्याने, तार तुटून, वादळाने पोल पडून मृत्युमुखी पडले.

Q-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विजय वडेट्टीवार .....

हे पोल वाकले आहेत. तारा खाली लोंबकळत आहेत. याकरिता काहीतरी केले पाहिजे. इन्फ्रा-1 मध्ये चांगले काम झाले आहे. इन्फ्रा-2 मध्येही आमचा विदर्भ होता. निधी दिला आहे पण टेंडर काढलेले नाहीत. याला आम्ही जबाबदार आहोत, दुसऱ्याला जबाबदार धरण्यीी आवश्यकता नाही. योजनेला राजीव गांधी व दिनदयाळ यांचे नाव दिलेले आहे. मी सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना सांगू इच्छितो की, मी खरे बोलतो, देवा शपथ सांगतो. त्यावेळी आमच्यावर अन्यायच केला गेला. म्हणून आता तुमच्याकडून अपेक्षा आहेत. तुम्ही विदर्भातील आहात. तुम्ही योजनेला कोणाचे नाव दिले याबद्दल काही म्हणणे नाही. जे सत्तेत असतील त्यांनी त्यांच्या मनाप्रमाणे नाव योजनेला दिले पाहिजे. त्याचप्रमाणे कामही केले पाहिजे. इन्फ्रा-2 मध्ये विदर्भात अनेक वर्षापासूनचे ट्रान्सफॉर्मर आहेत. 100 केव्हीच्या लोडकरिता 30 केव्हीचा ट्रान्सफॉर्मर आहे यामुळे खूप लोड येऊन वीज आल्यानंतर अर्ध्या तासात गुल होते. ही परिस्थिती असल्यामुळे शेतकरी डोक्यावर हात ठेऊन मरतो आहे. तुमचे लाईनमन जागेवर नाहीत, इंजिनियर भेटत नाहीत, डयेप्युटी इंजिनियर भेटत नाही, अधिकारी जागेवर नाहीत. त्यांना मात्र ही सिस्टीम सुधारण्याची आवश्यकता आहे हे बदलण्याची आवश्यकता आहे. म्हणून आपण किमान एक लाईनमन प्रत्येक गावामध्ये राहिला पाहिजे. अशा प्रकारचा निर्णय येथे जाहीर करावा. ते आपल्याकडून मिळतील अशी मला अपेक्षा आहे.

अध्यक्ष महोदय, मी विंडपॉवरबाबत सभागृहाला सांगितले आहे की, शासनाने याबाबत नवे धोरण रेग्युलाईज केले आहे. आपण याबाबतही उत्तर द्यावे. आपला हेतू चांगला आहे. पण त्यावेळी श्री.अजय मेहता हे महावितरण कंपनीचे एम.डी. होते. मनमानी काम करीत होते. खरे तर मला यांची चौकशी करुन पाहिजे. दूध का दूध पाणी का पाणी हो जायेगा. आपल्याकडून ही अपेक्षा आहे. याकरिता सन्माननीय सदस्य श्री.योगेश सागर सहमत असतील तर मंत्री महोदय चौकशी करण्यास तयार आहेत. मी आपणास सांगितले पाहिजे की, सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे पाटील यांनी उल्लेख केल्याप्रमाणे आपण 5 लक्ष सोलार पंपाची घोषणा केलेली आहे.

श्री.योगेश सागर : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विजय वडेट्टीवार हे श्री.जयंत पाटील यांना बोलले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील हे याबाबत श्री.अजित पवार यांना

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.योगेश सागर .....

सांगतील की नाही हे मला माहिती नाही. पण आपण सभागृहात देवाशपथ सांगितले आहे. सन्माननीय सदस्य ज्या चौकशीबाबत मागणी करीत आहेत, ती आपण आपली बाजू आपण सभागृहात मांडावी. आम्हाला काही घाबरण्याची गरज नाही. आम्ही तिकडे असताना घाबरत नव्हतो, इकडे असतानाही घाबरत नाही. आमच्यावर कोणाचाही दबाब नसतो. तुमच्या पक्षात दबाव असतो तसा आमच्याकडे नाही. सनदी अधिकाऱ्यांबाबत त्यांची जी मागणी आहे, त्यामध्ये त्यांना हेही सहमत आहे, तेही सहमत आहेत हे सांगण्याची गरज नाही. येथे सर्वांना बोलण्याची संधी मिळेल, तेव्हा ज्यांना जे जे वाटेल ते त्याबाबत सहमती दाखवतील.

श्री.विजय वडेट्टीवार : अध्यक्ष महोदय, त्यावेळी 5 लाख शेतकऱ्यांना सोलार पंप देणार अशी हेडलाईन आली होती. त्यावेळी पानभर अग्रलेख आले होते. तुमच्या घोषणेचे तेव्हा मोठे स्वागत झाले होते. तेव्हा तुम्हाला लोक विदर्भातील शेर म्हणत होते. सोशल मिडीयावर तुमची खूप तारीफ झाली. पण खोदा पहाड निकला चुहा. त्यातून चुहा निघाला असता तरी आनंद झाला असता. त्यानंतर केवळ 7500 सोलार पंपाची घोषणा व तरतूद केली. 50 हजार पंप जाहीर करुन 7500 दिले असते तर चालले असते. 5 लाख सांगून 7500 पंप दिले याबाबत लोक काय म्हणतील. याला आमच्या विदर्भातील भाषेत फुस्स असे म्हणतात. आता असे होऊ नये एवढा तुमच्याकडून विश्वास हवा आहे. मला मंत्री महोदयांकडून अशी अपेक्षा आहे की, तुम्ही नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात 5 लाख पंपाची घोषणा केली होती. ती घोषणा अंमलात आणावी. यामुळे शेतकऱ्याला मोठा आधार मिळेल. त्यावेळी आम्ही चांगले निर्णयही घेतले होते.

अध्यक्ष महोदय, मी येथे इन्फ्रा-2 बाबत बोलत होतो. या योजनेत विदर्भात चांगल्या प्रकारे कामांना सुरुवात केली याबद्दल मी आपले अभिनंदन करतो. कारण इन्फ्रा-2 मधील कामे थांबली होती. सध्या आमच्या मतदारसंघात अनेक प्रश्न आहे, त्याबाबत मी आता जास्त बोलणार नाही. परंतु आता जे सब स्टेशन मंजूरीसाठी प्रस्तावीत आहेत. जे आपण प्लॅन केलेले आहेत. त्यातील कामे तातडीने सुरु झाले पाहिजेत. नाही तर त्या मंजूरीमध्येच हे वर्ष जाईल व पुन्हा शेवटच्या वर्षामध्ये त्याचा फायदा होईल अशा प्रकारचे काम होता कामा नये.

.....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विजय वडेट्टीवार .....

अध्यक्ष महोदय, राजीव गांधी या नावाने सुरु असलेल्या योजनेतून त्या बीपीएलधारक व्यक्तीच्या झोपडीत प्रकाश पडला पाहिजे म्हणून 40 रुपयात मिटर लावून देत होतो. त्यामध्ये पुढे काय झाले. तत्पूर्वी केवळ 15 रुपयामध्ये मिटर लावून दिले जात होते. गरीबाकरिता ही चांगली योजना होती. गरिबाच्या घरात उजेड, प्रकाश, लाईट पडला पाहिजे हे नजरेसमोर ठेऊन तेव्हा काम केले होते. आपण ही योजना पुढे सुरु ठेवावी. अजून अनेक लोकांकडे वीज पोहचली नाही, ती पोहचविण्याचे काम करावे. आपण कृषी पंपाचा बॅकलॉग पूर्ण करीत असताना फार चांगले काम सुरु केलेले आहे. जे चांगले आहे त्याला चांगले म्हटले पाहिजे. विदर्भात तर निश्चितपणे चांगले काम सुरु झालेले आहे. बॅकलॉग पूर्ण करण्याचे काम आपण सुरु केलेले आहे, तो अनेक वर्षापासून होता. यामध्ये तुलना होऊ शकत नाही. मला अधिक बोलण्याची आवश्यकता नाही. आपल्याकडून सुरुवातीला एक पोल, दोन पोलचे कनेक्शन आपण दिले होते. त्यापेक्षा अधिकचे पोलचे काम असेल तर ते थांबवून ठेवलेले आहे. जेथे 10 पोल लागत असतील तर ते थांबवून ठेवलेले आहे. त्यानी पूर्वी डिमांड दिलेली आहे याबाबत आपण निश्चितपणे लक्ष घालावे अशी मागणी करतो. मुंबईची विजेची मागणी वाढली आहे याबाबत आता येथे उल्लेख झाला आहे. राज्यात साधारणपणे 13 हजार मेगावॅटची वीज लागते. मागील दोन वर्षात 500 मेगावॅटने ही मागणी वाढली आहे. या मागणीची पुर्तता आपण कशी करणार आहात. आपल्याकडे प्रोजेक्ट उभे आहेत. टाटा रिलायन्स असतानाही वीज कोठून खरेदी करतात. ते खाजगी प्रकल्पाकडून वीज घेऊन मुंबईला पुरवित आहेत. तुम्ही डायरेक्ट वीज पुरवठा का देत नाही ? तुमच्याकडून केले तर वीजेचे दर कमी होतील व जनतेचा फायदा होईल. माननीय पंतप्रधानांनी सांगितले की, 2019 पर्यत केवळ महाराष्ट्रात नव्हे तर देशात प्रत्येक घरात, प्रत्येक गावात वीज पोहचेल. आज गडचिरोली जिल्हयामध्ये अनेक गावे आहेत तसेच महाराष्ट्रातही अनेक गावे आहेत की, तेथे अद्याप आपली वीज पोहचली नाही. तेथे वीज पोहचविण्याकरिता आपण नेमके कोणते धोरण आखले आहे. आपण याबाबत कसे पुढे जाण्याचा निर्णय घेतला आहे ? मुंबईतील घरामध्ये प्रचंड मोठया प्रमाणावर अनधिकृत वीज कनेक्शन आहेत. मुंबईतील विजेची वाढती मागणी निश्चित पूर्ण होईल असा मला

.....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विजय वडेट्टीवार.....

विश्वास वाटतो. मला येथे सांगायचे आहे की, 1308 उद्योगांमुळे उर्जा खात्याने 550 कोटी रूपये उत्पन्नावर पाणी सोडले आहे. त्याचे कारण व भूमिका निश्चितपणे सभागृहाला कळाली पाहीजे. आपण असे का केले हे येथे निश्चितपणे सांगावे. वीज मंडळाकडून पहिले बील पाठवितात. पण ज्याच्याकडे वीज कनेक्शन नाही अशा शेतकऱ्यालाही बील पाठविले जाते असे मी परवा वाचले.

यानंतर आर-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विजय वडेट्टीवार.......

या चूका सुधारल्या पाहिजेत. अन्यथा तो सामान्य गरीब माणूस आत्महत्या करुन मरेल. एक नाही तर चार वेळा कनेक्शन नसतांनाही त्याला वीज बिल पाठविले जाते. याबाबत सामान्य माणूस अर्ज करतो आणि भेटून सांगतो की, कनेक्शनच घेतलेले नाही तर मला वीज बिल कसे आले ? अशी विचारणा करीत आहे. अहमदनगरमध्ये लाखो रुपये वसूल केलेले आहेत, याबाबतची माहिती माननीय मंत्री महोदयांकडे आलेली आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी नक्षल चळवळी ज्या भागामध्ये होतात, त्या भागामध्ये 24 तास वीज उपलब्ध करुन देण्याबाबत आश्वासन दिले होते. तशी त्यांनी घोषणाही केली होती. परंतु आजपावेतो दीड वर्षानंतरही त्याची पुर्तता करण्यात आलेली नाही. आदिवासी भागामध्ये अजूनही काही ठिकाणी वीज पोहोचलेली नाही.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे पाटील यांनी विजेच्या दरासंदर्भात सभागृहामध्ये मुद्दा उपस्थित केला होता. मी श्री.अशोक गायकवाड या व्यक्तीचे तीन वर्षांचे विजेचे बिल सभागृहामध्ये आणलेले आहे. सन 2014, 2015 व 2016 या तीन वर्षातील एक -एक विजेचे बिल मी आणलेले आहे. सन 2014 चे 50 युनिटचे विजेचे बिल 886 रुपये इतके होते. सन 2015 चे 53 युनिटचे विजेचे बिल 1670 रुपये इतके होते. या दोन बिलांमध्ये युनिट जवळपास सारखेच असतानाही बिलाच्या रकमेमध्ये खूप मोठा फरक आहे. सामान्य माणसाची प्रचंड लुबाडणूक चालू आहे. या सामान्य माणसाच्या विजेच्या बिलामध्ये असा कोणत्या प्रकारचा कर, अधिभार, भार लावण्यात येत आहे ? याचा फटका सामान्य माणसाला कसा बसत आहे, याची पाहणी करीत असतांना आपण एमईआरसीमध्ये मंत्री महोदय म्हणून न जाता सामान्य माणूस म्हणून गेलात तर आपल्याला समजेल. सामान्य माणूस या विजेच्या अधिभाराच्या फटक्यातून कसा सावरणार ? हेही मला या निमित्ताने उत्तरात सांगावे. विजेच्या दरासंदर्भात आता एमईआरसी कोणत्याही प्रस्तावाबाबत ऐकणार नाही. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी आपल्यावर या खात्याला बदलविण्याची जबाबदारी सोपविलेली आहे. आपण या खात्यातील कारभार तपासून त्याचे कामकाज सुधारावे, एवढीच आमची अपेक्षा आहे. दुष्काळी भागात मंत्रिमंडळाने दौरा केला. लोकांना वाटले आपण काहीतरी घेऊन गेला असाल परंतु आपण रिकामे गेलात आणि हात हलवत आलात.

श्री.विजय वडेट्टीवार........

आज दुष्काळी भागामध्ये सर्वसामान्य माणूस पिण्याच्या पाण्यासाठी तडफडत आहे. एक थेंब पाण्याकरिता लोकांचा जीव जात आहे. दुष्काळी भागातील संपूर्ण वीज बिल शासनाने माफ करावे, एवढी मागणी मी करीत आहे. " सबका साथ सबका विकास " याच आपल्या भुमिकेची आम्हाला अपेक्षा आहे. श्री.अजय मेहता यासारख्या अधिका-यावर कारवाई करण्याकरिता माननीय मंत्री यांनी पाऊल उचलावे. यातून कितीही मोठा अधिकारी असला आणि तो चुकला तर आम्ही कोणालाच सोडत नाही, असा एक संदेश आपल्या माध्यमातून यामुळे समाजामध्ये जाईल. जे अधिकारी त्या ठिकाणी बसून आहेत, रस्त्याच्या हजारो कोटी रुपयांचा करण्यात आला होता. इकडे पोखरुन झाले तिकडे आता पोखरायला पाठविलेले आहे. असा एक मेसेज आपल्या कठोर कारवाईच्या माध्यमातून जनसामान्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. असे केले तरच आपण एक कर्तबगार मंत्री म्हणून नावारुपाला याल. विदर्भात आपण अतिशय चांगले काम सुरु केलेले आहे, त्याबाबत मी आपले आभार व्यक्त करतो व कामाकरिता शुभेच्छा देतो. आमच्या शासनाच्या काळामध्ये एन्रॉन प्रकल्पाला समुद्रात बुडवा वगैरे अशा प्रकारच्या वल्गना करण्यात आल्या होत्या. आता आपल्या काळामध्ये अशी परिस्थिती येणार नाही, याकरिता आपण वीज मंडळाला प्रगती पथावर नेले पाहिजे. सर्वसामान्य माणसाला दिलासा मिळेल,असेही निर्णय घेतले पाहिजे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

------

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदय, या प्रस्तावाचे उत्तर सोमवारी घेण्यात येणार आहे. या प्रस्तावावर बरेच सन्माननीय सदस्य बोलावयाचे आहेत. सोमवारी विशेष बैठक सकाळी दहा वाजता घेऊन सर्वांना यावर बोलण्याची संधी दिली तर आम्हाला चालण्यासारखे आहे. यावर चर्चा व्हावी. विषय महत्त्वाचा आहे. सर्व सन्माननीय सदस्यांना यावर बोलण्याची संधी देण्यात यावी.

**तालिका सभाध्यक्ष ( श्री.सुभाष साबणे ) :** दीड वाजेपर्यंत शक्य तितक्या सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळेल.

------

.....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.मल्लिकार्जून रेड्डी ( रामटेक ) : अध्यक्ष महोदय, नियम 293 अन्वये विरोधी पक्षाने जो प्रस्ताव मांडलेला आहे, त्यावर माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे-पाटील हे माजी ऊर्जामंत्री होते. सन्माननीय सदस्य श्री.विजय वडेट्टीवार हे देखील माजी राज्यमंत्री राहिलेले आहेत. यांनी ऊर्जा विभागाचे अनेक मुद्दे उपस्थित केलेले आहेत. राज्यामध्ये युती सरकार आल्यानंतर ऊर्जा विभागाची प्रगती झालेली आहे, ही सत्यपरिस्थिती आहे. विरोधकांनी कितीही काहीही म्हटले तरीही त्यांच्या कार्यकाळात सर्वसामान्य लोकांना विजेच्या संदर्भात जेवढा त्रास झाला होता, तेवढया प्रमाणात आता होत नाही. याबाबत मी माननीय ऊर्जामंत्री यांचे अभिनंदन करतो.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक पाहणीतील आकडयांबाबत मी पुढीलप्रमाणे माहिती देत आहे. सन 2010-2011 मध्ये वीज निर्मिती 83,017 दशलक्ष किलोवॅट होती. सध्या राज्याचे विजेचे उत्पादन 1,3779 दशलक्ष किलोवॅट वीज निर्मिती होत आहे. यामध्ये 20 टक्के वाढ झालेली आहे. विरोधी पक्षाकडून वीज विभागाबाबत अनेक तक्रारी ऐकू येत आहेत. माझ्या विधानसभ मतदारक्षेत्रात माननीय ऊर्जामंत्री महोदयांनी जिल्हास्तरीय बैठक घेतली होती. माननीय ऊर्जामंत्री यांनी संपूर्ण महाराष्ट्रामध्ये जिल्हास्तरीय बैठका घेतलेल्या आहेत. ते राज्यभरामध्ये फिरलेले आहेत. या बैठकांमध्ये त्यांनी त्या त्या भागातील प्रत्यक्ष अडचणी दूर करुन तेथील वीज निर्मिती व वितरणाच्या कामामध्ये सुधारणा करण्याकरिता धोरण स्वीकारलेले आहे. सन्माननीय सदस्यांच्या मागण्यांवर सिस्टम इम्प्रुव्हमेंटबाबतची मागणी होती, तीही त्यांनी या जिल्हास्तरीय बैठकांच्या माध्यमातून पूर्ण करण्याचे आश्वासन दिलेले आहे. त्या दृष्टीने कामही सुरु झालेले आहे.

अध्यक्ष महोदय, ऊर्जा विभागाच्या माध्यमातून उद्योगांना 20 टक्के वाढीव वीज देण्यात आलेली आहे. सन 2010-2011 मध्ये 34,416 दशलक्ष कि.वॅट वीज उद्योगांना देण्यात आली होती. सन 2014-2015 मध्ये 41,522 दशलक्ष किलोवॅट वीज उद्योगांना दिलेली आहे. युती शासनाने उद्योगांना वीज देण्याकरिता प्राधान्य दिलेले आहे. कृषी पंपांना वीज देण्याकरिता शासनाने प्राधान्य दिलेले आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

18-03-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) R-5

JN/ AKN/ MMP 12:50

श्री.मल्लिकार्जून रेड्डी..........

16,257दशलक्ष किलोवॅट वीज कृषीपंपांना सन 2010-2011 मध्ये देण्यात आली होती. सन 2014-2015 मध्ये कृषीपंपांना 26,460 दशलक्ष किलोवॅट वीजपुरवठा करण्यात आलेला आहे. हे करुन शासनाने ते शेतक-यांच्या बाजूने आहेत, हे दाखवून दिलेले आहे. पूर्वीच्या शासन काळामध्ये सर्वसामान्य गरीब माणसाला वीज कनेक्शनकरिता रडत बसावे लागत होते. तरीही वीज कनेक्शन मिळत नव्हते. डोंगरी भागातही वीज लवकर दिली जात नव्हती. युती शासन आल्यानंतर दीड वर्षात घरगुती कनेक्शनमध्ये वाढ झालेली आहे.

एस-1/--

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. डी. मल्लिकार्जुन रेड्डी.......

सन 2010-2011 मध्ये 19,547 विजेची कनेक्शन्स देण्यात आली होती. सद्य:स्थितीत सन 2014-2015 मध्ये 25,428 घरगुती ग्राहकांना विजेची कनेक्शन्स देण्यात आलेली आहेत.

अध्यक्ष महोदय, आज राज्यात दुष्काळी परिस्थिती आहे. धरणातील पाण्यापासून जलविद्युतनिर्मितीचे प्रकल्प....(अडथळा)....

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : अध्यक्ष महोदय, मला आता कॅबिनेटच्या बैठकीसाठी जावयाचे आहे. सभागृहात ऊर्जशी संबंधित उपस्थित करण्यात आलेल्या मुद्याची माननीय राज्यमंत्र्याकडून नोंद घेतली जाणार आहे. आता सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणास सुरुवात करावी.

प्रा. वर्षा गायकवाड : अध्यक्ष महोदय, सभागृहात एकही कॅबिनेट मंत्री नाही.

**तालिका सभाध्यक्ष ( श्री. सुभाष साबणे )** : माननीय ऊर्जा मंत्र्यांना कॅबिनेटच्या बैठकीसाठी जावयाचे आहे. त्यांनी मोठ्या मनाने सभागृहाची परवानगी घेतलेली आहे. त्यांच्या अनुपस्थितीत राज्यमंत्री महोदयांकडून उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांची नोंद करुन घेतली जाणार आहे. आता सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणास सुरुवात करावी.

श्री. डी. मल्लिकार्जुन रेड्डी : अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र राज्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली आहे. अनेक धरणांमध्ये पाणी नाही. धरणात पाणी नसतानासुध्दा जलविद्युत प्रकल्प बंद असूनसुध्दा ऊर्जा विभागाने औष्णिक ऊर्जेच्या माध्यमातून वीजनिर्मिती करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

अध्यक्ष महोदय, राज्य आणि केंद्र शासनाच्या माध्यमातून सौरऊर्जा आणि अणुऊर्जा संदर्भातील धोरण आखले जात आहे. सौरऊर्जेच्या माध्यमातून 50 लाख कृषीपंपासाठी वीज दिली जाणार आहे. यासाठी भविष्यात कृषीपंपासाठी आणखी वीज देण्याचा प्रयत्न केला जाणार असल्यामुळे मी राज्य शासनाचे मनापासून अभिनंदन करीत आहे. ग्रामीण आणि डोंगरी भागात सौरऊर्जेच्या माध्यमातून कृषीपंप दिले जाणार आहे. यासाठी देखील मी राज्य शासनाचे मनापासून अभिनंदन करीत आहे.

.....2......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. डी. मल्लिकार्जुन रेड्डी.......

अध्यक्ष महोदय, ऊर्जा विभागाने अणुऊर्जेच्या संदर्भातील धोरण निश्चित करण्याची आवश्यकता आहे. अणुऊर्जा ही आज काळाची गरज होऊन बसली आहे. कोळसा आज आहे तर उद्या नसणार अशी परिस्थिती कोळशाच्या बाबतीत निर्माण झालेली आहे. धरणात पाणी नाही. राज्यात दुष्काळ आहे त्यामुळे विजनिर्मिती करण्यासाठी अणुऊर्जा हा एक चांगला आणि प्रभावी उपाय आहे.

अध्यक्ष महोदय, वीज वितरण व्यवस्थेमध्ये 16 टक्के गळती होत आहे. सबस्टेशनपासून ते ट्रान्सफॉर्मपर्यंत आणि ट्रान्सफॉर्मपासून ते फिडरपर्यत, फिडरपासून ते ट्रान्सफॉर्मपर्यंत 16 टक्के वीज गळती होत आहे. परिणामी त्याचा भार ग्राहकांवर पडत आहे. यासाठी योग्य ते नियंत्रण ठेवण्याची गरज आहे. आघाडी शासनाच्या कार्यकाळात बसविण्यात आलेल्या ट्रान्सफॉर्मरचा दर्जा बरोबर नसल्यामुळे ते आज काळानुरुप बदलण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे. आज उत्तम दर्जाचे ट्रान्सफॉर्मर बसविण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, इन्फ्रा-2मध्ये सिस्टिम इन्प्रुमेंटची कामे हाती घेतलेली आहेत. इन्फ्रा-2मध्ये जे कमी कॅपेसिटीचे ट्रान्सफॉर्मर आहेत ते बदलून जास्त कॅपेसिटीचे ट्रान्सफॉर्मर बसविण्याची आवश्यकता आहे. सप्टेंबर ते डिसेंबरपर्यंत कोरडवाहू क्षेत्रात शेतकरी पीक घेत असतो. कमी कॅपेसिटीचे ट्रान्सफॉर्मर बसविल्यामुळे कमी प्रमाणात वीज पुरवठा होता त्यामुळे सप्टेंबर ते डिसेंबरपर्यंत कोरडवाहू क्षेत्रात शेतकऱ्यांना पीक घेता येत नाही.

अध्यक्ष महोदय, शेतीसाठी पाणी उपसण्याकरिता 8 तासाचा नियम केलेला आहे. हा नियम बदलून 12 तास एवढा करावा अशी माझी आग्रही मागणी आहे. 8 तासात शेती ओलित होत नाही. कोरडवाहू शेती काळ्या मातीची नसते. काही शेती मुरमाची तर दगडी असते. अशा शेतींना पाणी देण्यासाठी 8 तासाचा नियम बदलून तो 12 तास एवढा करण्यात यावा, अशी माझी विनंती आहे. काळ्या मातीची शेती नारळाच्या बाजूला असते. डोंगरी भागात काळ्या मातीची शेती नसते. त्या ठिकाणी लाल मातीची शेती असते. 8 तासांमध्ये शेती ओलित होत नाही. अशा शेतींना पाणी देण्यासाठी 8 तासांचा नियम बदलून तो 12 तास एवढा करण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

.....3.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. डी. मल्लिकार्जुन रेड्डी.......

अध्यक्ष महोदय, थ्रीफेजच्या माध्यमातून आमच्या भागात वीज पुरवठा केला जात आहे. कधी कधी तीन दिवस वीज पुरवठा असतो तर काही वेळेस रात्री सुरु असतो. थ्रीफेजच्या माध्यमातून शेतीसाठी दिवसा वीज पुरवठा करावा अशी माझी आग्रही मागणी आहे. रात्रीच्या वेळेस आपले घरदार सोडून शेतकऱ्याला शेती करणे शक्य नसते. रात्रीच्या वेळेस शेती करण्यासाठी शेतात गेला तर विजेचा शॉक लागून किंवा सर्पदंशामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

अध्यक्ष महोदय, आज राज्यामध्ये दिवसेंदिवस लोकसंख्या वाढत चालली आहे. त्यामुळे ग्राहकांची विजेच्या संदर्भातील मागणी वाढत जात आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. राधाकृष्ण विखे-पाटील यांनी ऊर्जा विभागातील भ्रष्टाचार आणि संबंधित अधिकाऱ्यांबद्दल माहिती दिलेली आहे. विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य हे भाषण केल्यानंतर निघून गेलेले आहेत. पूर्वी ऊर्जा विभागाचे जे मंत्री होते, अशा मंत्र्यांच्या कार्यकाळात संबंधित अधिकारी यांनी ऊर्जा मंत्र्याची परवानगी न घेता फिरण्यासाठी निघून गेले होते. अशा अधिकाऱ्यांना फिरण्याची कोणी परवानगी दिली असा माझा प्रश्न आहे. अशा मंत्र्यांची देखील चौकशी करण्याची गरज आहे आणि त्यांचे नाव सभागृहात घोषित करण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, ऊर्जा विभागाने राज्यातील 254 शहरांना चोवीस तास वीज देण्याचे कबूल केलेले आहे. ग्रामज्योती योजनेच्या माध्यमातून सन 2019 पर्यंत 19 लाख ग्राहकांना वीज देण्याचे धोरण शासनाने घेतलेले आहे. यासाठी मी शासनाचे अभिनंदन करीत आहे. ग्रामज्योती योजनेच्या माध्यमातून सिंगलफेजची वेगळी लाईन आणि थ्रीफेजची वेगळी लाईन देण्यासंदर्भात नियोजन करण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक कुटुंबांना वीज दिली पाहिजे. वीज कोणत्याही प्रकारे खंडीत होऊ नये, अशी माझी आग्रही मागणी आहे. युती शासनाचा ग्राहकांना अखंडपणे वीज देण्याचा मुख्य उद्देश आहे. सदर आश्वासन माननीय ऊर्जा मंत्री निश्चितपणे पूर्ण करतील अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझ्या शब्दांना विराम देतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

--------

......4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शंभुराज देसाई ( पाटण ) : अध्यक्ष महोदय, विरोधी पक्षाच्यावतीने म. वि. स. नियम 293 अन्वये विद्युत विभागाच्या विविध प्रश्नांच्या संदर्भातील चर्चा उपस्थित करण्यात आलेली असून, त्यासंबंधी माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी ऊभा आहे.

अध्यक्ष महोदय, विद्युत विभागातील विविध प्रश्न हे सर्वसामान्य लोकांच्या जिव्हाळ्याशी संबंधित आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी सदर प्रस्तावाच्या संदर्भात भाषण केलेले आहे. ते दीर्घकाळ ऊर्जा विभागाचे मंत्री होते. सन्माननीय सदस्य श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी विद्युत विभागातील काही त्रुटींच्या संदर्भात सभागृहाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केलेला होता. या त्रुटी या वर्षातील किंवा सव्वा वर्षातील आहे असे म्हणता येणार नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शंभूराज देसाई....

मागील अधिवेशनात या सभागृहात ऊर्जा विभागावर चर्चा होत असताना काही चांगल्या सूचना माननीय ऊर्जा मंत्री श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांनी ऐकून घेतल्या होत्या आणि त्याची अंमलबजावणी सुरु केली. सन 2004 ते 2009 या कालावधीत मी आमदार होतो, तेव्हा ऊर्जा विभागाचे अधिकारी तालुक्याचा एकत्रित ऊर्जा आराखडा तयार करताना लोकप्रतिनिधिंना कधीही विश्वासात घेत नव्हते. गेल्यावर्षी पासून युतीचे सरकार आल्यानंतर माननीय ऊर्जा मंत्री यांनी या विधानसभेत प्रत्येक आर्थिक दोन वर्षातील आराखडा तयार करण्यासाठी संबंधित मतदारसंघातील लोकप्रतिनिधिंना बोलवावे, अशी सूचना केली होती. सन्माननीय लोकप्रतिनिधिंचे मत विचारात घ्यावे आणि जास्तीत जास्त त्यांच्या कामांचा समावेश त्या आराखड्यात करावा, अशा प्रकारची सूचना मंत्री महोदयांनी दिल्यामुळे मी माननीय ऊर्जा मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो.

अध्यक्ष महाराज, राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये माननीय ऊर्जा मंत्री महोदयांनी बैठक घेतली. माझ्या जिल्ह्यातही मंत्री महोदयांनी बैठक घेतली. त्या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे उपस्थित होते. सदरहू बैठकीत प्रदीर्घकाळ चर्चा झाली. आमचे प्रश्न तातडीने जागेवरच सोडविण्याच्या सूचना मंत्री महोदयांनी अधिकाऱ्यांना दिल्या. या युतीच्या सरकारमध्ये ऊर्जा विभागाचे मंत्री महोदय श्री.चंद्रशेखर बावनकुळे हे वेगाने काम झाले पाहिजे, लोकांचे प्रश्न सुटले पाहिजे म्हणून निर्णय घेत आहेत, परंतु तेवढ्याच गतीने अधिकारी त्याची अंमलबजावणी करीत आहेत का, याकडे मंत्री महोदयांनी लक्ष देणे गरजेचे आहे. आपले नागपूरचे हिवाळी अधिवेशन संपून आता तीन महिने झाले तरी आपण दिलेल्या सूचनांची अधिकारी अंमलबजावणी करीत नाहीत. तेथिल अधिवेशनात माझ्या डोंगरी मतदारसंघात 12 तास वीज देण्याचा निर्णय झाला होता. प्रस्ताव तातडीने सादर करावा, मी पैसे उपलब्ध करून देतो, असे ऊर्जा मंत्री महोदय आपण म्हणाले होते, परंतु चार महिने झाले मुख्य कार्यालयाकडे प्रस्ताव आलेला नाही. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.विजय वडेट्टीवार म्हणाले की, सब इंजिनिअर, शाखा अभियंता, उप अभियंता ही मंडळी वेगाने काम करीत नाहीत. त्यांना जुनी पंधरा वर्षाची सवय लागलेली आहे, ती सवय त्यांची जात नाही त्यामुळे याकडे लक्ष द्यावे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शंभूराज देसाई....

अध्यक्ष महाराज, मंत्री महोदय सातारा येथे बैठकीसाठी आले होते तेव्हा मी शेतकऱ्यांसबंधीचा जो प्रश्न मांडला होता, तो प्रश्न मी आता मांडणार आहे. शेतकऱ्यांना एरिगेशनसाठीचा जो 44 पैसे प्रति युनिटचा जास्त दर लावलेला होता, त्यामध्ये वाढ केलेली आहे. शेतकऱ्याच्या कृषी पंपासाठी पूर्वी 72 पैसे युनिटचा दर होता. आपण आमची विनंती मान्य केली आणि माननीय मुख्यमंत्री महोदयांसमवेत निर्णय होईपर्यंत जुन्या दराने पैसे द्यावे म्हणून सांगितले. आजरोजी जुन्या दराने पैसे घेतले जात आहेत. परंतु केव्हातरी हा निर्णय झाला पाहिजे. मागे एकदा एक शिष्ट मंडळ ऊर्जा मंत्र्यांना भेटले, त्यानंतर मुख्यमंत्री महोदयांना भेटले. मुख्यमंत्री महोदयांची अशी भूमिका आहे की, जे 44 पैसे पर युनिटमागे वाढलेले आहेत, त्यातील ठराविक भार शेतकरी, ठराविक भार ऊर्जा शासन सोसेल. यावर चर्चा सुरु आहे, परंतु त्यावर लवकरच निर्णय होणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महाराज, माझ्या डोंगरी भागात गेल्या तीस, चाळीस वर्षापूर्वीचे जुने विजेचे पोल आहेत, ते बदलण्याचे काम अजूनही झालेले नाही. आपण बैठकीत सांगितले होते की, आपण मट्रेल विभागीय स्तरावरुन मागवा. विभागीय स्तरावर नसेल तर आमच्याकडे कळवा, आम्ही देऊ. डोंगरी भागासाठी वेगळी व्यवस्था करु, परंतु अजूनही हे पोल बदलले नाहीत. माझा डोंगरी मतदारसंघ हा अतिवृष्टीचा भाग आहे. तेथिल अधिकारी सांगतात की, त्या पोलला मफींग करुन देऊ, परंतु त्यामुळे पोलचे आयुक्त फक्त दोन वर्षे वाढेल. माझ्या मतदारसंघातील बहुतांशी पोल हे खराब झालेले आहेत. वादळ, पाऊस आला की, एखादा पोल एका बाजूला कलतो. ती लाईन शेतावर पडते. त्यामुळे ऊसाच्या पिकाचे नुकसान होते. पर्यायाने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी लागते, याचा विचार करण्याची गरज आहे.

अध्यक्ष महाराज, कोयना विद्युतनिर्मिती प्रकल्प माझ्या मतदारसंघात आहे. राज्याला दोन हजार मेगावॅट वीज देणारा माझा तालुका आहे. सन 2004 ते 2009 मध्ये मी आमदार असताना या सभागृहात चर्चा केली होती की, माझ्या मतदारसंघात कृषी पंपाला 10 तास वीज दिली पाहिजे, त्यावेळी 10 तास वीज दिली होती. आता 10 तासावरुन ती परत 8 तासावर केली आहे. मंत्री

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

महोदयांनी सातारा जिल्ह्यात झालेल्या बैठकीत सांगितले होते की, रात्रीच्या वेळेस आमच्याकडे

...3



श्री.शंभूराज देसाई....

सरप्लस वीज आहे, ती आम्ही शेतकऱ्यांना देऊ, परंतु रात्रीच्या वेळेस शेतकऱ्यांना वीज देऊन उपयोग होणार नाही. आम्हाला सकाळी 8.00 ते रात्री 8.00 अशी सलग बारा तास विशेष बाब म्हणून वीज द्यावी. माझ्या तालुक्यांमध्ये वीज निर्माण होते. ऊर्जा विभागाने ट्रॉन्सफॉर्मर बदलविण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला. 63 के.व्ही.च्या ऐवजी 100 के.व्ही. चे ट्रॉन्सफॉर्मर देऊ, असे ऊर्जा मंत्री महोदयांनी सांगितले होते. अनेक ठिकाणी 100 के.व्ही. चे ट्रॉन्सफॉर्मर बसविलेले नाहीत. चार, पाच महिन्यापूर्वी ऊर्जा मंत्री महोदयांनी सांगितले, परंतु अधिकारी सांगतात की, आमच्याकडे मट्रेल नाही, ट्रॉन्सफॉर्मर नाही. शासन एका बाजूला सांगते की, मट्रेल कमी पडू दिले जाणार नाही, परंतु दुसऱ्या बाजूला मात्र मागणी करुनही ट्रॉन्सफॉर्मर शिल्लक नाही असे सांगितले जाते. जेव्हा बाहेरच्या विभागतून मिळतील तेव्हा तुम्हाला ट्रॉन्सफॉर्मर देऊ. 100 के.व्ही. चे ट्रॉन्सफॉर्मर बसविण्याचा जो आपण निर्णय घेतला आहे ते ट्रॉन्सफॉर्मर आपण द्यावेत. माझ्या विभागामध्ये उपसासिंचन पध्दतीने शेती केली जाते. त्या शेतक-यांनी आग्रही मागणी केलेली आहे की, दूर अंतरावरुन आम्हाला विजेचे कनेक्शन दिल्यामुळे लाईनमधून लिकेजेस वाढतात. माझ्या भागात मारोळ हवेली आणि बेलवडेला दोन जुनी सब स्टेशन मंजूर होती, परंतु त्यांचे काम संत गतीने चालू आहे. कदाचित माझी माहिती चुकीची असेल. एमएसईबीचे जे कॉन्ट्रॅक्टर दिलेले आहेत, ते जुनी कॉन्ट्रॅक्टर मंडळी आहेत, त्यामुळे ते काम करीत नाहीत. माझ्या मतदारसंघात भारत इलेक्ट्रिकल ही सांगली, कोल्हापूरची कंपनी आहे. तो एकच ठेकेदार असून त्याची आठ ठिकाणी कामे सुरु आहेत. त्याच्याकडे काम करणारे केवळ एकच युनिट आहे. मागे आपण सांगितले होते की, आम्ही त्यांना सहा महिन्याची संधी देऊ. दीड वर्षे होऊन गेले तरी सुध्दा तो कॉन्ट्रॅक्टर काम करीत नसेल तर दुसऱ्या कॉन्ट्रॅक्टरला ते काम द्यावे.

अध्यक्ष महाराज, सन 2013 ते 2015 या कालावधीतील पेड पेन्डींग कनेक्शन्स आहेत. माझ्या डोंगरी भागात तातडीने विद्युत पुरवठा करण्याचा निर्णय घ्यावा. ऊर्जा विभाग हा लोकाभिमुख आहे. लोकप्रतिनिधिंशी चर्चा करुन, लोकप्रतिनिधिंच्या सल्ल्याने, त्यांच्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

मतदारसंघातील कामाचे नियोजन करतो, हे चित्र महाराष्ट्राला पहिल्यांदा बघायला मिळाले. हे युतीचे सरकार आल्यामुळे असा हा बदल घडून आला. कदाचित अधिकाऱ्यांना हे रुचत नसेल,

...4

18-03-2016 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) T-4

ADB/ AKN/ MMP/ 13:10

श्री.शंभूराज देसाई....

याअगोदर अधिकाऱ्यांची मनमानी चालायची. आता या अधिकाऱ्यांना वाटत असेल की, हा लोकप्रतिनिधिंचा हस्तक्षेप कशाला. लोकप्रतिनिधी अनावश्यक हस्तक्षेप कधीही करीत नाहीत. आम्ही फिल्डवर काम करणारे लोकप्रतिनिधी आहोत. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.विजय वडेट्टीवार म्हणाले की, जसा लाईनमन तालुक्याच्या ठिकाणी राहतो, तसेच लोकप्रतिनिधी हे रोज मतदारसंघात असतात. लोकांचे रोज प्रश्न समजून घेतात. ऊर्जा मंत्री महोदयांचे काम, आपले धोरण, आपला निर्णय अतिशय चांगले आहेत, परंतु तंतोतंत याची अंमलबजावणी अधिकाऱ्यांनी केली पाहिजे. ऊर्जा विभागाचे चांगले काम सुरु झालेले आहे. ते अधिक वेगाने व्हावे, अशी मी अपेक्षा करतो. ऊर्जा मंत्री महोदयांच्या चांगल्या कामाबद्दल मी पुन्हा एकदा त्यांचे अभिनंदन करतो आणि माझे भाषण संपवितो.

---------------

यानंतर U-1..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री अबु आजमी (मानखुर्द-शिवाजीनगर) : अध्यक्ष महोदय, मैं नियम 293 के प्रस्ताव पर बोलने के लिए खड़ा हुआ हूं.

अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री श्री चंद्रशेखर बावनकुळे जी से मेरी हाथ जोड़कर विनती है और मैं कई बार कह भी चुका हूं. मानखुर्द-शिवाजीनगर मेरा इलाका है. मंडाला में सबस्टेशन न होने के कारण वहाँ अंधेरा है. वहां पर सबस्टेशन के लिए जगह नहीं मिल रही है. सोने पर लूट मची है, कोयले पर मुहर लगी है. बड़े बड़े काम हो रहे है लेकिन यहाँ पर सबस्टेशन का काम नहीं हो रहा है. वहां पर चोरी की बिजली लेनी पड़ती है. चोरी की बिजली लेने के कारण क्राईम बढ़ रहा है. बलात्कार की घटनाएं बढ़ रही है. बिजली माफिया पैसे कमा रहे है. बिजली न होने के कारण क्राईम बढ़ रहे है. मानखुर्द-शिवाजीनगर में बिजली की चोरी होती है. चोरी की बिजली का पैसा जो मीटर के हिसाब से बिल भरने वालों से वसूल किया जाता है. पहले 200-250 रुपये बिजली का बिल आता था, अब यह बिल 1400-1500 रुपया आता है.

अध्यक्ष महोदय, पावरलूम के बारे में कहना चाहूंगा कि भिवंडी में टोरंट कंपनी की वजह से बिजली का बिल बहुत आ रहा है. लोग बहुत परेशान है. लोग रास्ते पर बिजली नहीं जलाते है. बिजली की इस समस्या की ओर सरकार ने ध्यान देना चाहिए. बिजली के बिल का रेट एक समान होना चाहिए. कुलाबा से दहिसर तक अलग अलग कंपनियों का अलग अलग रेट है. माननीय मुख्यमंत्री जब विपक्ष में थे तो उन्होंने इस बारे में कहा था. अब वे सत्ता में आ गए है. माननीय मुख्यमंत्री जी ने इस ओर ध्यान देना चाहिए. इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं, धन्यवाद.

------------

....2.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. राहूल कूल ( दौंड ) : अध्यक्ष महोदय, म.वि.स. नियम 293 अन्वयेच्या प्रस्तावावर मला बोलण्याकरिता आपण मला संधी दिली याबद्दल धन्यवाद.

अध्यक्ष महोदय, मी केवळ 2-3 सूचना मांडणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. शंभुराज देसाई यांनी दिवसा वीज देण्याची मागणी केलेली आहे. परंतु, दिवसा वीज देणे शक्य नसेल तर दिवसा 4 तास व रात्री 4 तास अशाप्रकारे वीज द्यावी. तसेच, जीर्ण झालेल्या लाईन्स लवकर दुरूस्त करण्याची आवश्यकता आहे. ग्रामीण भागात वीज मंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या अडचणी आहेत, त्या दूर व्हाव्यात. ट्रान्सफॉर्मर मिळण्यात बऱ्याचदा दिरंगाई होते आणि एखाद्या ट्रान्सफॉर्मरवर काही लोकांनी वीज बिल भरले नसेल तर, बाकीच्या लोकांना ट्रान्सफॉर्मर देण्यास लेट केला जातो. त्याबाबत आपण सूचना द्याव्यात.

अध्यक्ष महोदय, बऱ्याच ठिकाणी शाखा कार्यालयांची मागणी आहे, कामाचा व्याप खूप वाढलेला आहे. त्याबाबत आपण संबंधितांना सूचना करुन शाखा कार्यालय निर्माण करावीत. विभागीय कार्यालय सुरु करताना निकष तेथील वीज ग्राहकांचा आहे. काही ठिकाणी वीज ग्राहक कमी आहेत, परंतु रेव्हन्यु जास्त मिळत आहे तेथे नवीन विभागीय कार्यालय सुरु करताना आपल्या कनेक्शनच्या मर्यादेत थोडासा बदल करावा आणि जेथे रेव्हेन्यु जास्त मिळत असेल तेथे नवीन विभागीय कार्यालय सुरु करावे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो. धन्यवाद.

...............

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयदत्त क्षीरसागर ( बीड ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.स. नियम 293 अन्वयेच्या प्रस्तावावर बोलण्याकरिता उभा आहे.

अध्यक्ष महोदय, कोणत्याही राज्यातील दरडोई विजेचा वापर हा त्या भागातील विकासाचा मापदंड मानण्यात येतो. विजेची निर्मिती, वहन व वितरण या तिन्ही क्षेत्राकडे या खात्याने अधिक लक्ष देणे गरजेचे आहे. मी या खात्याचे माननीय मंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांचे त्यांच्या कामाच्या वेग व आवाक्याबद्दल मन:पूर्वक कौतुक करतो. त्यांनी केवळ राज्यापुरतेच नाही तर प्रत्येक जिल्ह्यात जाऊन तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन तेथील प्रश्न समजून घेऊन ते सोडविण्याच्या बाबतीत स्पष्ट सूचना दिल्या. परंतु, पुढचा भाग महत्त्वाचा आहे. दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी होते की नाही, त्या प्रमाणे काम होत आहे की नाही, याही बाबतीत आढावा घेणे गरजेचे आहे असे मला वाटते.

अध्यक्ष महोदय, या 293 च्या प्रस्तावात वीज निर्मितीच्या बाबतीत काही बाबींचा उल्लेख केलेला आहे. राज्यात काही औष्णिक वीज निर्मिती केंद्र आहेत, तेथील काही संच जुने झालेले आहेत, त्यांचे लाईफ संपलेले आहे. त्यांना कसे तरी दुरुस्त करुन सुरु ठेवायचे, चढ्या दराने विजेची निर्मिती करावयाची, यंत्रणा पोसायची असे आज या महाराष्ट्रात सुरु आहे. आज चार रुपये, साडेचार रुपये पर युनिट या स्पर्धेच्या दराने वीज मिळते. परंतु, आपण ज्या जुन्या संचांच्या माध्यमातून वीज निर्मिती करतो, तेथील वीज निर्मितीचा दर हा पर युनिट 6 ते 7 रुपयापेक्षा जास्त असतो. राज्याला हे परवडणारे नाही. त्यामुळे माझी विनंती आहे की, हे जे जुने निकामी संच आहेत ते बाद करावेत. नवीन प्रकल्पात गुंतवणूक करण्याऐवजी आता राज्यात खाजगी क्षेत्रात साधारणत: 4 हजार मेगावॅट यापेक्षा अधिक वीज निर्मितीची स्थापित क्षमता आहे. आता केवळ बटन दाबण्याची आवश्यकता आहे. हे प्रकल्प याकरिता बंद आहेत की, कोळशाचे लिंकेज मिळत नाही आणि उपलब्ध कोळशावर अनेक कारणामुळे ते चालविणे इकॉनॉमिकल होत नाही. या कारणास्तव 4 हजार मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प केवळ बटन दाबण्याच्या कारणास्तव बंद आहेत. माझी सूचना आहे आपण लॉंग टर्म पीपीए करावा. त्यांना केवळ कोळसा द्यावा, बाकी काही द्यायचे नाही आणि त्यांच्याकडून वीज घ्यायची अशाप्रकारचा पीपीए केला तर शासनाला ही 4 हजार मेगावॅटची क्षमता उपयोगात आणता येईल.

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयदत्त क्षीरसागर ...

आज ग्रामीण भागात विजेच्या बाबतीत लपंडाव सुरु आहे. तेथे अघोषित लोडशेडिंग खूप मोठ्या प्रमाणावर आहे. आपण याबाबत सूचना दिल्या परंतु, जेव्हा आम्ही विभागाकडे विचारणा करतो तेव्हा मटेरिअल नाही, किटकॅट नाही, फ्यूज नाही, तार नाही, 100 चे ट्रान्सफॉर्मर वापरण्यास सांगितले तर, 100 चे ट्रान्सफॉर्मर आमच्याकडे वरुन आले नाहीत, अशी अनेक कारणे सांगितली जातात. मराठवाड्यात पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई आहे. भूक बळी, पाणी बळी आणि आत्महत्यांचे थैमान मराठवाड्यात आहे. अनेक ठिकाणी टँकरमध्ये पाणी भरायला वीज नसते, त्यामुळे टँकर भरता येत नाहीत. रात्री 1-1 वाजता टँकर भरतात आणि पाण्याचे वितरण होते. त्यासाठी जेथे टँकरचे पॉईंट्स आहेत तेथे एक्सप्रेस फिडर देणे गरजेचे आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, माननीय मंत्री श्री. प्रकाश महेता यांना एक निवेदन करावयाचे आहे. आपल्याला ऑन लेग ठेवले जाईल.

श्री. जयदत्त क्षीरसागर : अध्यक्ष महोदय, मान्य आहे मी मंत्री महोदयांना त्याकरिता वेळ देतो. परंतु, भाषण सुरु असताना मध्येच थांबविणे ही प्रथा बरोबर नाही. अतिशय तातडीचे निवेदन असेल तर मी समजू शकतो.

अध्यक्ष महोदय, मेक इन महाराष्ट्राच्या निमित्ताने महाराष्ट्रात खूप मोठी गुंतवणूक येणार आहे. ही गुंतवणूक केवळ पुणे, मुंबई किंवा नाशिक पुरती मर्यादित न राहता, मराठवाडा व विदर्भातही यावी अशी प्रामाणिक इच्छा असेल तर तेथील इन्फ्रास्ट्रक्चर, माफक दरात वीज व बाकी सर्व सोयी शासनाने देणे गरजेचे आहे. मराठवाडा व विदर्भात विजेचे दर तुलनेने कमी राहण्यासंदर्भात आपण एक उच्चस्तरीय कमिटी नेमली होती. त्याबाबत काय निर्णय झाला हे आपण आपल्या उत्तराच्या भाषणात सांगावे. आपण मराठवाडा व विदर्भात विजेचे दर कमी करणार आहात काय, जेणेकरुन उद्योगांना प्रोत्साहन मिळेल, याबाबतीत आम्हाला थोडेसे मार्गदर्शन करावे.

अध्यक्ष महोदय, परळी थर्मल पाण्याअभावी बंद आहे. तेथे 10 ते 15 कोटी रुपयांचा कोळसा उघड्यावर पडून आहे. त्याची ज्वलनशक्ती खराब होणार असल्याने दुसरीकडे नेऊन त्याची विल्हेवाट कशी लावता येईल व तो कसा वापरात घेता येईल याकरिता आपण प्रयत्न करणे आवश्यक आहे.

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयदत्त क्षीरसागर ....

अध्यक्ष महोदय, वीज खात्याप्रमाणे अन्य खात्यांचेही प्रश्न आहेत. पेय जल योजनेचा, सडकेचा प्रश्न आहे त्या विभागाचे मंत्री महोदय उपस्थित नसल्याने कोणी तरी आमच्या मुद्यांची नोंद घेतली पाहिजे.

**तालिका सभाध्यक्ष :** माननीय श्री. चंद्रशेखर बावनकुळे आपल्या सर्व विषयांची नोंद घेत आहेत.

श्री. जयदत्त क्षीरसागर : अध्यक्ष महोदय, दुष्काळ असताना पेयजल योजना 100 टक्के बंद आहे. रस्त्याची योजना बंद आहे. मुख्यमंत्री सडक योजना कधी सुरु करणार, रस्त्यांचे काम कधी सुरु होणार याबाबतीतही माहिती देणे गरजेचे आहे. मुंबईत वीज वितरणाबाबत सातत्याने तक्रार करण्यात येते. येथे बेस्ट, टाटा व रिलायन्स अशा 3-3 डिस्ट्रिब्युशन कंपन्या आहेत. यांच्या दरामध्ये तफावत आहे, ती दूर करुन त्यांच्यामध्ये स्पर्धा लावली पाहिजे.

V-1/...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयदत्त क्षीरसागर.....

केवळ तफावत दूर करणेच नव्हेतर या तीन पॉवर कंपन्यांपैकी कोणत्या कंपनीकडून कमीतकमी दरामध्ये वीज दिली जाईल, यासंदर्भात त्यांच्यामध्ये स्पर्धा लावावी. तीकडे क्लाईंटला जसा ओपन ॲक्सेस दिला, तशा प्रकारचा ओपन ॲक्सेस या तीन्ही पॉवर डिस्ट्रीब्युशन कंपनीमध्ये देऊन स्पर्धा लावली तर मुंबई शहर आणि मुंबई उपनगरातील नागरिकांचा फायदा होईल.

अध्यक्ष महोदय, वीज वसुलीकरिता ग्रामीण भागातील घरांतील वीज कनेक्शन काढले जात आहे. आपण एजी पंपाचे कनेक्शन बंद केले. परंतु घरातील कनेक्शन तोडू नये. आपल्या सरकारने शेतकऱ्यांची कर्जमाफी केली नाही. दुष्काळ संपेपर्यंत या 14 जिल्ह्यामध्ये वीज कनेक्शन तोडू नये आणि परंतु सर्व बाबतीत आपली कार्यक्षमता लक्षात घेऊन 100 टक्के वीज बील माफी करावी, अशी आग्रही मागणी करतो. धन्यवाद.

---*---

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. :** बी.डी.डी. चाळीचा पुनर्विकास

**मु.शी. :** बी.डी.डी. चाळीच्या पुनर्विकाससंबंधी माननीय गृहनिर्माण मंत्र्यांचे निवेदन.

श्री. प्रकाश मेहता (गृहनिर्माण मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 47 अन्वये पुढील निवेदन करतो :-

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे )

---*---



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभाध्यक्ष (श्री. सुभाष साबणे) :** आता म.वि.स. नियम 293 अन्वये प्रस्तावावरील चर्चा थांबविण्यात येत आहे.

सभागृहाचे कामकाज दुपारी 2.00 वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.34 वाजता दुपारी 2.00 वाजेपर्यंत स्थगित झाली)

---*---

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(**स्थगिती नंतर**)

(**अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष**)

**<u>माहितीचा मुद्दा</u>**

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, मला एका गोष्टीची माहिती पाहिजे.

अध्यक्ष महोदय, माननीय वित्त मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार हे आज सदनामध्ये त्यांच्या कार्यकाळातील दुसरा अर्थसंकल्प मांडणार आहेत. मी सकाळी त्यांची चौकशी केली असता ते देवदर्शनाला गेले असल्याची माहिती मिळाली. सदनामध्ये येण्यापूर्वी ते किती देवांचे दर्शन घेऊन आले व किती देवांचा आशीर्वाद घेऊन राज्याचा अर्थसंकल्प मांडत आहेत, याची माहिती त्यांनी सभागृहाला द्यावी.

**अध्यक्ष :** अर्थसंकल्पात ते समजेल.

---------------

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** सन 2016-2017 चा अर्थसंकल्प सादर करणे.

श्री.सुधीर मुनगंटीवार (वित्त मंत्री) : अध्यक्ष महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मरण करुन, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना नमन करुन, महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना मानाचा मुजरा करत शाहू महाराजांनी आम्हाला जी दिशा आम्हाला दिली आहे ती दिशा विचारात घेऊ हा अर्थसंकल्प मी सन 2016-2017 चा अर्थसंकल्प सादर करीत आहे.

अध्यक्ष महोदय, मागच्या वर्षी माननीय मुख्यमंत्री यांच्या नेतृत्वामध्ये व जनतेच्या अशीर्वादाने सरकार स्थापन झाले. मागच्या वर्षी जो वारसा आम्हाला प्राप्त झाला त्यामधून आम्ही कृषी क्षेत्रात 5.8 टक्क्यावरुन अनंत समस्या असतानाही 8 टक्क्यापर्यंत विकास दर पोहोचवण्यामध्ये आम्ही यशस्वी झालो.

(प्रेस : येथे माननीय वित्त मंत्री यांचे अर्थसंकल्पावरील भाषण छापावे.)

यानंतर FF-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

PPD/ MMP/ AKN/

14:10

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुधीर मुनगंटीवार......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**माननीय श्री. सुधीर मुनगंटीवार, वित्त मंत्री यांनी अर्थसंकल्प सादर करताना खालील बाबींचा उल्लेख केला :-**

"घने अंधेरों से था भरा हुआ वह घर जो मिला,
नहीं किया मगर हमने कोई शिकवा या गिला,
बड़ी हिम्मत से संभल कर उठाये हमने कदम,
तब कहीं जाकर उजालों का समुंदरसा मिला".

"एकच आशा उरात माझ्या, एकच आहे ध्यास,
लाखाचा पोशिंदा त्याला घडू नये उपवास,
शर्थ करेन मी जीवास माझ्या पडो कितीही त्रास,
देईन माझ्या बळीराजाला स्वाभिमानाचा घास".

"ऐका माझ्या भगिनींनो नाही तुम्ही निराधार,
तुमच्या पाठीशी खंबीर आहे आमचे सरकार".

"आदर्शाची सांगे महती, त्यांची जीवनगाथा,
प्रेमभराने त्यांच्या चरणी झुकतो आमचा माथा,
पाठीवरती हात तयाचा, उणे आम्हाला काय,
उच्चरवाने गरजू जय, जय छत्रपती शिवराय,
पराक्रमाचा सूर्य जणू तो, रयतेचा आधारु,
त्या तेजाचे, चैतन्याचे स्मारक, जगी आम्ही उभारु".

"इन गर्म हवाओं की भी तासीर बदल जाएगी,
कुछ वक्त में ही देखना तस्वीर बदल जाएगी,
जी जान लड़ा देंगे, महाराष्ट्र की खातिर,
विश्वास रखो विरोधियों,
जल्द ही महाराष्ट्र की तकदीर बदल जाएगी".

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

---*---





**अध्यक्ष :** सन 2016-2017 चा अर्थसंकल्प सभागृहाला सादर करण्यात आला आहे. अर्थसंकल्पीय प्रकाशने सुटकेससह सन्माननीय सदस्यांना देण्याची व्यवस्था वित्त विभागातर्फे तळ मजल्यावरील वितरण केंद्रावर करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्यांनी वितरण केंद्रावरुन सदर प्रकाशने घ्यावीत.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक सोमवार, दिनांक 21 मार्च 2016 रोजी सकाळी 11.00 वाजता भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 3.39 वाजता सोमवार, दिनांक 21 मार्च 2016 च्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली)

---*---

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION